# घटक – १

# सामाजिक चळवळी

# ( Social Movements )

**घटक संरचना :**

१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

  १.३.१ सामाजिक चळवळीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

  १.३.२ सामाजिक चळवळीचे घटक

  १.३.३ सामाजिक चळवळीचे प्रकार

  १.३.३ सामाजिक चळवळीचे महत्त्व

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

१) सामाजिक चळवळीचा अर्थ, स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

२) सामाजिक चळवळीचे घटक आणि प्रकार समजून घेता येतील.

३) सामाजिक चळवळी किती महत्त्वपूर्ण आहेत हे स्पष्ट होईल.

सामाजिक चळवळीच्या विविध प्रकारांची माहिती करून घेता येईल.

**सामाजिक चळवळींचे प्रकार** (Types of Social Movement)

सामाजिक चळवळींचे वर्गीकरण करणे सोपे नाही. कारण समाजात विविध स्वरूपाच्या चळवळी एकाच वेळी सुरू असतात. त्यामुळे सामाजिक चळवळींचे वर्गीकरण वेगवेगळ्या निकषांनुसार केले जाते. कधी त्या

चळवळी समाजामध्ये किंवा विशिष्ट समूहात परिवर्तन घडवून आणतात, तर कधी त्या सामाजिक बदल घडवण्याच्या दृष्टीने प्रेरित असतात. अशा चळवळी परिवर्तनात्मक स्वरूपाच्या असतात. विशिष्ट क्षेत्राशी संबंधित चळवळींमध्ये धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा प्रकारांचा समावेश होतो. तसेच चळवळींच्या उद्दिष्टांनुसारही त्यांचे वर्गीकरण करता येते. म्हणूनच सामाजिक चळवळींचे प्रकार निश्चित आणि स्पष्टपणे मांडणे आव्हानात्मक ठरते. हॉर्टन आणि हंट या समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळींची उद्दिष्टे ध्यानात घेऊन त्यांचे खालीलप्रमाणे प्रकार मांडले आहेत.

### १.२ प्रस्तावना (Introduction) :

मानवी समाज हा बुद्धीने स्थिर असत नाही. त्यामध्ये सातत्याने परिवर्तन किंवा बदल होत असतात. या परिवर्तन प्रक्रियेमध्ये सामाजिक चळवळींचा निश्चितच संबंध असतो. यावरून असे लक्षात येते की, सामाजिक चळवळी या समाजव्यवस्थेतील एखाद्या क्षेत्रात किंवा संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणत असतात. म्हणजेच सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला चालना देत असतात.

भारतीय समाज व्यवस्थेत अगदी ऐतिहासिक काळापासून सामाजिक चळवळी चालत आलेल्या आहेत. पण प्रामुख्याने भारतात ब्रिटिश राजवटीत सामाजिक चळवळींना अधिक जोर आल्याचे दिसते. उदा - अस्पृश्यता चळवळ, शेतकरी चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ, कामगार चळवळ, सामाजिक सुधारणा चळवळ वगैरे अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या.

१९ व्या शतकाच्या सुरवातीला युरोपमध्ये Social Movement (सोशल मूव्हमेंट) हा शब्द फार मोठ्या प्रमाणात वापरण्यात आला. तो काळ सामाजिक परिवर्तनाचा व अभिसरणाचा काळ होता. शोषित वर्गाच्या उद्धारासाठी काम करणाऱ्या राजकीय नेत्यांनी नवीन समाजरचना अस्तित्त्वात आणण्यासाठी व त्या अनुषंगाने ध्येयधोरणे आणि आर्थिक संबंधात परिवर्तन घडवून आणण्यासाठी जे कार्य केले त्या संदर्भात हा शब्द वापरण्यात आला. खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळीचा अर्थ अतिशय व्यापक असा आहे. या प्रकरणात आपण सामाजिक चळवळींचा अर्थ, स्वरूप, घटक व सामाजिक चळवळींचे महत्त्व याची माहिती करून घेणार आहोत.

### १.३ विषय विवेचन (Presentetion of Subject Matter) :

सामाजिक चळवळींबाबत सर्वसाधारणपणे सामाजिक सुधारणा विषयीची प्रक्रिया असा संकुचित अर्थ घेतला जातो. परंतु सामाजिक चळवळी ही अतिशय व्यापक अशी संकल्पना आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक चळवळींच्या विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेली व्याख्या त्याची स्वरूपात्मक वैशिष्ट्ये पहिल्या युनिटमध्ये दिली आहेत. दुसऱ्या युनिटमध्ये सामाजिक चळवळींचे घटक दिले आहेत. त्यानुसार चळवळी निर्माण होतील की नाही? सामाजिक चळवळी अस्तित्त्वात आल्या तर त्या यशस्वी होतील का? याचे सष्टीकरण मिळते. तिसऱ्या युनिटमध्ये सामाजिक चळवळींचे महत्त्व काय आहे याचे स्पष्टीकरण मिळते. या पहिल्या प्रकरणातून सामाजिक चळवळीची संकल्पना नेमकी काय आहे ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### १.३.१ सामाजिक चळवळींचा अर्थ आणि वैशिष्ट्ये :

**(Meaning and Characteristscs of Social Movements)**

सामाजिक चळवळींचा अर्थ सर्वसाधारणपणे अत्यंत संकुचित घेतला जातो. सामान्यपणे लोकांच्या मनात किंवा एकूण व्यवहारात समाज सुधारकांनी केलेल्या समाज सुधारणेविषयीच्या चळवळींना सामाजिक चळवळी म्हटले जाते. परंतु समाजशास्त्रात केवळ सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या चळवळी म्हणजे सामाजिक चळवळी अशी संकल्पना मानली जात नाही. कारण सामाजिक चळवळी समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी जशा कार्यरत असतात. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तनाला संघटीतपणे विरोध करण्यासाठी सुद्धा निर्माण होत असतात. उदा- नर्मदा बचाओ आंदोलन. खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळींचा अर्थ अतिशय व्यापक असा आहे.

**सामाजिक चळवळीची व्याख्या (Definition of Social Movement) :**

सामाजिक चळवळींचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी सामाजिक चळवळींची व्याख्या लक्षात घेणे आवश्यक आहे. सामाजिक चळवळीसंबंधी अनेक विचारवंत, समाजशास्त्रज्ञ यांनी व्याख्या केल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१) राल्फ टर्नर :** ''एकत्रित आलेले अनेक लोक ज्या समुहाचे किंवा समाजाचे घटक असतात. त्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा परिवर्तनाला विरोध करण्यासाठी जेव्हा काहीशा सातत्याने कार्यरत असतात, तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात.''

(A collectivity acting with some continuity to promote or resist a change in the society or group of which it is a part - Ralph Turner)

**२) रूडॉल्फ हेबर्ले :** ''एखाद्या समाजातील प्रस्थापित संबंधात (परिवर्तन) घडवून आणण्यासाठी केलेला सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.''

(Collective effort of transform established relations within a particular society is known as social movement - Rudolf Heberle)

**३) हर्बर्ट ब्लूमर :** ''सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी करण्यात येणारा सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.''

(Social movements means a collective enterprise to establish a new social order of life - Hebert Blumer)

**४) जॉन विल्सन :** ''सामाजिक व्यवस्थेत व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा घडून येणाऱ्या बदलांना प्रतिकार करण्यासाठी जाणीवपूर्वक संघटितरित्या, असंस्थीकृत साधनांचा किंवा मार्गांचा करण्यात येणारा प्रयत्न म्हणजेच सामाजिक चळवळ होय.''

(A Social movement is a conscious, collective, organized attempt to bring about or resist large scale change in the social order big ------ means - John Wilson)

**५) विल्सम स्कॉट :** ''अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा ते रोखण्यासाठी बहुसंख्य लोकांनी केलेला संघटित प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ असून सामुहिक वर्तनाचा तो एक महत्त्वाचा प्रकार आहे.''

(An important form of collective being in which large number of people are organised or --- to support and bring about or to resist social change - William Scoott)

**६) हॉर्टन आणि हंट :** ''सामाजिक चळवळी म्हणजे अशा प्रकारचे सामुदायिक प्रयत्न की ज्यामध्ये समाज किंवा त्यामधील सभासद यांच्यामध्ये परिवर्तन होण्यासाठी प्रेरणा दिली जाते किंवा प्रतिरोध केला जातो.''

(Social movements are collective at tempts to promote or resist change either in society or in its members - Horton and Hunt)

**७) ड्रेसलर आणि विलीस :** ''अनेक लोक हेतुपूर्वक आणि सामुहिकरित्या परिवर्तन घडवून आणण्याचा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात.''

(When a deliberate attempt is made by a large number of people to bring about change through group effort it is called a social movement - Dresseler and Willis)

थोडक्यात सामाजिक चळवळ म्हणजे सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा किंवा विरोध करण्याचा निरंतर सामूहिक प्रयत्न होय. वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की,

१) सामाजिक चळवळी ही सामुदायिक वर्तनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

२) हा सामूहिक प्रयत्न सतत व दीर्घकाळ चालू असतो.

३) योग्य असे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट असते.

४) योग्य असे सामाजिक परिवर्तन रोखण्याचेही उद्दिष्ट असते.

५) सामूहिक चळवळ ही निरंतर प्रक्रिया आहे.

**सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये (Characteristics of social Movements) :**

सामाजिक चळवळींच्या विविध व्याख्यांवरून सामाजिक चळवळीसंबंधी महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यात घनिष्ट संबंध :**

सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यामध्ये अत्यंत घनिष्ट संबंध आहे. किंबहुना सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला प्रभावितच करत असतात. अर्थात सामाजिक चळवळी या परिवर्तन घडवून आणणेची प्रक्रिया सुरू करतात किंवा काही वेळा काही चळवळी सामाजिक परिवर्तन होऊ नये म्हणून परिवर्तन थांबविण्यासाठी किंवा परिवर्तनाचा विरोध करण्यासाठी देखील प्रयत्न करत असतात. बहुतांशपणे चळवळी या सामाजिक परिवर्तनाला प्रभावित करतात. उदा– सती प्रथा, हुंडा प्रथा, अस्पृश्यता यासारख्या अनिष्ट प्रथामध्ये कायद्याने परिवर्तन व्हावे यासाठी निर्माण होतात. परंतु त्याचबरोबर दुसरी बाजू म्हणजे एखाद्या परिवर्तनाला विरोध करण्यासाठी सामाजिक चळवळी कार्यरत असतात. उदा– नर्मदा बचाओ आंदोलन. थोडक्यात सामाजिक चळवळी या एखाद्या समाजात, संस्थेत, सामाजिक संरचनेत वादळ घडवून आणणे किंवा त्याचा विरोध करण्याच्या उद्दिष्टाने अस्तित्त्वात येतात. याचाच अर्थ सामाजिक चळवळींचा सामाजिक परिवर्तनाशी अत्यंत घनिष्ट संबंध आहे. सामाजिक चळवळीतूनच सामाजिक परिवर्तन निर्माण होत असते.

**२) विचार प्रणाली :**

विचारप्रणाली हे सामाजिक चळवळींचे एक प्रभेदक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक सामाजिक चळवळीला विचारप्रणाली असतेच. कोणतीही सामाजिक चळवळ विशिष्ट कारणांनी, विशिष्ट परिस्थितीमुळे निर्माण होत असते. एखाद्या विशिष्ट परिस्थितीबाबत लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो आणि त्या परिस्थितीत बदल घडवून आणला पाहिजे अशी तीव्र भावना निर्माण होते व ती परिस्थिती बदलण्यासाठी संबंधित अनेक लोक त्यामध्ये सहभागी होतात व त्याचे समर्थन करणेसाठी, त्यावर काही मार्ग काढले जावेत म्हणून प्रयत्न करतात.

अर्थात, सर्वच चळवळींची विचारप्रणाली सारखीच असते असे नाही. विचारप्रणाली म्हणजे सामाजिक किंवा राजकीय स्वरूपाचे विशिष्ट असे तत्त्वज्ञान असते. विचारप्रणाली म्हणजे सामुदायिक किंवा संघटितरित्या एकत्र येऊन सामाजिक व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे होय. त्यामुळे सामाजिक व्यवस्था सुरळीतपणे चालावी असा उद्देश असतो.

**३) संघटना :**

सामाजिक चळवळीचे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. चळवळींच्या स्वरूपानुसार व त्याच्या व्याप्तीनुसार सामाजिक चळवळी संघटित किंवा असंघटित स्वरूपाच्या असू शकतात. पण त्यातही बहुतांश प्रमाणात सामाजिक चळवळी संघटित असतात. चळवळीमध्ये अनेक सदस्य असतात. परंतु ते सगळेच त्या संघटनांचे प्रत्यक्ष सहभागी असताताच असे नाही. परंतु चळवळींच्या यशस्वीतेच्या दृष्टीने संघटनेमध्ये व चळवळींना प्रतिसाद देणारे किंवा त्यांना पाठिंबा देणाऱ्यांची संख्या जशी वाढत जाईल, त्यानुसार त्यामध्ये समन्वय साधणे अधिक सोयीस्कर होईल.

**४) नेतृत्त्व :**

सामाजिक चळवळींना यश प्राप्त होण्यासाठी जशी संघटनेची गरज असते. तशीच त्यांना नेतृत्त्वाचीही

आवश्यकता असते. सामाजिक चळवळींचे उद्दिष्ट गाठण्यासाठी असामान्य व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तीची नेता म्हणून गरज असते. सामाजिक चळवळीत सहभागी झालेल्या लोकांचे मनोबल वाढवणे. त्यांची सहानुभूती मिळवणे, चळवळीची ताकद वाढविणे, चळवळीत येणारे अडथळे दूर करणे या सगळ्या गोष्टींची जाणीव सदस्यांना करून देण्याची जबाबदारी नेत्याची असते. कार्यकर्त्यांचा उत्साह टिकवून चळवळीला योग्य दिशा देण्याचे कार्य नेते करतात. स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेक समर्थ नेते लाभल्यामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले.

**५) सामुदायिक कृती व समूह भावना :**

सामाजिक चळवळ ही सामूहिक कृती आहे. सामाजिक चळवळ कधीही व्यक्तीगत स्वरूपाची नसते. सामाजिक चळवळीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी चळवळीतील सदस्यात सामूहिक भावना असावी लागते. सामुदायिक कृती जितकी प्रभावित तितके चळवळीतील अनुयायांमध्ये प्रस्थापित होण्यास मदत होते.

**६) सामाजिक चळवळींना निश्चित कालावधी नसतो :**

सामाजिक चळवळी या विशिष्ट उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी सुरू झालेल्या असतात. त्यामुळे ते उद्दिष्ट किती कालावधीत साध्य होईल हे सांगता येत नाही. म्हणून काही चळवळी या अल्पकालीन, काही चळवळी दिर्घकालीन स्वरूपाच्या असतात.

**७) सामाजिक असंतोषातून सामाजिक चळवळींचा उदय :**

जेव्हा एखाद्या परिस्थितीबाबत लोकांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते तेव्हा आपल्यासारखे इतरही अनेक लोक सुद्धा असमाधानी आहेत याची जाणीव होते व त्यातून पुढे ती परिस्थिती सामूहिक प्रयत्नातून बदलण्याचा प्रयत्न करतात. तो असंतोष बाहेर पडण्यासाठी कोणाच्या तरी नेतृत्त्वाने प्रयत्न करतात व त्या असंतोषाला वाचा फोडतात आणि सामाजिक चळवळ जन्माला येतात. मात्र सामाजिक असंतोष समाजातील असंख्य लोकांमध्ये असला पाहिजे. त्याच्या विरोधात सामुदायिकरित्या उभे राहिले पाहिजे. उदा – शेतकरी चळवळ.

**८) असंस्थीकृत मार्गांचा अवलंब :**

सामाजिक चळवळींमध्ये संस्थीकृत व असंस्थीकृत मार्गांचा अवलंब करतात. अर्ज करणे किंवा न्यायालयात दाद मागणे अशा मागण्यांचा पाठपुरावा करणे असे संस्थीकृत मार्ग आहेत. परंतू चळवळीत सामान्यत: असंस्थीकृत मार्ग व तंत्र वापरले जाते. उदा. मोर्चा, रास्ता रोको, घोषणाबाजी, निदर्शने असे कार्यक्रम राबवितात म्हणजेच लोकशाही मार्गाचा अवलंब केला जातो. त्याचबरोबर अगदी अपवादात्मक किंवा संवेदनशील घटना असलेस काही वेळा सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, दगडफेक, जाळपोळ, उपोषण किंवा आत्मदहनाचा प्रयत्न या मार्गांचा देखील अवलंब करतात आणि दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर अडथळे आणून आपला संताप व्यक्त करतात. त्यामुळे चळवळीतील लोकांच्या मनात फक्त सामाजिक परिस्थितीत वादळ घडवून आणण्याची जाणीव असते असे नाही तर काहीही करून ती परिस्थिती बदलण्याची प्रत्यक्ष कृती कराण्याशी ते वचनबद्ध असतात.

**९) यशस्वी व अयशस्वी :**

प्रत्येक सामाजिक चळवळ यशस्वी होईलच असे नाही. ज्या चळवळींना समाजाचा पाठिंबा असतो त्या काही अंशी यशस्वी होतात. त्यामुळे त्या संघटीत होतात. नंतर त्याची समरेखा तयार केली जाईल व त्याची योग्य अंमलबजावणी केली जाईल असा लोकांचा विश्वास बसतो. लोकांचा सतत पाठिंबा मिळत गेला की चळवळ आपली उद्दिष्टे गाठण्यात यशस्वी होतात. पण काही वेळा चळवळींवर दबाव येत गेला तर चळवळींचा जोर कमी होऊ लागतो. मग पुन्हा त्या चळवळींना नव्याने प्रभावित करणेचा प्रयत्न केला जातो. असे चळवळींचे जीवनचक्र सुरू राहते. थोडक्यात चळवळींचे यश अपयश हे चळवळींचे स्वरूप, नेतृत्त्व, लोकांचा पाठिंबा, कार्यक्षमता, आर्थिक मदत, प्रसार माध्यमे अशा विविध घटकांवर अवलंबून असते.

थोडक्यात, सामाजिक चळवळी या समाज रचनेमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा नको असलेले परिवर्तन रोखण्यासाठी कार्यरत असतात. सामाजिक चळवळींच्या वरील वैशिष्ट्यांवरून सामाजिक चळवळीची संकल्पना अधिक स्पष्ट होते.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक चळवळीची कोणतीही एक व्याख्या लिहा?

२) सामाजिक चळवळींचा कोणत्या प्रक्रियेशी अगदी निकटचा संबंध आहे?

३) कोणत्या प्रकारच्या सामाजिक परिस्थितीमुळे सामाजिक चळवळींचा उदय होतो?

४) सामाजिक असंतोषातून सामाजिक चळवळीचा उदय होतो हे विधान चूक की बरोबर ते सांगा?

५) सामाजिक चळवळीत यश मिळविण्यासाठी कोणत्या दोन गोष्टींची जास्त गरज आहे?

## १.३.२ सामाजिक चळवळीचे घटक (Elements of social Movements) :

सामाजिक चळवळी कशा निर्माण होतील, निर्माण होतील की नाही, त्यामध्ये लोकांचा सहभाग किंवा पाठिंबा किती मिळेल, चळवळीमध्ये यश मिळेल की अपयश या सगळ्या गोष्टी सामाजिक चळवळीच्या संरचनात्मक घटकावर अवलंबून असते. सामाजिक चळवळी अस्तित्त्वात येणे, त्यांचे कार्य, दिशा, स्वरूप, यशापयश यामध्ये निर्धारण करणारे घटक नेमके कोणते याचा अभ्यास काही समाजशास्त्रज्ञांनी केला आहे. सामाजिक चळवळीतील सदस्यांच्या सामूहिक वर्तन प्रकारांच्या ज्या संरचनात्मक पूर्ण अटी सांगितलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**अ) नेल स्मेल्सर :**

नेल स्मेल्सर यांनी सामूहिक वर्तन प्रकार, त्याचे अस्तित्त्व, दिशा व परिणाम याबाबतचे काही घटक स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे.

**१) संरचनात्मक अनुकूलता :**

सामाजिक चळवळी निर्माण होण्यासाठी सामूहिक वर्तनाची प्रक्रिया कशी आहे, अनुकूल की प्रतिकूल त्यानुसार त्या अस्तित्त्वात येतात. सर्वसाधारणपणे समाजातील अनुकूल परिस्थिती असेल तर सामाजिक चळवळी निर्माण होत असतात.

**२) संरचनात्मक तणाव :**

एखाद्या समाजातील प्रत्यक्ष असलेली परिस्थिती आणि समुहाचे आदर्श यामध्ये संघर्ष निर्माण झाले की संरचनात्मक तणावात्मक परिस्थिती निर्माण होते. विशेषत: वांशिक, जातीय, वर्गीय संघर्ष हे संरचनात्मक तणावामुळे निर्माण होत असतात. म्हणजे समजा एखाद्या समाजात समानता प्रस्थापित केली जात असेल, तेव्हा काही घटकांना या समानतेपासून वेगळे ठेवले असते. त्यांचा यामध्ये विचार केला जात नाही. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, अधिकारापासून ते घटक जर बाजूला ठेवले गेले तर त्यांच्यात कमालीची विषमता निर्माण होते. त्यांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण होते. अशा तऱ्हेने ज्यांच्यावर अन्याय झाला आहे. ज्यांना आपण दुर्लक्षित झालो आहोत असे वाटते असे लोक एकत्र येऊन संघटित होतात व सामाजिक चळवळी सुरू करतात. उदा- भारतातील दलितांच्या चळवळी किंवा अमेरिकेतील काळ्या लोकांनी केलेल्या चळवळी या संरचनात्मक तणावग्रस्त परिस्थितीमुळेच निर्माण झाल्या.

**३) सामान्यीकृत श्रद्धांची वाढ आणि विस्तार :**

संरचनात्मक तणाव परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आपण संघर्ष केल्याशिवाय आपल्याला हव्या त्या गोष्टी मिळणार नाहीत व आपले अस्तित्त्व उभे राहणार नाही. अशा प्रकारच्या श्रद्धेमध्ये वाढ होते व असे अनेक लोक संघटित होऊन सामाजिक चळवळी उभ्या करण्यास प्रवृत्त होतात व त्यातून सामाजिक चळवळी निर्माण होतात.

**४) नैमित्तिक घटक :**

सरंचनात्मक तणावामुळे लोकांमध्ये असमाधान, असंतोषाची भावना निर्माण होते. ती इतकी वाढीस लागते की ज्यामध्ये शेवटी लोकांच्या भावनांचा उद्रेक होतो. मग प्रसंगी कोणत्याही प्रकारच्या नैमित्तिक घटना त्याला कारणीभूत ठरतात व लोक संघटित होऊन चळवळी उभ्या करतात.

**५) सामूहिक कृतींसाठी संघटना :**

चळवळ निर्माण होण्यासाठी संघटनात्मकता असणे आवश्यक असते. जेव्हा समुदायातील अनेक लोक एक विधायक कार्यासाठी स्वतंत्रपणे वैयक्तिक प्रयत्न करतील तर त्यात यश येणार नाही. म्हणूनच कोणीतरी पुढाकार घेऊन एखादी संघटना स्थापन करून प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. बलात्काराविरोधी चळवळ उभी राहण्यामध्ये अशाच पद्धतीने विविध स्वायत्त महिला समुहांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले म्हणूनच ती चळवळ निर्माण होऊ शकली.

**६) सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा :**

समाजामध्ये चळवळी उभ्या करत असताना काही लोक निदर्शने करतात, मोर्चे काढतात अशा वेळी शासन किंवा पोलिस यंत्रणा चळवळींना विरोध करतात. त्या दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांना त्यांच्या ध्येयापासून विचलीत करतात. जेणेकरून त्यांनी पुन्हा त्या मार्गाला जाऊ नये. परंतु जेव्हा या सर्वांवर मात करून एखादी चळवळ उभी राहते तीच पुढे वाटचाल करते व ती चळवळ टिकून राहते.

**ब) स्टॉकडल :**

स्टॉकडल यांनी सामूहिक वर्तन प्रकार अस्तित्त्वात येण्यासाठी आवश्यक असलेल्या संरचनात्मक अटी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

**१) सामाजिक असंतोष :**

सामाजिक चळवळ निर्माण होण्याची पहिली अट म्हणजे सामाजिक असंतोष आहे. एखाद्या सामाजिक परिस्थितीविषयी जेव्हा अनेक लोकांच्या मनात असमाधानाची भावना निर्माण होते तेव्हा सामाजिक चळवळी निर्माण होण्यासाठी सुरवात होते.

**२) संरचनात्मक अडथळे :**

सामाजिक असंतोषाची भावना जितकी तीव्र स्वरूपाची होईल तितके संरचात्मक अडथळे त्यांच्या प्रक्रियेला विरोध करत राहतात. लोकांचा कोंडमारा होऊ लागतो. ते अधिक शक्तीनिशी संघटित होऊन निर्माण होणाऱ्या संरचनात्मक अडथळ्यांवर मात करण्याचा प्रयत्न करतात. हीच परिस्थिती सामाजिक चळवळींना पोषक ठरते.

**३) संपर्क :**

ज्या लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झालेली असते त्यांच्यात परस्परात संपर्क घडून आला की आंतरक्रिया निर्माण होऊन असंतोष हा सामूहिक स्वरूपाचा बनत जातो. त्यामुळे पुढे सामूहिक अभिवृत्तीतून निर्माण होणारी परिस्थिती सामाजिक चळवळींना विधायक ठरते.

**४) असंतोष दूर करता येण्यासाठी आत्मविश्वासाची भावना :**

लोकांमध्ये परस्परसंबंध घडून आले की, विधायक असमाधानकारक सामाजिक परिस्थिती काय आहे, ती कशी बदलता येईल. त्यासाठी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब करावा लागेल. याबाबतचा आराखडा तयार केला जातो. कोणत्या प्रकारच्या मार्गाने परिस्थितीमध्ये नक्की बदल करता येईल. याबाबत चर्चा करून एकमत निश्चित केले जाते. त्यामुळे असंतोष नक्की दूर करता येईल. अशा प्रकारचा आत्मविश्वास लोकांच्या मनात निर्माण होतो. मात्र आपण ठामपणे परिस्थिती बदलू शकणारच अशी तीव्र स्वरूपाची भावना असली पाहिजे. अन्यथा चळवळ अस्तित्त्वात येऊ शकणार नाही.

### ५) विचारप्रणाली :

विचारप्रणालीमुळे लोकांच्या मनात चळवळीमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळते. विचारप्रणाली विकसित झाल्याशिवाय चळवळ टिकून राहू शकत नाही. म्हणूनच चळवळीतील कार्यक्रमांचे नियोजन करणे, कार्यकर्त्यांच्या कल्पनांचा संच करणे म्हणजेच विचारप्रणाली असावी लागते. विचारप्रणालीमुळे नेत्यांकडून आंतरीकरण घडून येणे आवश्यक असते. विशेष म्हणजे विचार प्रणालीमुळे आपण जे करीत आहोत ते बरोबर आहे की नाही यापेक्षा ते बरोबरच आहे अशी भावना प्रस्थापित होते आणि चळवळीला चालना मिळते.

थोडक्यात, सामाजिक चळवळी अस्तित्त्वात येण्यासाठी व सामाजिक चळवळी व्यवस्थित कार्यरत राहून त्या टिकून राहण्यासाठी वरील प्रकारचे सर्व घटक प्रस्थापित होणे अत्यंत गरजेचे आहे. तरच चळवळींना एक दिशा मिळते, चालना मिळते व त्या टिकून राहू शकतात.

**स्वयंअध्ययन प्रश्न – २**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) संरचनात्मक तणाव ही संकल्पना कोणी मांडली?

२) स्टॉकडल यांनी सामाजिक चळवळीबाबत किती संरचानात्मक घटक सांगितले आहेत?

३) संरचनात्मक तणाव म्हणजे काय?

**सामाजिक चळवळींचे प्रकार** (Types of Social Movement)

१. **स्थलांतर चळवळ** (Migratory Movement)**:**

जेव्हा एखाद्या देशातील लोकांना स्वतःच्या समाजात किंवा देशात राहणे असुरक्षित वाटते, तिथे अन्याय, दडपशाही, भेदभाव होत असल्याची भावना निर्माण होते आणि दुसऱ्या देशात किंवा समाजात सुरक्षितता व उज्वल भवितव्याची आशा दिसते, तेव्हा त्या लोकांचे मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर म्हणजेच स्थलांतर चळवळ होय. सामान्य स्थलांतर हे अनेक कारणांनी होते, जसे की शिक्षण, नोकरी, व्यापार इ. मात्र हे स्थलांतर व्यक्तिगत पातळीवर असते. परंतु स्थलांतर चळवळ ही एक सामूहिक प्रक्रिया असते–जिथे सामाजिक, राजकीय, धार्मिक किंवा सांस्कृतिक असुरक्षितता हे मुख्य कारण असते. अशा चळवळीत लोकांना स्वतःच्या समाजातील ताणतणाव, भेदभाव, हिंसाचार यापासून मुक्त होण्याची आस असते. म्हणून ते सामूहिकरित्या दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. उदा. १९४७ साली भारत व पाकिस्तान स्वतंत्र झाले तेव्हा धर्माच्या आधारावर दंगली, हिंसाचार, असुरक्षितता यामुळे लाखो लोकांनी भारतातून पाकिस्तानात व पाकिस्तानातून भारतात स्थलांतर केले. हे एक महत्त्वाचे स्थलांतर चळवळीचे उदाहरण ठरते. दुसरे महायुद्धानंतर जर्मनीचे दोन भागांत – पूर्व जर्मनी (रशियाच्या अधिपत्याखाली) आणि पश्चिम जर्मनी–असे विभाजन झाले. १९६१ पर्यंत जवळजवळ ४० लाख जर्मन नागरिकांनी रशियाच्या हुकूमशाही शासनामुळे पूर्व जर्मनीतून पश्चिम जर्मनीत स्थलांतर केले. या स्थलांतराला रोखण्यासाठीच बर्लिन भिंत बांधण्यात आली.

स्थलांतर चळवळी या सामाजिक असंतोषाचे परिणाम असतात. व्यक्ती किंवा समाज जेव्हा आपल्या अस्तित्वासाठी, स्वातंत्र्यासाठी किंवा भविष्यासाठी भयग्रस्त होतो, तेव्हा तो नवीन पर्याय शोधू लागतो. ही चळवळ फक्त स्थलांतरणाची क्रिया नसते. ती एक सामाजिक अभिव्यक्ती असते, जी जुन्या समाजव्यवस्थेतील अपयश आणि नव्या व्यवस्थेबद्दलची आशा दर्शवते. स्थलांतर चळवळी या ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय बदलांचे द्योतक असतात. त्या एकीकडे दडपशाहीच्या विरुद्ध प्रतिक्रिया असतात, तर दुसरीकडे नवीन सुरक्षेच्या व प्रगतीच्या दिशेने टाकलेले पाउल असते. या चळवळी समाजाच्या संरचनेत मोठा बदल घडवतात आणि अनेकदा त्यांचे परिणाम दीर्घकालीन व ऐतिहासिक स्वरूपाचे असतात.

## २. सुधारणा चळवळी (Reform Movements):

ज्या चळवळी समाजाच्या मूलभूत रचनेत फारसा बदल न करता, केवळ समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, आणि सामाजिक संस्थांतील त्रुटी दूर करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करतात त्यांना सुधारणावादी चळवळी (Reform Movements) असे म्हणतात. अशा चळवळी सुरू करणाऱ्या व्यक्तींना समाजसुधारक म्हणतात. या चळवळींचा उद्देश संपूर्ण सामाजिक व्यवस्था उलथवून टाकणे हा नसतो, तर त्या व्यवस्थेत राहूनच तिचे दोष दूर करून सुधारणा घडवण्याचा प्रयत्न असतो. भारतामध्ये विशेषतः एकोणिसाव्या शतकात, ब्रिटिश कालखंडात या चळवळींना मोठी चालना मिळाली. राजा राममोहन रॉय यांच्यापासून सुरू झालेल्या या चळवळींनी भारतीय समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान, अस्पृश्यता, स्त्री-द्वेष, जातीभेद, सामाजिक विषमता याविरुद्ध आवाज उठवला. या चळवळींची सनदशीरता, अहिंसकता आणि जनजागृतीवर भर ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. समाजसुधारक आपले विचार पसरवण्यासाठी सभा, संमेलने, लेख, व्याख्याने, शैक्षणिक चळवळी यांचा वापर करतात. लोकशाही समाजरचनेत व्यक्तिस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य असल्यामुळे अशा सुधारणा चळवळी घडून येण्यास अनुकूल वातावरण असते. उदा. ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, आणि सत्यशोधक समाज यांसारख्या चळवळींनी धार्मिक सुधारणा आणि सामाजिक समता यावर भर दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्पृश्योद्धार चळवळ ही सामाजिक विषमतेविरुद्धची व्यापक लढाई होती. महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षण आणि विधवांविवाहासाठी कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराचा ध्यास घेतला. बाबा आढाव यांची एक गाव, एक पाणवठा ही चळवळ सामाजिक समतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल होती.

सुधारणावादी चळवळी या समाजाच्या आतूनच सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. त्या क्रांतिकारक नसून परिवर्तनशील असतात. या चळवळींचा उद्देश समाजाच्या मूल्यांना पूर्णतः न नाकारता, त्यातील दोष दूर करून अधिक मानवतावादी व समतावादी समाज निर्माण करणे हा असतो. यामुळे या चळवळी प्रस्थापित सामाजिक व्यवस्था आणि नव्या मूल्यांमधील एक प्रकारचे सामंजस्यपूर्ण संक्रमण घडवून आणतात. अहिंसक मार्ग, शैक्षणिक आणि बौद्धिक प्रभाव, तसेच लोकजागृती हे या चळवळींचे प्रभावी माध्यम असल्याने त्यांना समाजातील विविध स्तरांचा पाठिंबा लाभतो. भारताच्या सामाजिक पुनर्रचनेत आणि आधुनिकतेकडे वाटचालीत सुधारणावादी चळवळींचे महत्त्व अत्यंत मूलगामी ठरले आहे.

### ३. क्रांतिकारी चळवळ (Revolutionary Movements) :

जेव्हा एखाद्या समाजव्यवस्थेत अचानक, व्यापक आणि मूलगामी बदल घडून येतो तेव्हा त्याला क्रांती (Revolution) असे म्हणतात. असे बदल जलद घडतात व अनेकदा हिंसात्मक मार्गांनी घडवले जातात आणि प्रचलित व्यवस्था पूर्णपणे नष्ट करून नवीन सामाजिक रचना निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. या बदलांसाठी केलेल्या चळवळींना क्रांतिकारी चळवळी असे म्हणतात. उदा. अमेरिकेत घडून आलेल्या राज्यक्रांतीमुळे ब्रिटिश सत्तेचा अंत होऊन स्वतंत्र अमेरिका उदयास आली. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राजेशाही, विषमता आणि दडपशाही संपून समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांवर आधारित लोकशाही समाजव्यवस्था उभारली. रशियन राज्यक्रांतीमुळे झारच्या सत्तेचा पूर्ण नाश करून साम्यवादी शासन प्रस्थापित झाले. क्रांतिकारी चळवळी सामान्यतः हिंसात्मक संघर्ष, संघर्षमय आंदोलन, आणि सत्तांतराचे माध्यम बनतात. त्यामुळे या चळवळींमुळे समाजात मोठा गोंधळ, अस्थिरता आणि सामान्य जनतेवर संकट येते. त्यामुळे अशा चळवळी अनेकदा अवांछनीय मानल्या जातात.

लोकशाही व्यवस्था असलेल्या समाजांमध्ये सुधारणावादी चळवळींना वाव मिळतो, कारण विचारस्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्य असल्याने समाजबदल शांतीपूर्ण मार्गाने शक्य होतो. पण जेव्हा सामाजिक, आर्थिक वा राजकीय परिस्थिती अत्यंत अन्यायकारक आणि दडपशाहीपूर्ण होते, तेव्हा क्रांती ही अपरिहार्य होते. अनेक वेळा क्रांती घडवणाऱ्या व्यक्तींना किंवा गटांना दुसरा कोणताही शांत मार्ग उपलब्धच नसतो. त्यामुळे ते संपूर्ण व्यवस्था उलथवून टाकण्याचा मार्ग स्वीकारतात. या चळवळी समाजव्यवस्थेत झपाट्याने परिवर्तन घडवून आणतात, परंतु त्याबरोबर सामाजिक अस्थिरता, हिंसा आणि व्यापक उलथापालथ देखील घडवतात. म्हणूनच इतिहासात अशा चळवळी सामाजिक प्रगतीच्या टप्प्यांप्रमाणे घडतात. पण त्यांचे परिणाम दूरगामी स्वरूपाचे आणि कधी आशादायक, तर कधी विनाशकारी असतात.

### ४. आविष्कृत किंवा अभिव्यक्ती चळवळ (Expressive Movements):

लोकांना प्रचलित समाजव्यवस्था जाचक, अन्यायकारक आणि त्रासदायक वाटते. पण त्यात प्रत्यक्ष बदल घडवून आणण्याची क्षमता नसते आणि त्यातून बाहेर पडण्याचाही मार्ग उपलब्ध नसतो. तेव्हा अभिव्यक्ती चळवळीचा उदय होतो. अशा परिस्थितीत व्यक्ती या व्यवस्थेपासून पूर्णतः सुटका करू शकत नाही. त्यामुळे ती स्वतःच्या जीवनशैलीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करते. ही अभिव्यक्ती विविध माध्यमांतून दिसून येते. उदा. नृत्य, संगीत, खेळ, जुगार, मद्यपान किंवा धार्मिक पूजा-अर्चा इत्यादी. हे सर्व प्रयत्न व्यक्तीच्या अंतर्गत असंतोषाची आणि नैराश्याची अभिव्यक्ती असतात. या चळवळीचा मुख्य उद्देश समाजात बदल घडवण्याऐवजी स्वतःच्या भावनिक आणि मानसिक तणावाला वाट मोकळी करून देणे हा असतो. व्यक्ती समाजाच्या वास्तविक समस्यांपासून स्वतःला तात्पुरते दूर ठेवण्याचा प्रयत्न करते. उदा. पाश्चिमात्य समाजात निर्माण झालेली 'हिप्पी चळवळ' किंवा 'हरे राम हरे कृष्ण' चळवळ यांचा समावेश अभिव्यक्ती चळवळींत केला जातो. या चळवळीत सहभागी लोक परंपरागत जीवनशैलीला नकार देऊन आत्माभिव्यक्तीचे नवे मार्ग शोधतात.

अभिव्यक्ती चळवळ ही मूलतः एक आत्मकेंद्रित सामाजिक प्रतिक्रिया आहे. ती थेट सामाजिक रचना बदलण्याचा प्रयत्न करत नाही. पण व्यक्तींच्या मानसिक असंतोषाला आणि असहायतेला अभिव्यक्त करण्याचे साधन ठरते. या प्रकारच्या चळवळी समाजाच्या मूळ समस्यांवर उपचार करत नाहीत. पण त्या समस्यांचा

परिणाम म्हणून उद्भवलेल्या भावनिक अस्वस्थतेला व्यक्त करण्याचे माध्यम होतात. त्यामुळे काही वेळा या चळवळी सकारात्मक स्वरूप घेऊ शकतात, तर काही वेळा स्वतःला आणि समाजाला तोटादायक ठरू शकतात. या चळवळींचे अस्तित्व हे समाजातील अंतर्गत असंतोषाचा लक्षणीय संकेत असते आणि म्हणूनच त्या सामाजिक अभ्यासात महत्त्वाच्या ठरतात.

### ५. आदर्शवादी चळवळ (Utopian Movements)

विद्यमान समाजव्यवस्था ही अन्यायकारी, विषमतेने भरलेली आणि शोषणावर आधारित असल्याचे लोकांना जाणवते. अशावेळी त्या व्यवस्थेच्या विरोधात एक नवीन, निर्दोष आणि परिपूर्ण समाजव्यवस्थेची कल्पना उदयास येते. अशा कल्पित, आदर्श समाजव्यवस्थेची निर्मिती करण्याच्या उद्देशाने सुरू होणाऱ्या चळवळींना स्वप्नाळू किंवा आदर्शवादी चळवळ असे म्हणतात. या चळवळीत सहभागी असलेले विचारवंत आणि त्यांच्या अनुयायांचे मत असते की, संपूर्ण समाजात एकाच वेळी परिवर्तन घडवणे कठीण असले तरी लहान समुदायात आदर्श समाजरचना प्रस्थापित करता येईल. ही प्रयोगशील आदर्श व्यवस्था यशस्वी ठरल्यास ती सर्व समाजात विस्तारली जाऊ शकते. उदा. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यांनी आपल्या प्रसिद्ध ग्रंथ 'रिपब्लिक' मध्ये आदर्श राज्याची संकल्पना मांडली आहे. तसेच सर थॉमस मूर यांनी 'युटोपिया' या ग्रंथात अशाच परिपूर्ण राज्याची चित्रमय रचना सादर केली आहे. जरी या आदर्श व्यवस्था वास्तवात पूर्णतः अमलात आणल्या गेल्या नसल्या, तरी त्यांचे विचार प्रेरणादायी ठरले. भारतीय समाजाच्या संदर्भात महात्मा गांधींची 'सर्वोदय चळवळ' आणि विनोबा भावे यांची 'भूदान चळवळ' ह्या दोन्ही चळवळी आदर्शवादी चळवळींचे उत्तम उदाहरण मानल्या जातात. या चळवळींचा उद्देश समाजातील विषमता, शोषण आणि दारिद्र्य नष्ट करून समताधिष्ठित समाज निर्माण करणे हाच होता.

स्वप्नाळू किंवा आदर्शवादी चळवळी या समाजातील असमाधान, अन्याय आणि विषमतेच्या विरोधात साकार झालेल्या असतात. त्यांचा आधार वास्तवाच्या विश्लेषणावर कमी आणि कल्पनेवर अधिक असतो. या चळवळी प्रतिक्रियात्मक नसून दृष्टिकोनात्मक असतात. त्या केवळ विद्यमान व्यवस्थेवर टीका करत नाहीत, तर तिच्या ऐवजी एका नवीन, नितीमान समाजाची रचना सुचवतात. मात्र अशा चळवळी व्यवहारात अंमलात आणणे अत्यंत कठीण असते. कारण त्या मानवस्वभाव, राजकीय स्वार्थ, सामाजिक विविधता आणि आर्थिक मर्यादा या साऱ्यांवर मात करण्याचा प्रयत्न करतात. तरीही या चळवळी समाजाला प्रेरणा देतात, नव्या विचारांची दिशा देतात आणि किमान लहान समुदायांमध्ये प्रयोगशिलतेला चालना देतात. त्यामुळे त्यांचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व मोठे आहे.

### ६. प्रतिकार चळवळ (Resistance Movements) :

जेव्हा समाजात कोणते तरी विशिष्ट सामाजिक परिवर्तन होऊ नये किंवा झालेले परिवर्तन मागे घेण्यात यावे यासाठी काही व्यक्ती किंवा समूह सामूहिक प्रयत्न करतात तेव्हा अशा प्रयत्नांना प्रतिकार चळवळ म्हणतात. या चळवळींच्या मागे एक स्पष्ट भावना असते की, समाजात जे बदल घडत आहेत ते अनावश्यक, अतिशय जलद किंवा समाजासाठी हानिकारक आहेत. त्यामुळे त्या बदलांना प्रखर विरोध केला जातो.

समाजात सामाजिक परिवर्तनाची गती वाढल्यामुळे पारंपरिक किंवा जुनी व्यवस्था हळूहळू नष्ट होऊ लागते किंवा विस्कळीत होते. तिच्या जागी नवीन व्यवस्था आकार घेते. परंतु ही नवीन व्यवस्था समाजातील सर्वांसाठी फायदेशीर ठरतेच असे नाही. काही व्यक्ती वा समुदायांच्या हितसंबंधांना धक्का पोचतो. त्यांच्या सत्तास्थानाला, प्रतिष्ठेला किंवा सामाजिक भूमिकेला धोका निर्माण होतो. अशा वेळी ते बदल स्वीकारण्याऐवजी त्याविरोधात आवाज उठवला जातो. हा विरोध केवळ वैयक्तिक न राहता सामूहिक पातळीवर उभा राहतो आणि एक संगठित चळवळ तयार होते. तिलाच प्रतिकार चळवळ असे म्हटले जाते. उदा. जातवर्चस्व टिकवण्याच्या प्रयत्नात भारतात दलितोद्धार चळवळीना अनेक उच्चवर्णीय समूहांनी प्रतिकार केला. काही पारंपरिक समाज रचना असलेल्या भागांमध्ये स्त्री-शिक्षण, नोकरी, स्वातंत्र्य याच्या विरोधात चळवळी झाल्या. अनेक वेळा विकास प्रकल्प, महामार्ग, औद्योगिक वसाहती यांना स्थानिक लोकांनी त्यांच्या पर्यावरण, जमीन व संस्कृतीच्या रक्षणासाठी विरोध केला आहे.

प्रतिकार चळवळी या परिवर्तनाच्या प्रतिक्रियेतून जन्माला येतात. सामाजिक परिवर्तन जेव्हा वेगाने आणि व्यापक स्वरूपात घडते, तेव्हा समाजातील काही घटक अस्वस्थ होतात. विशेषतः जे घटक त्या जुन्या व्यवस्थेत लाभ घेणारे होते, त्यांना नवीन व्यवस्था स्वतःसाठी हानीकारक वाटते. परिणामी, या चळवळी केवळ बदलाला विरोध करणाऱ्या नसून त्या स्वतःच्या हिताचे रक्षण करणाऱ्या चळवळी असतात. कधी कधी अशा चळवळी समाजातील तणाव वाढवतात, परंतु काही वेळा त्या समाजबदलाच्या प्रक्रियेला संतुलित ठेवण्याचेही कार्य करतात. त्या समाजात कोणते बदल स्वीकारले जातात आणि कोणते नाकारले जातात हे ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. काही वेळा या चळवळी समाजप्रगती आडवतात, तर कधी त्या समाजासाठी आवश्यक असलेल्या समजूतदार बदलांचा मार्गही सुचवतात.

### १.३.३ सामाजिक चळवळीचे महत्त्व (Importance of Social Movements) :

सामाजिक चळवळींचा सामाजिक परिवर्तनाशी अगदी निकटचा संबंध आहे. समाज हा कधीही स्थिर असत नाही. समाजात सतत परिवर्तन किंवा बदल होत असतात. सामाजिक चळवळी या समाजव्यवस्थेतील एखाद्या क्षेत्रात किंवा संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणत असतात. म्हणजेच सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला चालना देत असतात व सामाजिक परिवर्तनातून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी मदत होत असते. सामाजिक चळवळी या अगदी ऐतिहासिक काळापासून चालत आलेल्या आहेत. अर्थात सामाजिक चळवळी या त्या त्या काळातील समाजातील सामाजिक परिस्थितीनुसार निर्माण होत असतात.

विशेषत: ब्रिटिश काळात अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या. उदा - अस्पृश्यता निर्मूलन चळवळ, आदिवासी चळवळ, शेतकरी चळवळ, स्त्री-शिक्षण चळवळ वगैरे, आधुनिक समाजात कामगार चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ, पर्यावरण चळवळ, राजकीय चळवळी अशा प्रकारच्या चळवळी अस्तित्त्वात आल्या. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून सामुहिकरित्या सामाजिक प्रश्न किंवा सामाजिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक चळवळींचे महत्त्व पुढील गोष्टींसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

**१) समाजसुधारणा :**

भारतात १९ व्या शतकात ब्रिटिश काळापासून समाजसुधारणा करण्याच्या प्रक्रियेला अधिक चालना मिळाली. अनेक समाजसुधारकांनी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून समाजसुधारणा करण्यास प्रारंभ केला. सामाजिक सुधारणेमागील प्रमुख उद्देश म्हणजे समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा नष्ट करणे, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार दूर करणे असा होता. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून कालांतराने समाजामधील अनेक अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करण्याबरोबरच समाजातील अनेक समस्या दूर करण्यासाठी देखील चळवळी निर्माण होत गेल्या. उदा. - देवदासी प्रथा, हुंडा प्रथा, अस्पृश्यता निवारण वगैरे त्याचबरोबर काही सुधारात्मक संघटना म्हणजे ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज अशा प्रकारच्या चळवळींमुळे समाजामध्ये सुधारणा घडून येण्यास मदत झाली. उदा - स्त्री-शिक्षण चळवळीमुळे स्त्रियांच्या विकासाला चालना मिळाली.

**२) सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण :**

सामाजिक चळवळींमुळे समाजात नेहमीच सामाजिक परिवर्तन घडून येत असते. सामाजिक चळवळी प्रामुख्याने जुन्या व अयोग्य व्यवस्थेला विरोध करतात आणि त्याचबरोबर नवनवीन तंत्रज्ञान शोधून सुधारात्मक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी सामाजिक चळवळींची गरज लागते. उदा - अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण वगैरे. सामाजिक परिवर्तन करणे म्हणजे समाजव्यवस्था सुसंरचित करणे होय. चळवळींमुळे समाजात योग्य परिवर्तन घडून येण्यास मदत होते.

**३) समाजातील अन्याय व अत्याचाराला विरोध करणे :**

सामाजिक चळवळी प्रामुख्याने समाजातील अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करतात. भारतीय समाजात गरीब, दलित, पीडीत, निराश्रीत, विधवा, महिला यांच्यावर अन्याय सतत होत आला आहे. म्हणून समाजातील काही समाजसुधारकांनी  याविरूद्ध लढा देण्याचा प्रयत्न केला. या अत्याचाराविरोधी आंदोलनात प्रामुख्याने महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, आण्णाभाऊ साठे यांचा उल्लेख नक्कीच करावा लागेल. कारण त्यांनी समाजातील अनेक प्रकारच्या अन्यायाला प्रतिकार केला, आंदोलने केली. पूर्वी अन्यायाचा बिमोड करणारे कायदेही फारसे अस्तित्त्वात नव्हते. परंतु समाजसुधारकांच्या चळवळीमुळे त्याबाबत कायदे करण्याची जाणिव झाली. थोडक्यात, सामाजिक चळवळी समाजातील अन्यायाला व अत्याचाराला विरोध करतात व समाजात सुव्यवस्था निर्माण करणेचा प्रयत्न करतात.

**४) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे :**

सामाजिक चळवळींमुळे समाजातील वास्तव परिस्थिती लक्षात येते. ज्या ज्या वेळी समाजातील विशिष्ट घटकांवर अन्याय होतो किंवा त्यांना समाजापासून वंचित ठेवले जाते. समाजात असमानता निर्माण होते. अशा प्रत्येक वेळी सामाजिक चळवळी कार्यशील राहतात. जोपर्यंत समाजाला न्याय मिळत नाही तोपर्यंत त्या चळवळी प्रयत्न करत राहतात.

### ५) सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करणे :

काही वेळा समाजातील अनिष्ट रूढी-परंपरा समाजजीवन विस्कळीत करतात. जेव्हा नवीन सामाजिक मूल्ये समाजात परिवर्तन घडवून आणतात अशावेळी सामाजिक वर्तनावर नियंत्रण प्रस्थापित करण्याची आवश्यकता निर्माण होते. त्यावेळी तेथे सामाजिक चळवळी महत्त्वपूर्ण ठरतात. म्हणजेच सामाजिक चळवळी समाजावर नियंत्रण घालण्यासाठी मदत करतात.

### ६) सामाजिक समस्यांची जाणीव करून देतात :

सामाजिक चळवळीमुळे समाजातील सामाजिक समस्यांची जाणीव समाजाला व शासनाला करून देण्यास उपयोगी पडतात. सामाजिक चळवळींमुळे सामाजिक समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यास मदत होते. एखाद्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधण्यास उपयोगी पडतात.

### ७) सामाजिक समानता निर्माण करणे :

भारतीय समाजात अनेक बाबतीत विविधता दिसून येते. विविधतेमुळे समाजात विषमता निर्माण होत असते. उदा - जातिभेद, धार्मिक तणाव, वर्गकलह, उच्च-नीचता वगैरे. अशा गोष्टीमुळे समाजाची अधोगती होत असते. म्हणूनच समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि समाजात समानता, मानवता, बंधूता आणि विश्वशांती प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक चळवळी नेहमीच उपयुक्त ठरतात.

### ८) समाजात जनजागृती निर्माण करणे :

भारतीय समाजात विविध प्रकारचे प्रश्न व सामाजिक समस्या अस्तित्त्वात आहेत. या समस्यांचे निर्मूलन करावे व त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले जातात. परंतु ते करत असताना समाजामध्ये अशा परिस्थितीबाबत जाणीव जागृती करणे आवश्यक असते. त्यासाठी संघटनात्मक व्यवस्था निर्माण होणे ही गरजेचे असते. थोडक्यात, अशा सर्व गोष्टींची पूर्तता करणेसाठी म्हणजेच समाजातील समस्यांचे गांभिर्य समाजापर्यंत पोहचवण्याच्या दृष्टीने चळवळींच्या माध्यमातून जनजागृती निर्माण केली जाते.

थोडक्यात, सामाजिक चळवळी प्रामुख्याने मानवी जीवन सुरळीत चालविणेसाठी एकूण समाजव्यवस्था टिकून राहण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. एकात्मता, समाजनिर्मिती, सुसंघटित समाज यासाठी सामाजिक चळवळी महत्त्वाच्या असतात.

## १.४ सारांश :

प्रस्तुत घटक सामाजिक चळवळी यामध्ये पहिल्या भागात आपल्याला सामाजिक चळवळीच्या विविध शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्येतून सामाजिक चळवळींचा अर्थ लक्षात येतो. त्याचबरोबर सामाजिक चळवळींच्या वैशिष्ट्यातून सामाजिक चळवळीचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. त्यानुसार असे लक्षात येते की, सामाजिक चळवळी ही सामाजिक परिवर्तनाची दूसरी बाजू आहे. समाजामध्ये योग्य परिवर्तन घडवून आणण्यासाठी व अयोग्य परिवर्तन रोखण्यासाठी कार्यरत असतात. सामाजिक चळवळी हा एक सामूहिक व संघटित असा वर्तन प्रकार आहे. ज्यामुळे समाजातील असंतोष दूर करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन कार्यरत राहतात. सामाजिक

चळवळींना यश मिळो वा ना मिळो परंतु समाजव्यवस्था सुरक्षित राहण्यास नक्कीच हितकारक ठरतात. त्यानंतर सामाजिक चळवळींच्या घटकांचा अभ्यास केला आहे. सामाजिक चळवळी कशा निर्माण होतात, त्या निर्माण होतील की नाही, यशस्वी होतील की नाही, तसेच लोकांचा पाठिंबा मिळेल की नाही याचे स्पष्टीकरण मिळते. एकूणच सामाजिक चळवळींच्या वरील अभ्यासावरून सामाजिक चळवळींचे महत्त्वही लक्षात येते. समाज जीवनासाठी सामाजिक चळवळी अत्यंत उपयुक्त ठरतात. हे चळवळींच्या महत्त्वाबाबतच्या स्पष्टीकरणातून मिळते.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### स्वयंअध्ययन प्रश्न – १

१) हार्टन व हंट – ''सामाजिक चळवळी म्हणजे अशा प्रकारचे सामूहिक प्रयत्न की, ज्यामुळे समाज किंवा त्यामधील सभासद यांच्यामध्ये परिवर्तन होण्यासाठी प्रेरणा दिली जाते किंवा प्रतिरोध केला जातो.''

२) सामाजिक चळवळींचा सामाजिक परितर्वनाशी निकटचा संबंध आहे.

३) समाजात असंतोषात्मक परिस्थिती निर्माण झाली की, सामाजिक चळवळींचा उदय होतो.

४) हे विधान बरोबर आहे.

५) सामाजिक चळवळीत यश मिळविण्यासाठी संघटितपणा आणि नेतृत्वाची जास्त गरज असते.

### स्वयंअध्ययन प्रश्न – २

१) संरचनात्मक तणाव ही संकल्पना नेल स्मेल्सर यांनी मांडली.

२) स्टॉकडल यांनी सामाजिक चळवळीबाबत पाच संरचानात्मक घटक सांगितले आहेत.

३) एखाद्या समाजातील प्रत्यक्ष असलेली सामाजिक परिस्थिती आणि समुहाचे आदर्श यामध्ये संघर्ष निर्माण झाला की संरचनात्मक तणाव निर्माण झाला असे म्हणतात.

## १.६ सरावासाठी प्रश्न :

### दीर्घोत्तरी प्रश्न :

१) सामाजिक चळवळीची व्याख्या सांगून सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये विशद करा.

२) सामाजिक चळवळींचा अर्थ सांगून सामाजिक चळवळीचे घटक विशद करा.

३) सामाजिक चळवळींचे महत्त्व स्पष्ट करा.

४) सामाजिक चळवळीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

### टीपा लिहा :

१) सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये.

२) स्टॉकडल यांचे सामाजिक चळवळीचे घटक.

३) नेल स्मेल्सर यांनी सांगितलेले सामाजिक चळवळीचे घटक.

४) सामाजिक चळवळीचे महत्त्व.

१) स्थलांतर चळवळ

२) सुधारणा चळवळ

३) क्रांतिकारी चळवळ

४) आविष्कृत किंवा अभिव्यक्ती चळवळ

५) आदर्शवादी चळवळ

६) प्रतिकार चळवळ

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Shaha Ghanashyam, (1990), Social Movements in India, Sage Publ, Delhi.

२) डॉ. साळुंखे सर्जेराव (१९९६) समाजशास्त्रीय मुलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

३) देवगावकर, डुमरे, भारतातील सामाजिक चळवळी, श्री साई प्रकाशन, नागपूर.

४) डॉ. विजय मारूळकर व डॉ. दयावती पाडळकर (२०१९), भारतातील सामाजिक चळवळी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


❑❑❑

# घटक – २
# दलित चळवळी
# (Dalit Movements)


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतातील दलित समस्या:

२.२.२ दलित चळवळीतील महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे योगदान

२.२.२ दलित चळवळीचे परिणाम:

२.२ सारांश

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठीचे प्रश्न

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके.


## २.० उद्दिष्टे :

सदर घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास–

१) भारतातील दलित समस्या समजून घेता येईल.

२) फुले, शाहू, आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान समजून घेण्यास मदत होईल.

३) दलित चळवळीचे परिणाम समजून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक :

भारतीय समाजामध्ये अनेक अनिष्ट रूढी आहेत. त्यापैकी अस्पृश्यता ही एक महत्त्वपूर्ण अशी रूढी मांनली जाते. माणूस म्हणून जगण्याचा हक्क या रूढी प्रथांनी हिरावून घेतला आहे. भारतामध्ये जाती व्यवस्था आणि चातुर्वर्ण्य व्यवस्था या पद्धतीतून अस्पृश्यतेचा उदय झाला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्गांची सेवा करण्यासाठी शूद्र वर्गाची निर्मिती करण्यात आली आहे. सुरुवातीला गुणांनुसार वर्ग निश्चित केला जात असे कालांतराने जन्मावर आधारित वर्गाची निश्चिती होऊ लागल्यामुळे वर्ग व्यवस्थेचे जातीव्यवस्थेत रूपांतर होऊ लागले. जात ही जन्मावर आधारित असल्याने जात बदलण्याचा प्रश्नच नव्हता. सर्व जातींना समान दर्जा

नसल्यामुळे समाज एकसंध राहिला नाही. त्यामुळे जातीमध्ये परस्पर देवाण-घेवाण ही ठप्प झाली. रोटी बंदी आणि बेटी बंदी समाजास बंदिस्त वर्गाचे स्वरूप लाभले. जातिव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज ज्ञानापासून वंचित राहिल्यामुळे धर्मग्रंथ पवित्र आहेत. त्याच सांगितलेल्या गोष्टी सत्य आहेत ही श्रद्धा दृढ झाल्यामुळे जातीव्यवस्थेला विरोध करणारां पाखंडी ठरला. मनुस्मृती सारख्या ग्रंथांनी जातीव्यवस्थेला नियमबद्ध केले. जाति भंग करणाऱ्याला कठोर शिक्षा सांगितल्या. कनिष्ठ जाती आणि स्त्रियांशी कठोर व्यवहार करण्यास मोकळीक दिली. त्यामुळे कनिष्ठ जातींना अमानुष वागणूक देण्यास सुरुवात केली. त्यातून अस्पृश्यतेसारखी अमानुष रूढी निर्माण झाली. अस्पृश्यांच्या स्पर्शापासून विटाळ, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश बंदी, मंदिरामध्ये प्रवेश बंदी, ज्ञान व शस्त्र धारण करण्यास बंदी, गावात निवासात बंदी इत्यादी बंधनामुळे अस्पृश्य समाज इतर समाजापासून अलग पडला. त्यांना साधे माणुसकीचे हक्कही नाकारण्यात आले.

भारतात अस्पृश्यतेची रूढी अत्यंत प्राचीन असून या रुढीला प्राचीन काळापासून विरोध झालेला दिसून येतो. भारतात वैदिक परंपरा आणि अवैदिक परंपरा या दोन परंपरा आहेत. वैदिक परंपरा अस्पृश्यतेच्या उगमाला मान्यता देणारी परंपरा मानली जाते. मात्र अवैदिक परंपरेचा आधार समानता असल्याने तिने अस्पृश्यतेला विरोध केलेला दिसतो. त्यात चार्वाक, शून्यवादी, सांख्यवादी, जैन तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान, रामानुचार्य, वल्लभाचार्य यांनी वैदिक परंपरेला विरोध करून समानता हे तत्त्व मांडून अस्पृश्यतेला विरोध केला. मध्ययुगात रामानंद, चैतन्य महाप्रभू, महानुभव पंथ, संत कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखा मेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी, रविदास, नरसी मेहता, गुरुनानक या संतांनी अस्पृश्यतेला विरोध केला. संतांनी जातीवादावर कठोर प्रहार केला. सर्व मानव ईश्वराची अपत्य असल्याने समान आहेत हा विचार मांडला. कर्नाटकात संत बसवेश्वर महाराज, महानुभव पंथातील चक्रधर स्वामींनी जातीव्यवस्था नाकारली. मात्र प्राचीन व मध्ययुगीन काळात जातीव्यवस्था नाकारण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाहीत. गौतम बुद्ध आणि महावीर यांचा अपवाद वगळता इतर पंथांच्या कार्यास समता निर्मिती अल्पप्रमाणात यश मिळाले. वारकरी व भागवत पंथ फक्त अध्यात्मिक क्षेत्रापुरता समतेचा पुरस्कार करीत होते. मध्ययुगात समता निर्मिती अध्यात्मिक कारणासाठी झालेली दिसते. त्याला काही अशी राजकीय परिस्थिती कारणीभूत मानली जाते. मात्र हे समता निर्मितीचे प्रयत्न अंत्यंत तोकडे वा मर्यादित होते.

ब्रिटीशांच्या आगमन आणि साम्राज्य स्थापनेपासून भारतीय समाजामध्ये अमुलाग्र बदल झालेले दिसतात. ब्रिटिश राजवटीच्या काळात सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळाला आणि त्यांनी लष्करात मोठ्या प्रमाणात अस्पृश्य समाजाच्या केलेल्या भरतीतून समाजात जागृतीस प्रारंभ झाला. पेशवाईच्या अत्याचारातून सुटका करून घेण्यासाठी भीमा कोरेगावच्या लढाईतील अस्पृश्यांनी प्राणांची बाजी लावून  विजय मिळवला. अस्पृश्यांच्या लढाऊ वृत्तीमुळे त्यांना इंग्रजांनी मोठ्या प्रमाणात सैन्यात प्रवेश दिला. सैन्यातील नोकरीमुळे या समाजाला आर्थिक स्थैर्य, शिक्षणाची संधी चालून आली. तसेच ब्रिटिशांच्या आगमनामुळे मोठ्या प्रमाणात भारतात ख्रिश्चन मिशनरी येऊ लागले. त्यांनी ख्रिश्चन धर्मातील समता तत्त्वाचा प्रचार व प्रसार सुरू केला. कनिष्ठ वर्गातील अनेक लोकांना या तत्त्वामुळे मुक्तीची अशा वाटू लागल्याने त्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शाळांमधून सर्व जाती धर्माचे लोक शिकू लागल्यामुळे अस्पृश्य व जातिव्यवस्थेच्या प्रश्नावर विचार होऊ लागला. ब्रिटीश शिक्षण पद्धतीतून महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारखे

विचारवंत निर्माण झाले. त्यांनी अस्पृश्यतेसारख्या अमानुष रूढी विरुद्ध जनजागृती करून ही रूढी नष्ट करण्यासाठी आंदोलने व चळवळी सुरू केल्या आणि चळवळीच्या दडपणातून ब्रिटिशांनी अस्पृश्यता निवारणासाठी कायदे केले. अस्पृश्यांना विविध क्षेत्रात प्रतिनिधित्व दिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय घटनेत कलम १७ नुसार अस्पृश्यता पाळणे गुन्हा ही तरतूद करण्यात आली. अशाप्रकारे वैदिक काळापासून घटनेच्या निर्मितीपर्यंत जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी आपणास सांगता येते.

### २.२ विषय विवेचन :

या घटकात तुम्ही दलित चळवळी अभ्यासणार आहात त्या दृष्टीकोनातून सदर घटकाचे प्रमुख भाग केलेले आहेत. यामध्ये दलित समस्या, फुले, शाहू, आंबेडकर यांचे दलित चळवळीतील योगदान, दलित चळवळीचे परिणाम यांचे सदर घटकात संपूर्ण विवेचन हे तटस्थ, दोषरहित, पारदर्शी आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून तसेच व्यापक रीतीने केलेले आहे. सदर अभ्यास विषय हा आपल्याला दलित चळवळ समजून घेण्यासाठी उपयुक्त असेल.

### २.२.१ भारतातील दलित समस्या : (Dalit Problems in India)

भारतात सुमारे ५००० वर्षापासून वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेत दलितावर अनेक बंधने व अपात्रता लादण्यात आल्या. जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे असे मूलभूत आणि मानवी हक्क त्यांना या व्यवस्थेने नाकारले. जीवनाच्या सर्वच बाबतीत त्याना वंचित ठेवण्यात आले त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला. परिणाम दलित हे अप्रगत किंवा मागासलेले राहिले. यातून त्यांच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नांच्या बाबतीत चर्चा करावी लागेल.

भारतीय जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर आधारित आहे. सिंधू संस्कृती ही भारतातील ज्ञात असलेली प्राचीन संस्कृती आहे. या संस्कृतीचा ऱ्हास होण्याच्या काळात भारताच्या वायव्य दिशेकडून आर्याचे भारतात आगमन झाले. आर्यांचा येथील स्थानिक लोकांशी संघर्ष झाला. या संघर्षात आर्य विजयी झाल्याने ते श्रेष्ठ व परिजन स्थानिक लोकांना कनिष्ठ अथवा दास्य समजू लागले. त्याबरोबरच भारतात येण्यापूर्वी आर्याकडे विवाह, खाने- पीने,सामाजिक संपर्क, शुद्धा- शुद्धता या कल्पना होत्या. यातूनच वर्ण व्यवस्था उदयास आली. आर्य हे राजन (योद्धे व उमराव) ब्राह्मण (पुरोहित) व वैश्य (शेतकरी) या तिन वर्णात विभागले गेले. पुढे राजन यालाच क्षत्रिय म्हंटले जाऊ लागले. राजाच्या सत्तेस दिव्यत्व बहाल करण्याचा अधिकार आपणाकडे घेऊन ब्राह्मण वर्गाने आपला दर्जा सर्वश्रेष्ठ बनवला. त्याखालोखाल क्षत्रियांचा व त्यानंतर वैश्यांचा दर्जा श्रेष्ठ ठरला. या तीन वर्णांना द्विज मानले गेले. या तीन द्विज वर्णाच्या बाहेरील लोकांचा शूद्र हा चौथा वर्ण मानून त्याचा दर्जा कनिष्ठ मांनला गेला. या चारं वर्णाचा व्यवसाय, परस्परसंबंध याबाबतचे निश्चित नियम करण्यात आले. यातून जी व्यवस्था उदयास आली तिलाच चातुर्वर्ण्य व्यवस्था म्हंटले जाऊ लागले. या वर्णाच्या बाहेर आणखी एक समुह निर्माण झाला. त्याला अतिशूद्र किंवा पंचम वर्ण असे नाव दिले गेले. कालांतराने लोकसंख्या वाढत गेली. समाजाच्या गरजा वाढत जाऊन त्यांच्या पूर्तीसाठी वेगवेगळे व्यवसाय उदयास आले. गरिबीत व्यवसाय करणाऱ्या समूहाची व्यवस्था लावण्यासाठी प्रत्येक वर्णाच्या अंतर्गत अनेक समूह व उपसमुह उदयास आले. या समूह व उप-समुहाना अनुक्रमे जाती व पोटजाती म्हटले जाऊ लागले. अतिशूद्र किंवा पंचम वर्णात ज्या जाती

व पोटजाती उदयास आल्या त्या वर्णव्यवस्थेने बाहेरील असल्याने त्यांचा सामाजिक दर्जा सर्वात कनिष्ठ मानला जावू लागला. शिवाय त्यांचे जे व्यवसाय होते ते घाणेरडे व अनुत्पादक असल्याने ते कनिष्ठ दर्जाचे मानले गेले. पुढेही व्यवसाय करणाऱ्या जाती पोटजातीनाही हीन, तुच्छ, घाणेरडे, अशुद्ध व अपवित्र मानले गेले आणि त्यांचा स्पर्श देखील अपवित्र मानून त्यांना सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रातून बहिष्कृत केले गेले. त्यांच्यावर अनेक अपात्रता लादल्या. अशा या जातींनाच अस्पृश्य जाती व त्या जातीच्या सदस्यांना अस्पृश्य म्हटले गेले. अशा या अस्पृश्य जाती सामाजिक जीवनातून बहिष्कृत झाल्या. त्यांना सर्व अधिकारापासून वंचित केले गेले. जीवनाच्या सर्व क्षेत्रात दाबून ठेवले. अशा या दबलेल्या, अडकलेल्या अस्पृश्यांना ब्रिटिश राजवटीत दलित म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा प्रकारे हे अस्पृश्य म्हणजेच दलित लोक भारतात हजारो वर्षे वंचित व उपेक्षित राहिल्याने त्यांच्या जीवनात विविध प्रकारचे प्रश्न निर्माण झाले. त्यापैकी ऐतिहासिक कालखंडात निर्माण झालेल्या सामाजिक-सांस्कृतिक समस्येचे स्वरूप त्याचे आर्थिक समस्येचे स्वरूप येथे अभ्यासणार आहोत. सद्यकालीन स्थितीमध्ये भारतीय समाजात परिवर्तन झाले असले तरी समूळ जाती नष्ट झाल्या नाहीत, उलट जातीवादी दृष्टिकोन अधिक दृढ होताना दिसत आहे. भारतीय समाजाची विभागणी ही असंख्य जाती मध्ये झालेली आहे. भारतातील जाती उच्च, निम्न दर्जाच्या आधारे प्रवर्ग पाडले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळून सात शतके झाली आहेत. भारतीय घटनेने कायद्याच्या तरतुदीतून अस्पृश्यता अथवा जातीयता नष्ट केलेली आहे. घटनेत व कायद्यात बदल झाला असला तरी लोकांच्या प्रवृत्तीत अथवा मानसिकतेमध्ये कोणत्याही प्रकारे परिवर्तन झालेले दिसून येत नाही. म्हणून दलितांच्या समस्येचा विचार करताना पुढील मुद्द्याच्या आधारे विचार करावा लागेल व त्या समस्या समजून घ्याव्या लागतील.

**१) सामाजिक समस्या :**

दलित समूहाच्या सामाजिक समस्या त्यांच्या वरील परंपरागत निर्बंधातूनच निर्माण झाल्या आहेत. ही बंधने समाजाच्या इतर घटकाकडून लादली गेली आहेत. हेच या समस्येचे मूळ आहे. दलित समुहाअंतर्गत सुद्धा श्रेष्ठता व कनिष्ठता असल्याचे दिसून येते. परिणामी या संपूर्ण जातींमध्ये संवाद न्यूनगंडाची भावना निर्माण झाली आहे. तसेच श्रेष्ठता व कनिष्ठता यांना मान्यता देण्याच्या वृत्तीत या जाती समूहामध्ये सामाजिक गतिशीलतातेचा अभाव निर्माण झाला आहे. अंधश्रद्धा, प्रथा व परंपरा याचे अनुकरण करणारी प्रवृत्ती यामुळे जाती समूहाला अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. गरीबी, कर्जबाजारीपणा, सामाजिक, अन्याय, सामाजिक शोषण, उपेक्षा आदींमुळे दलित समूहातील लोकांचे सामाजिक जीवन अतिशय दयनीय झाले आहे. पूर्वाश्रमीच्या या दलित जातीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कनिष्ठ स्वरूपाचा होता. त्यांचा स्पर्श नव्हे तर त्यांची सावली सुद्धा अपवित्र मानली जात असे. निरनिराळ्या समाजातील स्तरिकरणाच्या प्रकारात श्रेष्ठ-कनिष्ठतेची कल्पना आहे, परंतु एका वर्गाकडून दुसऱ्या वर्णास अपमानित करण्याचा हा प्रकार फक्त दलित जातीव्यवस्थेतच आढळतो. दलित जाती सभासदावर होणारे अत्याचार ही वर्तमान काळातील ज्वलंत समस्या आहे. या अत्याचाराचे प्रमाण आजही उत्तर प्रदेश आणि बिहार मध्ये जास्त आहे. आजही आपण दलितांवर अन्याय, अत्याचार याच्या घटना विविध माध्यमातून पाहत आहोत. त्यामुळे त्यांच्या जीवनाला, प्रगतीला बाधा आलेली दिसते. दलितांना शतकानुशतके सामाजिक संघर्षात जीवन घालवावे लागल्याने या समस्या अधिकच जटिल झालेल्या दिसून

येतात. एकंदरीत भारतातील परिस्थितीत अनुसूचित जातीतील व्यक्तींना अनेक सामाजिक समस्यांचा सामना करावा लागत असून या समस्येमुळे त्यांना त्यांची प्रगतीपासून वंचित राहावे लागते.

**२) आर्थिक समस्या :**

दलितांना आजही गावकीची कामे, साफसफाईची कामे, वाद्य वाजवणे, दोर तयार करणे तसेच वरच्या जातीची चाकरी करावी लागत आहे. सर्व व्यवसाय मर्यादित उत्पन्न असलेले आणि नफा न देणारे होते. त्यामुळे त्यांचे जीवनमान निम्न प्रतीचे होते. किंबहुना आजही याच व्यवसायामध्ये दलित समाज जीवन जगताना दिसत आहे. त्यांना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. म्हणजे त्यांनी नेहमी गरीबीतच असावे ही व्यवस्था या जातीवर लादली गेली होती. प्रभावशाली लोक दलित घटकांना वेठबिगारीत ठेवून कोणतीही कामे करून घेत असत. त्यामुळे दलित जातीतील लोकांना दारिद्र्याचा प्रश्न किती तीव्र होता हे आपणास लक्षात येते. ग्रामीण समुदायातील बलुतेदारी पद्धतीमुळे दलित समुदायाचे जीवन परोपजीवी होते. बहुतांशी हे लोक भूमिहीन शेतमजूर किंवा अल्पभुधारक आहेत. वरिष्ठ जातीतील लोक वेगळ्या प्रकारे आजही त्यांचे आर्थिक शोषण करीत असतात व त्यांना नेहमी अडचणीत आणतात. दलितांना अस्पृश्य ही म्हटले जाते. म्हणून अस्पृश्याच्या या अवस्थेचे वर्णन करताना सरदार पणीकर म्हणतात, ''अस्पृश्यांची अवस्था गुलामापेक्षाही वाईट होती.'' विचारवंत डॉ. पटाभी सीताराम्या म्हणतात, ''बिचारा हरिजन कृषि-श्रमिक आपला संपूर्ण दिवस मातीवर, चिखलात घालवतो, अर्धपोटी राहून काम करतो, ऊन पावसात व वादळात देखील त्याला विश्रांती मिळत नाही व हे सर्व सहन केल्यावर देखील त्याच्या जवळ इतकी जमीन नाही की, तो स्वतःकरता शेती करू शकेल किंवा स्वतःचे घर बांधू शकेल.'' तो धान्य पिकवतो, आमची गोदामे भरतो, परंतु त्या विहिरीच्या पाण्यास स्पर्श करू शकत नाही. तो तलावाची सफाई करतो, परंतु जेव्हा तलाव पाण्याने भरतात, तेव्हा त्यास त्यातील पाण्यापासून दूर जावे लागते. आज दलित समाज शेतमजुरी, परंपरागत व्यवसाय करून तुटपुंजे वेतन मिळवतो. त्या आधारावर तो स्वतःचा चरितार्थ चालवतो. अशाप्रकारे दलित जातीतील लोकांच्या आर्थिक समस्या अत्यंत वाईट स्वरूपाच्या असून यावरून त्यांची प्रगती न होता अधोगतीच होताना दिसते. त्याचबरोबर सुविधांपासून वंचित होताना दिसत आहेत.

आर्थिक प्रश्नामध्ये भूमिहीनता, अल्प मजुरी पारंपारिक व्यवसाय उध्वस्त, व्यवसाय स्वातंत्र्याचा अभाव, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, नोकऱ्यांतील आरक्षण डावलणे, वशिला व लाच लुचपत. इ.

**३) शैक्षणिक समस्या :**

दलित समुदायात शिक्षणाचे प्रमाण नगण्य होतें. कारण समाजातील संकेतानुसार दलित सदस्यांना शिक्षणाचा अधिकार व्यवस्थेने नाकारला होता, अध्ययन अध्यापन यापासून त्यांना वंचित ठेवण्यात आले होते. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणानंतर शिक्षणाच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली दिसून येते. परंतु अध्याप समाधानकारक प्रगती झालेली दिसून येत नाही. शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे. म्हणून दलित शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येते. थोडक्यात दलित जातीतील काही जातींनी स्तुत्य शैक्षणिक प्रगती केली असली तरी बहुतांश जातीमध्ये शिक्षणाबाबत उदासिनता दिसून येते. त्यामुळे ते त्यांच्या

प्रगतीपासून वंचित राहिल्याचे दिसतात. त्याचबरोबर निरक्षरता, गळतीचा प्रश्न, आरक्षण डावलणे, आर्थिक क्षमता, बाहेरचे उच्च शिक्षण, पक्षपाती वागणूक इत्यादी समस्या आणि आव्हाने दलितासमोर आहेत.

**४) धार्मिक समस्या :**

दलितांच्या प्रमुख समस्या धार्मिक स्वरूपाच्या होत्या, आजही आहेत. धार्मिक तत्त्वाचा आधार घेऊनच स्पृश्य-अस्पृश्य भेद निर्माण करण्यात आला. अनुसूचित जाती मध्ये प्रामुख्याने हिंदू, बौद्ध, शिख इत्यादी धर्मातील लोकांचा समावेश होतो. हिंदू धर्मातील दलित जातीवर अनेक धार्मिक बंधने होती. वेद, उपनिषदे, स्मृती इत्यादी ग्रंथांच्या पठनाचा अधिकार नव्हता. अस्पृश्यांना मंदिरामध्ये प्रवेश नव्हता, सर्वसामान्य जनांच्या स्मशानभूमीत अस्पृश्यांना अग्नी संस्कार करता येत नव्हता. ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करत नव्हते. किंबहुना आज ही अग्निसंस्कार नाकारले आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील बोरगाव येथील मातंग समाजातील प्रेताची विटंबना होय. ही घटना इतकी भयानक होती की, स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी जागा न दिल्याने प्रेत ग्रामपंचायती समोर दहन करावे लागले. थोडक्यात सांगायचे झाल्यास आज ही मंदिरात जाण्याचा हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अलीकडेच कोल्हापूर जिल्ह्यातील हिटणी या गावात डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केलेले मंदिर प्रवेश आंदोलन होय. आजही धर्माच्या नावावर दलित समाजाचे शोषण केले जात असल्याचे दिसून येते.

**५) राजकीय समस्या :**

राजकीय हक्क हासुद्धा एक घटनेत मिळालेला मूलभूत अधिकार आहे. ज्या नागरी सुविधांची सर्वसामान्य माणूस अपेक्षा करतो त्या सुविधांपासून दलित माणसाला आजही वंचित राहावे लागते. दलित आज राजकीय हक्कापासून फारच दूर आहे. आज पराकोटीची विषमता त्याच्या वाट्याला आली आहे. त्याचबरोबर राजकीय सहभाग समाधानकारक दिसून येत नाही. आधुनिक काळात लोकशाही प्रणाली दलित जातीचे प्रतिनिधी राखीव जागांवर निवडून जात आहेत. मात्र सत्तेतील सहभागाचे प्रमाण आजही फार कमी दिसून येते. प्राचीन काळात तसेच मध्ययुगीन काळात भारतात सर्वत्र राजेशाही होती. अगदी प्रारंभी, शूद्रांची काही राज्ये होती; पण काळाच्या ओघात ती उच्चवर्णीय राजाकडून नष्ट करण्यात आली आणि शूद्र हे राजकीयदृष्ट्या उच्चवर्णीयांच्या अंकित झाले. त्यांना राजकीय व प्रशासकीय कारभारात भाग घेता येत नव्हता. कोणत्याही विषयावर आपले मत देण्याचा किंवा मांडण्याचा हक्क नव्हता. त्यामुळे दलित हे राजकीय क्षेत्रापासून पूर्णपणे बहिष्कृत केले गेले होते. यातून राजकीय सहभागाचा हा प्रश्न निर्माण झाला. मध्य युगात भारतात प्रामुख्याने मुस्लीम राजवट होती. मुस्लिम राज्यकर्ते परकीय होते. त्यातील काहींनी भारतात इस्लाम धर्माचा प्रसार करण्यावर भर दिला. काहीनी त्यासाठी सक्तीचे धोरण राबवले. तर काहींनी विविध आमिषे दाखवून धर्मांतर घडवून आणण्यावर भर दिला. यासाठी त्यांना राजकीय, प्रशासकीय, लष्करी पदे देणे हे एक महत्त्वाचे आमिष होते. ही पदे मिळण्यासाठी हिंदू धर्मातील जाती भेदास कंटाळलेल्या कनिष्ठ जातीतील व्यक्तींनी म्हणजे दलितांनी इस्लाम धर्म स्वीकारला. राज्यकर्त्या वर्गाची जवळीक साधणे व राजकीय सत्ता मिळवणे या उद्देशाने असे धर्मांतर दलितांनी केले. त्यामुळे त्यांना काही प्रमाणात राजकीय लाभ झाला. तथापि अशा लाभार्थ्यांची संख्या अत्यल्प होती. बहुसंख्य दलित हे मुस्लीम राजवटीतही राजकीय हक्कापासून वंचित होते. ब्रिटिश राजवटीत दलितांच्या उन्नतीसाठी त्यांना

शिक्षण, संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा विचार सर्वप्रथम महात्मा फुले यांनी मांडला. त्यासाठी सरकारने दलितांना राजकीय, आर्थिक, शैक्षणिक सोयी-सवलती देण्याची मागणी त्यांनी केली. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानातील नोकऱ्यांमध्ये दलितांसाठी राखीव जागा ठेवल्या. त्याचे अनुकरण करून म्हैसूर व मद्रास प्रांतात दलितांसाठी नोकऱ्यात राखीव जागा ठेवल्या. परिणामी, दलितांना प्रशासकीय क्षेत्रात प्रवेश मिळाला.

पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांना राजकीय सत्तेत वाटा मिळाला पाहिजे अशी भूमिका घेतली. गोलमेज परिषदेत तर स्वतंत्र मतदार संघाची मागणी ब्रिटिश सरकारकडे त्यानी स्वतः केली. ही मागणी मान्य करून ब्रिटिश सरकारने जाती निवाडा जाहीर केला. तथापि महात्मा गांधीनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला विरोध करून आमरण उपोषण केले. त्यामुळे महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे करार होऊन दलितासाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवण्यासाठी त्यांनी राखीव जागा देण्याचे ठरले. त्यानुसार दलितांना प्रांतिक कायदेमंडळात १४८ तर केंद्रीय कायदेमंडळात उच्चवर्णीयांच्या संख्येत १/१० जागा राखीव ठेवण्यात आल्या. तसेच दर दहा वर्षांनी या राखीव जागांच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याचे ठरले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नाने संपूर्ण देशात १९४३ साली अनुसूचित जातीसाठी ८.३३ टक्के जागा राखीव ठेवल्या. पुढे १९४६ मध्ये हे प्रमाण १२.३३ टक्के इतके वाढले. अशाप्रकारे ब्रिटिश राजवटीत दलितांना राखीव जागाच्या स्वरुपात राजकीय सत्तेत वाटा मिळाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्य घटनेच्या कलम ३३० नुसार अनुसूचित जाती जमाती साठी लोकसभेत तर, कलम ३३२ नुसार घटक राज्याच्या विधानसभेत राखीव मतदारसंघ निर्माण केले. पुढे ज्या पंचायत राज्य व्यवस्थेत अनुसूचित जाती जमातीसाठी काही जागा राखीव ठेवल्या; पण त्याला घटनात्मक अधिष्ठान १९६७ मध्ये प्रशासन सुधारणा आयोगाने नेमलेल्या समितीने महिला व अनुसूचित जाती जमातीसाठी पंचायत राज व्यवस्थेत काही जागा राखीव ठेवण्याची शिफारस केली. पुढे १९९२ मध्ये ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज व्यवस्थेत व ७४ व्या घटना दुरुस्तीने नगरपरिषदेत व महानगरपालिकेत अनुसूचित जाती-जमाती साठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राखीव जागा ठेवण्यात आल्या. तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पद, पंचायत समितीचे सभापती पद व ग्रामपंचायतीचे सरपंचपद, नगराध्यक्ष व महापौर अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव ठेवले. याशिवाय इतर सर्व भारतीय नागरिकांप्रमाणेच दलितांना ही निवडणूक लढवणे, प्रचार करणे, मतदान करणे इत्यादी अधिकार दिले. याचा परिणाम म्हणून दलितांचा राजकीय सहभाग वाढला आहे. राजकीय नेतृत्व करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. त्यांच्या प्रश्नांची व समस्यांची सोडवणूक होण्यास मदत होत आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यामध्ये राजकीय जागृती निर्माण झालेली आहे. थोडक्यात, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलितांचे राजकीय सबलीकरण होण्यास मोठी चालना मिळाली आहे. तरीही दलितांचे राजकीय प्रश्न पूर्णपणे सुटले आहेत, असे मात्र म्हणता येणार नाही. आजही त्यांच्या राजकीय समस्यांचे स्वरूप गंभीर आहे. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**भेदभाव-**

राजकीय क्षेत्रात दलितांना जाती आधारित भेदभावास तोंड द्यावे लागते. कारण भारतीय समाजाची रचना ही जातीवर आधारित असल्याने श्रेष्ठ-कनिष्ठ भावना मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्यामुळे राजकीय क्षेत्रातील

उच्च जातीचे सदस्यही दलितांना तुच्छतेने वागवताना दिसतात. त्यांना पाठिंबा व सहकार्य देताना त्यांची अडवणूक करतात. त्यांच्यावर आपली मते व निर्णय लादतात. त्यामुळे दलित प्रतिनिधीचा अपेक्षित प्रभाव पडत नाही. केंद्रीय तसेच राज्याच्या कायदेमंडळात आणि पंचायत राज्यातील संस्था, नगरपालिका व महानगरपालिका उच्च जातीच्या लोकप्रतिनिधीचे वर्चस्व आढळते. बहुसंख्य दलित प्रतिनिधी हे या संस्थांमध्ये दुय्यम भूमिकेतून वावरताना दिसतात. एकंदरीत राजकीय क्षेत्रातील आरक्षणामुळे दलितांना राजकीय सत्ता मिळाली असली तरी त्यांना या क्षेत्रात अद्यापही दुय्यम स्थानच असल्याचे दिसते. दलित सदस्यांना गृहीत धरूनच उच्च जातीचे नेते निर्णय घेत असतात. याबरोबरच इतर अनेक समस्या दलिता समोर आहेत. त्या समस्या पैकी भेदभाव, राजकीय पक्षांच्या नेत्यांचा प्रभाव, कुमकुवत दलित पक्ष, बिगर राखीव जागांचा प्रश्न, राजकीय उदासीनता, परावलंबन, दलित महिलांचे प्रश्न अशाप्रकारे दलितांच्या राजकीय समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत. राजकीय क्षेत्रातही त्यांना जातीच्या आधारे होणाऱ्या भेदभावाशी तोंड द्यावे लागते. राजकीय पक्षाचे नेते दलित नेत्यावर प्रतिनिधी वर वर्चस्व गाजवतात. दलितांचे राजकीय पक्ष हे दुर्बल आहेत. त्यांना स्वतंत्रपणे सत्ता प्राप्ती करणे शक्य होत नाही. बहुसंख्य दलित हे अडाणी, निरक्षर, दरिद्री असल्याने ते राजकीय प्रक्रियेत उदासीन राहतात. त्यांच्यात अद्यापही पुरेसी राजकीय जागृती आलेली नाही. दलित महिलांचे राजकीय सबलीकरण होण्याच्या मार्गात तर लिंगभेद व जातिभेद असा दुहेरी अडथळा आहे.

### २.२.२ दलित चळवळीतील महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे योगदान

### २.२.१ प्रास्ताविक

भारतीय समाजव्यवस्था व समाज रचना ही जागतिक समूहाच्या दृष्टीने व विविध देशाच्या समाजाच्या तुलनेत ही खूपच वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण दिसून येते. भारत हा विविधतेनेनटलेला देश आहे. भारतात वांशिक, भाषिक व जातीय विविधता ही मोठ्या प्रमाणात आढळते. आज देशात २८ घटक राज्य व आठ केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आहेत असे असले तरी सर्वांची सामाजिक व सांस्कृतिक स्थिती ही एकमेकांपासून भिन्न आढळते. मुळातच विविधता हे आपल्या देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानलेले आहे.

या सर्व विविधतेत एकमेकापासून वेगळी करणारी व स्वतःचे अस्तित्व जाणून देणारी विविधता म्हणजे जातीय विविधता होय. गेल्या हजार वर्षापासून जातीय विविधता आपल्या देशात अस्तित्व करून आहे.

### वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था

हिंदू धर्मामध्ये चार वर्णाचे अस्तित्व मानले गेले. ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य व शूद्र या चार वर्णांचे रूपांतर पुढे अंदाजे चार हजार जातीत झालेले आहे. या सर्व वर्णात सर्वात कनिष्ठ वर्ण म्हणून शुद्राचा उल्लेख केला जाई व यातही शूद्र व अतिशूद्र अशी वर्गवारी करण्यात आली.

महात्मा फुलेंनी अति शूद्र वर्णाविषय आपले विचार मांडले होते त्यांच्या मते शूद्र वर्णांमध्ये भारतीय समाजात त्याकाळी अस्तित्वात असणाऱ्या हजारो इतर मागासवर्गीय जातीचा उल्लेख होत होता व अति शुद्र वर्णात आताच्या अनुसूचित जातीचा समाज होता.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर या समाज व्यवस्थेत थोडाफार फरक पडल्याचे दिसून येते. पूर्वी जातीय व्यवस्थेतुन वर्णव्यवस्था व वर्ण व्यवस्स्थेतून जातीवाद व अस्पृश्यतेची समस्या तीव्र बनलेली होती. ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा येथे प्रसार झाल्यामुळे अस्पृश्य व जातीव्यवस्थेच्या प्रश्नावर विचार होऊ लागला. ब्रिटिश शिक्षण पद्धतीचाच आधार घेऊन येथे महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. आंबेडकरांनी समाज प्रबोधनाची व अस्पृश्यता निवारणाची व दलित उद्धाराची चळवळ हाती घेतल्याचे दिसून येते व त्यांच्या माध्यमातूनच महाराष्ट्रात तरी अस्पृशता उद्धार व दलित चळवळीला एक वेगळे परिमाण प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## २.२. विषय विवेचन

प्रस्तुत्त घटकात तुम्ही दलित चळवळ, दलितांच्या विविध समस्या या चळवळीत महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान व या दलित व या समग्र दलित चळवळीचा महाराष्ट्र व देशाच्या समाजकारणावर व राजकारणावर काय परिणाम झाला हे पाहणार आहात.

### २.२.१ भारतातील दलित समस्या

भारतीय समाज व्यवस्थेचा आढावा घेतला तर गेल्या पाच हजार वर्षापासून जातिव्यवस्थेचा,वर्ण व्यवस्थेचा उगम झाल्याचे दिसून येते व यातूनच अस्पृश्यता व जातीय व्यवस्थेची समस्या ही निर्माण झाल्याचे दिसते या व्यवस्थेमध्ये जो खऱ्या अर्थाने पीडित वंचित राहिलेला वर्ग म्हणजे दलितांचा वर्ग आहे.हा दलित वर्ग नेमका कोण आहे हे पाहणे अगत्याचे ठरते.

**दलित म्हणजे कोण?**

म. ना. वानखेडे यांच्या मते ‘दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नाही तर जे जे पिळले गेलेले आहेत छळले गेलेले आहेत असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित व्याख्येत येतात.

नामदेव ढसाळ – ‘दलित म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती व आदिवासी होय’.

**दलितांच्या समस्या**

**१) सामाजिक समस्या–**

भारतातील दलित समाजाची ही सर्वात महत्त्वाची व ज्वलंत समस्या मानली जाते. आजही हा समाज गावकुसा बाहेरचा म्हणूनच ओळखला जातो सामाजिक उतरंडीमधील सर्वात खालचा कनिष्ठ समाज म्हणून दलित समाजाला आजही हिनवले जाते भारतात व खास करून महाराष्ट्राच्या अनुसूचित जाती ज्या आढळतात त्या जातीचा उल्लेख दलित म्हणून केला जातो इतर उच्चवर्णीयांच्या तुलनेत हा समाज सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या खूपच मागास मानला जातो या समाजावर शेकडो वर्षापासून जात व वर्णव्यवस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक बंधने लादण्यात आलेली आहेत. महाराष्ट्र एक पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जात असले तरी उत्तर भारतातील काही राज्यात खास करून उत्तर भारतातील काही राज्य ज्यांचा उल्लेख बिमारु राज्य म्हणून केला जातो त्यात उत्तर प्रदेश व बिहारमध्ये दलितांची सामाजिक स्थिती ही खूपच दयनीय असल्याचे मानले जाते.

**२) धार्मिक समस्या–**

प्राचीन काळापासून दलितांची ही प्रमुख समस्या मानलेली आहे. जी आजही समाजात अस्तित्वात आहे. धार्मिक तत्त्वाचा आधार घेऊनच अस्पृश्यतेची समस्या समाजात निर्माण झालेली आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात दलित समाजावर विविध प्रकारची धार्मिक बंधने ही लादलेली होती. ज्यात खास करून वेद, उपनिषदे, स्मृतिग्रंथाचे पठण करण्याचा अधिकार नव्हता. मंदिरामध्ये दलितांना प्रवेश नाकारलेला होता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात ही समस्या तीव्र बनली होती व आजच्या प्रगत समाजात ही समस्या अस्तित्वात आहे. सामूहिक अंत्यसंस्कार करण्यास सार्वजनिक स्मशानभूमीत आजही दलितांना रोखले जाते.

**३) आर्थिक समस्या–**

दलित वर्गामध्ये प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंत भेडसावणारी समस्या म्हणजे त्यांच्यातील आर्थिक समस्या होय आर्थिक समस्यात खास करून आर्थिक चनचन, मालमत्तेचा अभाव, संपत्तीचा अभाव भूमिहिणता, अल्प उत्पन्न गट, पारंपारिक स्वरूपाचा व्यवसाय, अल्पमजुरी किंवा मोबदला या सर्व घटकांचा समावेश होतो.

आर्थिक समस्येतूनच दलित समाजात गरिबी, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा वेठबिगारीची समस्या निर्माण झालेली आहे. आजही बहुतांश दलित समाज हा ग्रामीण भागातच राहत असल्यामुळे या वर्गात उदरनिर्वाहाची किंवा उपजीविकेची साधने उपलब्ध नाहीत. वर्षानुवर्ष वेठबिगारी,शेतमजुरीचे काम हे लोक करीत आलेले आहेत मुळातच पैशाचा भाव हे यांच्या दारिद्र्याचे कारण ठरत आहे त्यातल्या त्यात समाजातील उच्चवर्णीय लोक हे दलितांचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणात करतात.आजही उत्तर प्रदेश सारख्या राज्यात ठाकूर व बिहारमध्ये भूमीहार या जमीनदार जाती तेथील दलितांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक शोषण करतात.

**४) शैक्षणिक समस्या –**

प्राचीन काळापासून ते इंग्रजांचे आगमन होईपर्यंत समाजव्यवस्थेने धर्मशास्त्राचा चुकीचा आधार घेऊन दलित समाजावर हजारो वर्षापासून शिक्षण विषयी विविध बंधने लादलेली होती. धर्मशास्त्राच्या नियमानुसार समाजातील फक्त उच्चवर्णीय ब्राह्मण वर्गच शिक्षणासाठी पात्र मानला जायचा. व्यक्तींचा जन्म ज्या वर्णात किंवा जातीत झालेला आहे त्याच जातीचा पिढीजात व्यवसाय त्या व्यक्तीने केला पाहिजे असा अलिखित नियम समाजात रूढ होता व त्याचे कठोरपणे पालन हे तो समाज करायचा.

ब्रिटिशांच्या आधुनिक शैक्षणिक धोरणानुसार या वर्गात शिक्षणाची संधी प्राप्त झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्यासाठी आदर्शच ठरले. या वर्गास डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले पण आजही शिक्षणाचा प्रसार म्हणावा तेवढा या वर्गात झालेला नाही.आज या समाजात निरक्षरता, गळतीचा प्रश्न, उच्च शिक्षण घेण्याची आर्थिक क्षमता नसणे या सर्व समस्या या समाजात दिसत आहेत.

**४) राजकीय समस्या–**

राजकीय जनजागृतीचा किंवा राजकीय जाणीवांचा अभाव ही समस्या दलित समाजात प्रामुख्याने भेडसावत आहे. ब्रिटिश सत्ता असतानाच राजकीय हक्काची लढाई सुरू झाली होती त्याला कायदेशीर अधिकार

व अधिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरामुळे दलित समाजात राजकीय जनजागृती व जाणीव निर्माण झाल्याचे दिसते. राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी दलितांना राजकीय हक्क मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला होता पण काही समाजकंठकानी कायद्यात पळवाटा निर्माण करून दलितांचे राजकीय हक्क पळून लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी राजकीय आरक्षण हे मिळून दिले पण या राजकीय आरक्षणाचा दुरुपयोग काही समाजकंठक घेत आहेत. राज्यघटनेच्या कलम १५ व १६ अ च्या माध्यमातून दलितांना १५ टक्के आरक्षण लागू करण्यात आले पण आज अंमलबजावणीत ही त्रुटी दिसून येतात. अशाप्रकारे विविध प्रकारच्या समस्या दलित समाजात दिसून येत आहेत.

### २.२.२ महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील योगदान

देशात व महाराष्ट्रात जी दलित उद्धाराची चळवळ सुरू झाली त्यात बऱ्याच समाज सुधारकांनी व विचारवंतांनी योगदान दिल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात १९व्या शतकात खऱ्या अर्थाने दलित उद्धाराची चळवळ आकारास आल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारण फुले शाहू आंबेडकरांच्या नावाशिवाय पूर्णच होत नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील दलित चळवळ सुद्धा पूर्ण करण्यात महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रभागी असल्याचे दिसून येते. त्यांच्या दलित चळवळीतील योगदानाचा आढावा पुढीलप्रमाणे.

**अ) महात्मा फुलेंचे दलित चळवळीतील योगदान.**

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य समाज सुधारक म्हणून महात्मा फुलेंचे नाव अग्रभागी असल्याचे दिसून येते.महाराष्ट्रातील समाज सुधारनेचे जनक म्हणूनही त्यांच्यकडे पाहिले जाते. महात्मा फुलेंनी त्यांच्या सामाजिक कार्यामध्ये दलित समाजासाठी ही भरीव कार्य केल्याचे दिसून येते त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या चळवळीत त्यांच्यासोबत सक्रिय होत्या त्यांच्या योगदानाचा आढावा पुढीलप्रमाणे.

**महात्मा ज्योतिबा फुले– जीवन वृत्तांत**

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी माळी कुटुंबामध्ये झाला. व्यवसाय निमित्त त्यांच्या आजोबांनी गाव सोडल्यामुळे ते पुढे पुणे येथे स्थायिक झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे पुण्यातच झाले होते लहानपणापासूनच बंडखोर स्वभाव असल्यामुळे प्रस्थापित समाज व्यवस्थेला त्यांनी विरोध केलेला होता. शालेय जीवनात जातीवादाचा अनोखा अनुभव त्यांना आल्यामुळे त्यांच्याविरुद्ध संघर्ष करण्याचे त्यांनी निश्चित केले होते. दलित चळवळीला वेगवेगळ्या कोनातून त्यांनी आपले योगदान दिल्याचे दिसून येते.

**१) अस्पृश्य उद्धाराचे कार्य –**

महात्मा फुलेंचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने प्राचीन पुणे शहर होते ज्या शहरात पेशवाईचे साम्राज्य होते. त्या पेशव्याच्या गडामध्ये सामाजिक सुधारण्याचे धाडसी पाऊल महात्मा फुलेंनी टाकले होते.दलित समाजासाठी कार्य करत असताना त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी बरेचसे कार्य केल्याचे दिसून येते.

ज्या काळात अस्पृश्यांना गळ्यात मडके, कमरेला झाडू व हातात घुंगराची काठी घेऊन बाहेर भर उन्हात बाहेर पडण्याची सक्ती होती त्या समाजावरील अन्याय व अत्याचार दूर करण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले होते.

**२) दलित समाजात शिक्षणाचा प्रसार –**

त्या काळात पुणे संस्थानात दलित, महिला व शेतकरी या तिन्ही वर्गावर विविध सामाजिक बंधने लादलेले होते. शिक्षण घेण्यासही दलितांना बंदी घातलेली होती. पण महात्मा फुलेंनी शिक्षण उद्धाराचे कार्य करताना १८५२ मध्ये वेताळ पेठेत या वर्गासाठी शाळा सुरू केली. १८५३ मध्ये 'महार मांग वर्गाकरिता शिक्षण प्रसारक मंडळ' नावाची संस्था उभारली. १८५८ पर्यंत पुण्यात या समाजासाठी तीन शाळा सुरू केल्या.

**३) दलितासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा –**

महात्मा फुलेंच्या काळात दलित व अस्पृश्य समाजावर विविध प्रकारची बंधने लादण्यात आली होते. परिणामतः दलित समाजात पिण्याचे पाणी आणण्यासाठी कित्येक किलोमीटर गावाच्या बाहेर जावे लागे, पण शहरातील उच्चवर्णीय लोक मुबलक पाणीपुरवठा असताना देखील अस्पृश्य समाजास पाणी घेऊ देत नव्हता ही दलित समाजाची समस्या जाणून महात्मा फुलेंनी १८६८साली आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्य दलित वर्गासाठी खुला केला.

**४) गुलामगिरी ग्रंथाची निर्मिती –** महात्मा फुलेंनी समाजातील भयानक वास्तव्य सर्व शिक्षित लोकांपर्यंत पोहोचले जावे याकरिता गुलामगिरी ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथाच्या माध्यमातून समाजात निर्माण झालेली सामाजिक विषमता, अस्पृश्यतेवरील विविध जाचक पद्धतीवर सडकून टीका केली होती.

**५) सत्यशोधक समाजाची स्थापना –**

बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी समाजातील सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी महात्मा फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. या समाजाच्या माध्यमातून महात्मा फुलेंनी जातीव्यवस्थेस तीव्र विरोध केला, ब्राह्मणी वर्चस्वास विरोध केला व वेदाच्या निर्मितीसही विरोध केला. गुलामगिरी ग्रंथातच सत्यशोधक समाजाची तत्वे व विचार मांडलेली आहेत.

**ब) राजर्षी शाहू महाराज यांचे दलित चळवळीतील योगदान.**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचे आवर्जून नाव घेतले जाते. इतिहासत खऱ्या अर्थाने लोकराजा किंवा रयतेचा राजा म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. अशा या राजाने आपल्या सत्तेचा पूर्ण उपयोग समाजाच्या उद्धारासाठी व समाजातील सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी केला. महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळ सुरू करण्याचे श्रेय शाहू राजांनाच दिले जाते. आरक्षण व्यवस्थेचे जनक, वसतिगृह पद्धतीचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.

**जीवन वृत्तांत –**

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथे झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव व पित्याचे नाव जयसिंगराव व आईचे नाव राधाबाई साहेब होते. चौथे शिवाजी नी पुत्रीक मरण पावल्यामुळे

त्यांच्या महाराणी आनंदीबाई साहेब यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतराव यांना दत्तक घेतले. तेच छत्रपती शाहू महाराज होय.

कोल्हापूर संस्थांचा कार्यभार हाती घेतल्यानंतर राजे शाहूनी सर्व संस्थांनाचा यशस्वी दौरा केला त्यावेळी त्यांना संस्थानात सामाजिक विषमता ही मोठ्या प्रमाणात दिसून आली व त्याचवेळी संस्थांना मध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी निश्चय केला व यातूनच सामाजिक सुधारणांचे कार्य करीत असताना राजे शाहू नी दलित उद्धाराच्या चळवळीत मोठे योगदान दिले.

**१) अस्पृश्य उद्धार व अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य –**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जी अस्पृशता व जातिवाद व शिवा शिविचा प्रकार निर्माण झालेला होता तो नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता त्यांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला होता. गंगाराम कांबळे या महार समाजातील व्यक्तीस कोल्हापूर शहरातील भर चौकामध्ये चहाचे हॉटेल उघडून दिले होते. व प्रत्यक्ष ते तिथे स्वतः चहा पिण्यासाठी जात असत. घोडा गाडीचा कोचमन व त्यांच्या हत्तीचा माहूत हे देखील अस्पृश्य समाजातीलच नेमलेला होता. यातून त्यांना समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्याचा संदेश द्यावयाचा होता.

**२) अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न –** हजारो वर्षापासून जो समाज शिक्षणापासून वंचित होता त्यांना शिक्षित करण्याचा यशस्वी प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्य समाजासाठी मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. अस्पृश्य समाजातील मुलांच्या निवासासाठी १९०७ साली मिस क्लार्क वस्तीगृहाची स्थापना ही केली. तिथे दलित समाजातील सर्व विद्यार्थ्यांचे राहण्याची व खाण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. १९१९ च्या हुकूमनुसार कोणत्याही शिक्षकाने विद्यार्थ्यांशी अस्पृश्यता पाळू नये असा अध्यादेश हे जारी केला.

**३) सामाजिक आरक्षणाचा पुरस्कार –**

राजर्षी शाहू महाराजांचे दलित चळवळीतील सर्वात मोठे योगदान म्हणून त्यांच्या आरक्षण विषयक कार्याकडे पाहिले जाते. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात ५० टक्के आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. २६ जुलै १९०२ मध्ये आरक्षणाचा हा आदेश आपल्या संस्थानात जाहीर केला.

**४) हजेरी व वेट बिगारी पद्धत बंद –**

अस्पृशतामुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ ला मंजूर करण्यात आला व त्यानुसार अस्पृश्य वर्गावर लादलेली अमानुष पद्धती, हजेरीची पद्धत म्हणून याचा उल्लेख केला जायचा ती पद्धत बंद करण्यात आली. महार, मांग, चांभार व बेरड याकरिता जी वेट बिगारीची पद्धत होती ती कायद्याने बंद केले.

**५) वेटवरला पद्धत बंद –**

महार समाजासाठी हजेरी सारखीच वेटवरला पद्धत होती ती पूर्णता बंद केली. या पद्धतीत पाटील व कुलकर्णी महारांचे शोषण करीत असत. २६ जून १९१८ ला महार वतन ही बंद केले.

### ६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलित उद्धाराच्या चळवळीत पूर्ण सहकार्य –

हे देखील राजर्षी शाहू महाराजांचे दलित चळवळीतील मोठे योगदान मानले जाते. डॉ. आंबेडकर यांनी महाराष्ट्रात व देशात ही दलित उद्धराची चळवळ व्यापक प्रमाणावर सुरू केलेले होते त्या चळवळीला आर्थिक राजकीय व इतर प्रकारचे मोठ्या प्रमाणात सहकार्य राजर्षी शाहू महाराजांनी केलेले होते.

### क) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील योगदान –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ यांचे अतूट नाते मानले जाते. ज्या मागास महार जातीत बाबासाहेबांचा जन्म झाला ती पूर्वाश्रमीची अस्पृश्य म्हणून गणली गेलेली होती. मागास जातीत जन्मास येऊन त्या जातीवरील सर्व धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक बंधने मोडीत काढण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले होते.

### जीवन वृत्तांत–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये महू या ठिकाणी महार या अस्पृश्य जातीत झालेला होता. बालपणापासूनच अस्पृशतेचे चटके डॉ. आंबेडकरांनी सहन केले होते. त्यामुळे बालपणापासूनच या गोष्टींचा खोलवर परिणाम बाबासाहेबांच्या मनावर झालेला होता. बडोदा संस्थांची शिष्यवृत्ती घेऊन ते १९१३ ला अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठात शिकण्यासाठी गेले होते. तेथून परतल्यानंतर ठरलेल्या करारानुसार बडोदा संस्थानची ते नोकरीसाठी रुजू झाले पण तिथेही त्यांना अस्पृश्यतेचा धक्कादायक अनुभव आला व परिणामतः त्यांनी तेथील नोकरीचा राजीनामा देऊन सामाजिक कार्यात सक्रिय झाले.

दलितांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शाहू महाराज यांच्या प्रेरणेतून 'मूकनायक' हे मासिक सुरू केले. त्यानंतर 'जनता' व 'प्रबुद्ध' भारत ही वृत्तपत्रे हे त्यांनी सुरू केले. त्यांनी Who were Shudras, Buddha and his Dhamma, Untouchables इत्यादी ग्रंथ लिहून दलित समाजाच्या प्रश्नाला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. दलित चळवळीतील त्यांचे योगदान पुढीलप्रमाणे.

### १) दलित उद्धाराचे कार्य –

डॉ. बाबासाहेबांनी दलित चळवळीत योगदान देताना दलित उद्धाराचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे दिसून येते. अस्पृश्य समाजाचा उद्धार करण्यासाठी अस्पृश्य निवारण हे आपल्या कार्याचे ध्येय निश्चित केले.१९२४ मध्ये इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी अस्पृश्य बांधवांसाठी सभा, संमेलने, चर्चा,परिषदा व मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. दलित समाजाच्या समस्यांना वाचा फुटावी म्हणून मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत यासारखे वृत्तपत्रे हे त्यांनी नियमित सुरू केले. व या सर्व वृत्तपत्रातून दलित समाजाविषयी नियमित लिखाणही केले.

### २) बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना –

अस्पृश्य व खास करून दलित समाजात जनजागृती घडून आणण्याच्या दृष्टीने २० जुलै १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. या सभेचे प्रसिद्ध असे 'शिका संघटित व्हा व संघर्ष करा' हे ब्रीद

वाक्य होते या सभेच्या माध्यमातून समाजातील लोकांसाठी वाचनालय व रात्र शाळांची स्थापना करण्यात आली. दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, दलित समाजाची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारणे इत्यादी कार्य ही संस्था करीत होती..

**३) विविध शिक्षण संस्था व वसतिगृहाची उभारणी –**

दलित समाजातील प्रत्येक व्यक्तीने शिक्षित व्हावे मोठे व्हावे असे डॉक्टर आंबेडकरांचे स्वप्न होते व ते वास्तविक जीवनात किंवा सत्यात उतरावे म्हणून डॉ. आंबेडकरांनी १९४५ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती या संस्थेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली तर औरंगाबाद (संभाजीनगर) येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली व दलित वर्गात शिक्षणाविषयीची रुची निर्माण केली.

**४) समता सैनिक दलाची स्थापना–**

दलित समाजातील तरुणांमध्ये मानसिक व शारीरिक विकासाच्या दृष्टीने एक संघटनात्मक यंत्रणा अस्तित्वात असावी याकरिता डॉ. आंबेडकरांनी १९२६ मध्ये समता सैनिक दलाची स्थापना केली व दलित तरुणांना एकसंघ व अन्याय विरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यातून दिली.

**५) महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील हे एक महत्त्वाचे मोठे योगदान मानले जाते. महाडचा चवदार तलाव सर्व जाती जमातीसाठी नगरपालिकेने खुला केला होता पण अस्पृश्य वर्गस तिथे पाणी पिण्यास त्यांना परवानगी नव्हती. एवढेच नव्हे तर सवर्ण लोकांच्या पाळीव प्राण्यासही या तलावात परवानगी होती. पण दलितांना परवानगी नाकारण्यात आलेली होती या अन्यायी पद्धतीविरुद्ध डॉक्टर आंबेडकरांनी लढा देण्याचे निश्चित केले व त्यातूनच डॉ. आंबेडकरांनी २० मार्च १९२७ ला चवदार तळ्यांचा ऐतिहासिक सत्याग्रह केला.

**६) मनुस्मृतीचे दहन –**

प्राचीन हिंदू धर्मामध्ये धार्मिक अधिष्ठानाच्या माध्यमातून स्मृती व विविध धार्मिक ग्रंथ यास महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते. व त्याचे तंतोतंत पालन येथील समाज व्यवस्था करायचा. त्यापैकीच मनुस्मृती हा एक हिंदू समाजाचा धर्मग्रंथ होता व यात अस्पृश्य, महिला व शेतकरी या तीन वर्गाविषयी अतिशय जाचक बंधने लादलेले होते . तत्कालीन समाजातील सामाजिक विषमता, भेदभावाचे समर्थन हे धार्मिक ग्रंथ करायचे. त्यास जाहीर विरोध म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृतीचे जाहीर दहन केले.

**७) मंदिर प्रवेशाची चळवळ –**

धर्मशास्त्राचा चुकीचा आधार मानून व दाखवून देशातील दलितांना व अस्पृश्यवर्गांना सार्वजनिक मंदिरामध्ये प्रवेश नाकारलेला होता. पण देवापुढील ही विषमता व उच्च निचता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पूर्णतः अमान्य होती.त्यामुळे त्यांनी दलित चळवळीच्या माध्यमातून मंदिर प्रवेशाची चळवळ घडून आणली त्यातून त्यांनी ०२ मार्च १९३० मध्ये नाशिक मधील काळाराम मंदिर प्रवेश घडून आणला त्यानंतर पुण्यात ही पर्वती येथे मंदिर प्रवेश घडून आणला.

**८) राज्यघटनेच्या माध्यमातून सामाजिक समतेची निर्मिती –**

भारतीय राज्यघटना निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख होते. राज्यघटना लिखाण करण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले होते. राज्यघटनेतील प्रत्येक कलम मंजूर करताना त्यांनी व्यक्त केलेली मते व राज्यघटनेचा आराखडा तयार करताना घेतलेले श्रम यावर त्यांच्या विद्वत्तेची छाप पडल्याचे दिसून येते. त्या माध्यमातून त्यांनी २० नोव्हेंबर १९४८ रोजी १७ वे कलम संमत करून अस्पृश्यतेची रूढी परंपरा कायद्याने नष्ट केले. व त्यानुसार अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा मानला.

९) **इतर कार्य** – दलित चळवळीतील इतर कार्य पाहत असताना डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती, धर्मांतर, बौद्ध धम्माचा स्वीकार व विज्ञानवादाचा केलेला त्यांनी स्वीकार अशा कार्याचा उल्लेख केला जातो.

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित चळवळीतील योगदान आपणास सांगता येईल.

### २.२.३ दलित चळवळीचे परिणाम

**प्रस्तावना –**

भारतातील एक महत्त्वपूर्ण चळवळ म्हणून दलित चळवळीचा उल्लेख केला जातो.भारताचे सामाजिक व सांस्कृतिक परिणाम व चित्र बदलण्याचे महत्त्वाचे कार्य या चळवळीच्या माध्यमातून झाल्याचे दिसते प्रत्येक चळवळीचे त्या त्या समाजावर काहीतरी चांगले किंवा वाईटही परिणाम होत असल्याचे दिसून येतात.मुळात दलित चळवळ ही दलित व अस्पृश्य व समाजातील समस्या नष्ट करण्यासाठी व त्यांचे सर्वच प्रकारचे नैतिक अधिकार मिळवून देण्यासाठी देशभरामध्ये निर्माण झाल्याचे दिसून येते.

दलित चळवळीचे १९ व्या शतकापासून ते स्वातंत्र्योत्तर समाज व्यवस्थेत अस्तित्वात असलेल्या समाजावर खूपच व्यापक व खोलवर परिणाम झाल्याचे दिसून येते. महात्मा फुलेंनी महाराष्ट्रात सुरू केलेली ही चळवळ शाहू राजांच्या माध्यमातून वृद्धिंगत झालीच पण डॉ. आंबेडकरांच्या माध्यमातून या चळवळीत संविधानिक अधिष्ठान प्राप्त झाल्याचे दिसून येते. पुढे या दलित चळवळीचा आदर्श घेऊनच देशभरामध्ये आरक्षणाची चळवळ, शेतकऱ्यांच्या विविध चळवळी,महिलांच्या विविध चळवळी घडून आल्याचे दिसून येते. या सर्व चळवळीचे प्रेरणास्त्रोत हे दलित चळवळ असल्याचे दिसून येते. दलित चळवळीचा देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रावरही खोलवर परिणाम झाल्याचे दिसून येते. दलित चळवळीमुळे देशात सांस्कृतिक स्थित्यंतर झाल्याचे किंवा घडल्याचे दिसून येते. एक प्रकारे सक्रिय सामाजिक परिवर्तनाचा स्त्रोत म्हणूनच दलित चळवळीकडे पाहिले जाते. या चळवळीच्या प्रेरणा घेऊन देशात मंडल आयोगाची आरक्षण चळवळ सुरू झाले. तसे डॉ. आंबेडकर यासारख्या थोर व्यक्तीच्या माध्यमातून धार्मिक परिवर्तनाची ही चळवळ यातून निर्माण झाल्याचे दिसून येते या चळवळीचे झालेले परिणाम पुढीलप्रमाणे.

१) दलित चळवळीमुळे मूलभूत रित्या सामाजिक परिवर्तन घडून आले.

२) दलित समाजात हक्काची जाणीव निर्माण झाली.

३) दलित चळवळीमुळेच दलित समाज व अस्पृश्य समाजात मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार व शिक्षणाचे महत्त्व निर्माण झाले.

४) दलित चळवळीमुळेच उच्च शिक्षणाबद्दल जाणीव जनजागृती निर्माण झाली.

५) स्त्री शिक्षण व महिला विषयीच्या वेगवेगळ्या घटकात वैशिष्ट्यपूर्ण बदल यामुळे घडून आले.

६) समाजातील जातीयवाद व अस्पृश्यता काही प्रमाणात नष्ट होण्यास मदत झाली.

७) कायद्याचे राज्य किंवा संविधानिक मूल्य किंवा संविधानाचे महत्त्व या दलित चळवळीमुळे निर्माण झाले.

९) वंचित वर्गात परिवर्तनाचे वारे निर्माण झाले.

१०) दुर्लक्षित पीडित वंचित समाजात शिक्षण व धार्मिक बाबतीमध्ये जनजागृती निर्माण झाल्याचे दिसून येते

११) आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार हा कायदेशीर रीतीनेच केला पाहिजे याविषयीची जनजागृती या वर्गात निर्माण झाली.

१२) समाजात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे दलित व मागास समाजात निरक्षरतेचे प्रमाण हे अत्यल्प होत गेले.

१३) गावगाडा व इतर जाचक पद्धती ज्यातून या समाजावर अन्याय होत होता त्या सर्व पद्धती कायद्यानुसार बंद झाल्या.

१४) सुरुवातीस समाजात जे उच्चनीच्चतेची भावना निर्माण झालेली होती ती कमी व्हायला मदत झाली .

१५) कायद्याबद्दल, न्यायव्यवस्थेबद्दल, पोलीस व्यवस्थेबद्दल व संविधानिक पद्धतीबद्दल सामान्य जनतेत आदर निर्माण झाला.

१६) सर्व समाजातील लोकांनी एकत्र काम करण्याची प्रेरणा मिळाली व काही प्रमाणात भेदभाव कमी झाले. अश्याप्रकारे दलित चळवळीचे परिणाम समाज व्यवस्थेवर झाल्याचे आपणास सांगता येतील.

**३.२.२ प्रमुख दलित चळवळी : (Major Dalit Movement)**

**दलित चळवळीची व्याख्या व अर्थ :**

दलित चळवळ ही प्रामुख्याने पददलित,अस्पृश्य व हरिजणांची चळवळ आहे. या वर्गावर झालेल्या अन्यायातून ही चळवळ उभी राहिलेली दिसते. दलित हा शब्द चातुर्वनाशी निगडित आहे. चातुर्वर्णरुपी जात्यात भरडले गेलेले, चिरडले गेले वा दळले गेलेले किंवा जात असलेले पददलित म्हणजे दलित. हा शब्दप्रयोग सर्वप्रथम महात्मा फुले यांनी उपयोगात आणला होता.

डॉ. म. ना. वानखेडे- यांच्या मते दलित म्हणजे केवळ नवबौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले खेळले गेलेले सर्व श्रमजिवी आहेत ते पददलित आहेत.

**मार्क्सवादी विचारवंतांच्या मते –**

दलित चळवळ म्हणजे भारतातील जातीविरहित समाजाची रचना प्रस्थापित करणारी चळवळ होय.

**एन. त्रिपाठी –** यांच्या मते, समाजातील दबाव व नियंत्रण यापासून मुक्त व्हावे म्हणून जो सतत मार्ग शोधत त्या विषयाची चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

**न्यू कास –** यांच्या मते, जातीच्या ऐतिहासिक प्रभुत्वाचा विरोधात उभी राहणारी, सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी, नवीन साहित्य संस्कृती, नवीन बांधिलकी निर्माण करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय. भारतीय समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेत सर्वात शेवटचा वर्ग हा शुद्र होता. या वर्गावर होणारा अन्याय व अत्याचाराविरुद्ध ही चळवळ उभी राहिली तिलाच दलीत चळवळ असे म्हटले जाते. एकोणिसाव्या शतकातील एकनिष्ठता, व्यक्तिस्वातंत्र्य व समानता मूल्य प्रमाण मानून समाजातील सामाजिक आर्थिक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गात आणि समाज परिवर्तनासाठी सुरू केलेली चळवळ म्हणून या चळवळीचा विचार करता येतो. या चळवळीच्या माध्यमातून दलित वर्गाचा विचार करणेहीच प्रमुख भूमिका होती. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रमाणेच दलित चळवळ महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्थित्यंतर घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण मानली जाते.

**एन. त्रिपाठी –** यांच्या मते, समाजातील दबाव व नियंत्रण यापासून मुक्त व्हावे म्हणून जो सतत मार्ग शोधत त्या विषयाची चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

**३.४ अ) स्वयं अध्ययन प्रश्न (खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा.)**

१) कोणत्या महापुरुषाच्या विचाराचे परिणाम दलित समाजावर झाले?

२) कोणत्या कारणामुळे दलिता मध्ये त्यांच्या हक्काची जाणीव निर्माण झाली?

३) कोणी दलित बांधवासह २ मार्च१९३० रोजी सत्याग्रह केला.?

४) कोणाच्या प्रेरणेने महाराष्ट्रात त्यानंतर अनेक ठिकाणी मंदिर प्रवेश चळवळ सुरू झालेल्या दिसतात.

५) कोणत्या वर्षी दलित पँथर या संघटनेची स्थापना केली.?

६) ब्रिटीश शिक्षण पद्धतीतून कोणते विचारवंत निर्माण झाले?

७) चार्वाक, शून्यवादी, सांख्यवादी, जैन तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान, रामानुचार्य, वल्लभाचार्य यांनी कोणत्या परंपरेला विरोध करून समानता हे तत्त्व मांडून अस्पृश्यतेला विरोध केला?

८) कोणत्या युगात रामानंद, चैतन्य महाप्रभू, महानुभव पंथ, संत कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखा मेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी, रविदास, नरसी मेहता, गुरुनानक या संतांनी अस्पृश्यतेला विरोध केला.

९) कर्नाटकात कोणी जातीव्यवस्था नाकारली?

१०) कोणत्या शैक्षणिक समस्या आणि आव्हाने दलिता समोर आहेत?

११) कोणी पुणे शहरात अस्पृश्य उद्धाराची चळवळ चालवली?

१२) महात्मा गांधी व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यात कोणत्या करार होऊन दलितासाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवण्यासाठी त्यांनी राखीव जागा देण्याचे ठरले?

१३) घटनेतील कोणत्या कलमानुसार दलितांना लोकसभेत आरक्षण देण्यात आले.

१४) कोणत्या कलमा नुसार घटक राज्याच्या विधानसभेत राखीव मतदारसंघ निर्माण केले गेले.

१५) १८७७ साली कोणाच्या मदतीने दीनबंधू हे फुलेनी साप्ताहिक काढले.

१६) १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापनाकोणी केली?

१७) अस्पृश्य मुलांसाठी शाळा वस्तीग्रह काढून त्यांना विद्येची कास धरण्याचे आवाहन कोणी केले? महात्मा फुले यांना कोणी आपले गुरु मानले आहे.

१८) डॉ. आंबेडकरांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिका व इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी कोणी पाठवले?

१९) १९०६ रोजी 'डिस्प्रेड क्लास मिशन सोसायटी'या संस्थेची मुंबई स्थापना कोणी केली.

२०) Caste in India, Thought on Pakistan, Untouchables, Buddha and Karl Marx, Buddha and his Dhamma, Who Were Shudras, States and Minorities इत्यादी ग्रंथ लिहून दलित प्रश्नाला वैचारिक चौकट कोणी उपलब्ध करून दिली.

२१) दलित चळवळीनेकोणती पुढील परिवर्तने झाली कोणतीही तिन परिवर्तने? दलित चळवळीमुळे कोणते तीन परिणाम झाले?

२२) दलित म्हणजे कोण?

२३) दलित चळवळ म्हणजे काय?

२४) प्राचीन भारतीय समाजात किती वर्ण सांगण्यात आलेले आहेत?

२५) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?

२६) शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाचे लेखन कोणी केले?

२७) पुणे शहरात दलित समाजासाठी शाळा कोणी सुरू केल्या?

२८) भारतामध्ये पहिल्यांदा आरक्षण पद्धती कोणी सुरू केली?

२९) दलित म्हणजे कोण?

३०) बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना कोणी केली?

३१) पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना कोणी केली?

३२) मिलिंद महाविद्यालयाची स्थापना कुठल्या शहरात करण्यात आली?

३३) सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना कुठल्या शहरात करण्यात आली?

३४) भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख कोण होते?

३५) पुणे शहरात दलित समाजाकरिता पिण्याच्या पाण्याचा हौद कोणी खुला केला?

३६) गुलामगिरी ग्रंथ कोणी लिहिला?

३७) कोल्हापूर शहरात गंगाराम कांबळे या व्यक्तीस चहाचे हॉटेल कोणी सुरू करून दिले?

३८) देशातील आरक्षणाचा पहिला अध्यादेश कधी जारी करण्यात आला?

**३.४ ब) स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे**

१) दलित समाजामध्ये फुले, शाहू,आंबेडकर,अण्णाभाऊ साठे, संत कबीर पेरियार, नारायण गुरु ह्या महापुरुषांच्या विचाराचे परिणाम होऊ लागले.

२) दलित चळवळीने

३) बाबासाहेब आंबेडकर

४) बाबासाहेब आंबेडकर यांच्या.

५) १९७२ रोजी.

६) महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारखे.

७) वैदिक

८) मध्ययुगात

९) संत बसवेश्वर महाराज महानुभव पंथातील चक्रधर स्वामींनी

१०) निरक्षरता, गळतीचा प्रश्न, आरक्षण डावलणे, आर्थिक क्षमता बाहेरचे उच्च शिक्षण, पक्षपाती वागणूक इत्यादी.

११) शिवराम जानबा कांबळे यांनी.

१२) पुणे

१३) ३३० नुसार

१४) ३३२

१५) कृष्णराव भालेराव यांच्या मदतीने ब्राह्मणी कर्मकांड व धर्माचे प्रस्थ कमी करण्यासाठी.

१६) महात्मा फुले

१७) महात्मा फुले

१८) बाबासाहेब आंबेडकर.

१९) सयाजीराव गायकवाड यांनी.

२०) विठ्ठल रामजी शिंदे

२१) बाबासाहेब आंबेडकर

२२) १. दलित चळवळीने दलित वर्गात त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली.

२. दलितांना जागृत व संघटित करण्याबरोबर सुसंस्कार आणि वैचारिक चौकट विकसित करून दलितांचे संस्कृतीकरण करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते.

३. दलित चळवळीने दलित प्रश्नांना उचलून धरले.त्यांच्यावरील अन्यायाविरोधात मोर्चे, आंदोलने, घेराव, आत्मदहन, सत्याग्रह केले.

२३) डॉ. म. ना. वानखेडे यांच्या मते, दलित म्हणजे केवळ नवबौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले, छळले गेलेले, सर्व श्रमजीवी आहेत ते सर्व दलित आहेत.

२४) न्यू कास- यांच्या मते, जातीच्या ऐतिहासिक प्रभुत्वाचा विरोधात उभी राहणारी, सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी, नवीन साहित्य संस्कृती, नवीन बांधिलकी निर्माण करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

२५) चार

२६) महात्मा फुले

२७) महात्मा फुले

२८) महात्मा फुले

२९) राजर्षी शाहू महाराज

३०) म. ना. वानखेडे यांच्या मते दलित म्हणजे केवळ नवबौध्द अथवा मागासर्गीय नव्हे तर जे पिळले छळ ले गेलेले सर्व श्रमजीवी आहेत ते सर्व दलित आहेत

३१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३३) छत्रपती संभाजी नगर

३४) मुंबई

३५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३६) महात्मा फुले

३७) महात्मा फुले

३८) राजर्षी शाहू महाराज

३८) २६ जुलै १९०२ रोजी

### ३.५ सरावासाठीचे प्रश्न : (विस्तृत  मांडणी करा)

१. भारतातील दलित समस्या यावर चर्चा करा?

२. दलित चळवळीतील डॉ. आंबेडकरांचे योगदान स्पष्ट करा.

३. दलित चळवळीचे परिणाम अभ्यासा.

४. भारतातील दलित समस्या यावर चर्चा करा

५. दलित चळवळीत महात्मा ज्योतिबा फुले यांचे योगदान स्पष्ट करा

६. दलित चळवळीत राजर्षी शाहू महाराजांचे योगदान यावर चर्चा करा

७. दलित चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान स्पष्ट करा.

८. दलित चळवळीचे भारतीय समाज व्यवस्थेवर झालेले परिणाम सांगा.

### ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. राम अहुजा सामाजिक समस्या, २०००, रावत पब्लिकेशन, जयपुर.

२. राम अहुजा सोशल प्रॉब्लेम इन इंडिया, २०१४, रावत पब्लिकेशन जयपुर.

३. अमोल महापुरे, कोल्हापुरातील सामाजिक चळवळ विशेष संदर्भ : दलित महासंघ अप्रकाशित

४. संशोधन लेख.

५. Ambedkar B. R. writing and speeches, Vol. 1 Edited by/moon Wasant, Dr. B. R. Ambedkar Source Matenal Publication Commttce Gov of Maharashtra 1979.

6. Page - No - 429, 430

७. http://shodhganga.inflibhet.ac.in/bitstream/10603/9684717107-Chapter - 202.Ph.

८. कीर धनंजय - महात्मा ज्योतिराव फुले : आमच्या समाज क्रांतीचे जनक

९. हरी नरके : आम्ही पाहिलेले महात्मा फुले

१०. कीर धनंजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र

११. कसबे रावसाहेब : आंबेडकर आणि मार्क्स

१२. जयसिंगराव पवार : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ

१३. माधवराव बागल : श्री शाहू महाराजांच्या आठवणी

१४. राम अहुजा : सामाजिक समस्या.


❑❑❑

# घटक – ३
# शेतकरी चळवळी
# (Peasant Movements)


३.१. उद्दिष्टये

३.२. प्रस्तावना

३.३. विषय विवेचन

  ३.३.१. भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या

  ३.३.२. महाराष्ट्रातील प्रमुख शेतकरी चळवळी

  ३.३.३.शेतकरी चळवळींचे परिणाम

३.४ सारांश

३.५. स्वयं –अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६. सरावासाठी प्रश्न

३.७. अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


**३.१. उद्दिष्टये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

* शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेता येतील.
* शेतकरी चळवळींचा इतिहास समजून घेता येतील.
* प्रमुख शेतकरी चळवळी जाणून घेता येतील.
* शेतकरी चळवळींचे समाजावरील परिणाम समजून घेता येतील.

**२.२. प्रस्तावना :**

पहिल्या युनिटमध्ये आपण समाजिक चळवळीचा अर्थ, स्वरूप आणि सामाजिक चळवळींची वैशिष्टये इत्यादीचे सविस्तर अध्ययन केले आहे. या दुसऱ्या प्रकरणात सर्व जगाचा खऱ्या सर्वार्थाने पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या चळवळींचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. एकविसाव्या शतकात

सर्वत्र नवतंत्रज्ञानाचा व सोशल मिडीयाचा बोलबाला प्रचंड प्रमाणात होत असतानाही आपल्याला भारतीय समाजातील जवळजवळ ६५ ते ७० टक्के लोक आजही शेती आणि शेतीसंबंधीत कार्याशी निगडित असल्याचे मान्य करावे लागते. त्याबरोबरीनेच शेतीक्षेत्रात घडणाऱ्या प्रत्येक बदलांचा परिणाम एकंदर भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो हे ही तितकेच खरे आहे. शेतकरी चळवळींना अगर आंदोलनांना जरी दीर्घ इतिहास लाभला असला तरी स्वातंत्र्योत्तर काळातच मुख्यतः १९७० नंतरच शेतकरी आंदोलने मोठया प्रमाणात झालेली आढळतात. या आंदोलनांद्वारे अगर चळवळींद्वारे शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या अत्यंत प्रभावीपणे राजकीय पातळीवर मांडून नव्या बदलांना खऱ्या अर्थाने चालना दिली आहे. दीर्घकाळापासून आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ शेतकऱ्यांनी केलेले उठाव आंदोलने अगर चळवळी आजही सुरूच आहेत. यावरून हेच स्पष्ट होते की शेतकरी आंदोलने अगर चळवळी एकाएकी उदयास आलेली नाहीत. त्यांच्यापाठीमागे शेतीक्षेत्रातील असंख्य समस्या कारणीभूत ठरल्या आहेत. त्या समस्यांचा व शेतकरी चळवळींचा समाजावर पडलेल्या प्रभावाचा आढावा आपल्याला या युनिटमध्ये घ्यावयाचा आहे.

### ३.३ विषय विवेचन :

शेतकरी आंदोलने अगर चळवळी या एकाएकी किंवा अचानकपणे उदयास आलेली नाहीत. त्यांच्यापाठीमागे शेतीक्षेत्रातील असंख्य समस्या कारणीभूत ठरल्या आहेत. त्या समस्यांचा आणी शेतकरी चळवळींचा समाजावर पडलेल्या प्रभावाचा आढावा आपल्याला या प्रकरणात घ्यावयाचा आहे. शेतकरी चळवळींना अगर आंदोलनांना जरी दीर्घ इतिहास लाभला असला तरी स्वातंत्र्योत्तर काळातच मुख्यतः १९७० नंतरच शेतकरी आंदोलने मोठया प्रमाणात झालेली आढळतात. या चळवळींद्वारे शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या अत्यंत प्रभावीपणे राजकीय पातळीवर मांडून नव्या बदलांना खऱ्या अर्थाने चालना दिली आहे. शेतकरी चळवळींच्या उदयाचे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या समस्या होय. अज्ञान, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, अंधश्रध्दा, शेतीची निसर्गाधिनता, असंघटीतपणा, शेतीमालाच्या साठवणूकीचा अभाव, शेतीमालाचा नाशवंतपणा, प्रचंड वाढती लोकसंख्या, नवीन तंत्रज्ञानाचा अभाव व प्रसार, नवीन बी--बियाणे खते व अवजारे यांचा अभाव, वाढती महागाई, जागतिकीकरण, शेतीपुरक व्यवसायांचा अभाव, शेतीमाल खरेदी--विक्री व्यवहारातील दलाली, शेतीमालाला योग्य दर न मिळणे, शासनाची उदासीन भावना शेतीतील विभाजन किंवा शेतीची लहान-लहान तुकड्यात होणारी विभागणी अशा अनेक समस्या आज शेतकऱ्यांना भेडसावत आहेत. यापैकी काही महत्त्वाच्या समस्यांचा आपण येथे अभ्यास करणार आहोत.

### ३.३.१. भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या :

भारतातील शेतकऱ्याच्या समस्या विचारात घ्यावयाच्या झाल्या तर आपल्याला पुढील प्रमाणे काही समस्यांचा उल्लेख करावा लागेल.

**१. निसर्गावर आधारीत शेती** : आज २१ व्या शतकात आपण विकासाच्या विकसीत भारताच्या अगर स्वयंपूर्ण भारताच्या स्वप्नाचा विचार करत असलो तरी आजही भारतातील शेती ही मुख्यतः निसर्गावरच मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे वास्तव आपणास मान्य करावेच लागेल. प्रामुख्याने दुष्काळी भागातील शेती ही

पावसाच्या वेळेवर होणाऱ्या आगमनवर अवलंबून आहे. योग्य वेळी व योग्य प्रमाणात पाऊस झाला तरच शेतकरी आपल्या शेतीतून कांही प्रमाणात पिके घेऊ शकते. पाऊसच पडला नाही तर दुष्काळी परिस्थितीला शेतकऱ्याला सामोरे जावे लागते. परिणामी हंगामी शेती उत्पादनाच्या सहाय्याने काही प्रमाणात शेतकरी खरीप व रब्बी हंगामात ज्वारी व भात यासारख्या पिकांचे उत्पादन घेऊ शकतो. भाजीपाला व फळे ही तर पूर्णपणे पाण्याच्या उपलब्धतेवरच अवलंबून असतात. शिवाय जादा पाऊस, अवेळी पडणारा पाऊस, प्रचंड वेगात वाहणारे वारे वादळ, योग्य बि-बियाणांची अनुपलब्धता, योग्य रासायनिक खतांचा जाणीवपूर्वक घडवूण आणण्यात आलेला अगर निर्माण झालेला तूटवडा यामुळे पिकच उगवून न येणे यामुळे होणारे शेतीचे नुकसान या सर्वांमूळे सरते शेवटी मिळाणारे उत्पादन अत्यल्प राहते. कित्येकदा हंगामी उत्पन्नामुळे एकाच वेळी बाजारात मोठया प्रमाणात शेती उत्पादनाची आवक झाल्यामुळे त्यांच्या किंमती ढासळतात. परिणामी सरतेशेवटी शेतीतून जादा मिळालेले उत्पादन तर काही वेळा निसर्गाच्या कोपाला बळी पडल्यामुळे झालेल्या नुकसानीमुळे कमी झालेले उत्पादन अशा दोन्ही परिस्थितीत नागवला जातो तो शेतकरीच.

२. **नगदी पिक घेण्याकडे शेतकऱ्यांचा वाढलेला कल** : कमी कष्ट व जास्त उत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी शेतकऱ्यांचा ओढा वाढत असून एकच पिक घेण्याच्या या शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीमुळे ज्या ठिकाणी अशा पिकांच्या वाढीसाठी योग्य परिस्थिती आहे अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांनी अशीच पिके सातत्याने घ्यायला सुरूवात केली. एकच पिक सातत्याने घेतले गेल्याने मिळणाऱ्या शेती उत्पादनात घट होऊ लागली. ती घट काही प्रमाणात कमी व्हावी यासाठी शेतकऱ्यांना दरवर्षी चढया प्रमाणात रासायनिक खतांचा व तणनाशकांचा वापर करणे भाग पडू लागले. परिणामी शेतीची उत्पादनक्षमता कमी होत जाऊन शेतजमिनीचा पोत बिघडून व आरोग्य बिघडू लागले आहे. शेत जमिनीच्या वाळवंटीकरणाची समस्या शेतकऱ्यांसमोर उभी राहू लागली आहे.

**३. सातत्याने वाढत गेलेली लोकसंख्या** : भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत गेली. पुर्वीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जरी आज कमी असला तरी लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढली त्याप्रमाणात कसण्यास योग्य जमिनीत वाढ होत गेली नाही. परिणामी शेतकऱ्यांना परंपरेने उपलब्ध झालेली जमिन त्यांच्या पुढच्या पिढयांत विभागली गेली. शेतीचे तुकडीकरण मोठया प्रमाणात होत गेले. यामुळे अल्पभूधारकांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आणि अशा वाट्याला आलेल्या तुटपूंज्या शेत जमीनीतून मिळणाऱ्या उत्पनातून कुटुंबाच्या गरजांची पूर्तता होणे अशक्य झाले.

४. **जलसिंचनाच्या सुविधांचा अभाव** : भारत स्वतंत्र झााल्यानंतर भारतीय शेतकऱ्यासमोरची सर्वात मोठी जलसिंचनाची समस्या निर्माण झाली. शासनाने जल संवर्धनासाठी व योग्य वेळी शेतीला योग्य प्रमाणात पाण्याचा पुरवठा करता यावा यासाठी कित्येक लहान मोठे बंधारे व धरणे बांधण्याचा कार्यक्रम राबवण्याचे ठरविले. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यातही घेतल्या. त्यामुळे कित्येक शेतकरी त्यांच्या शेत जमिनींना मुकले. त्यांना स्थलांतरीत व्हावे लागले पण अशा लहान मोठ्या बंधाऱ्यांची व धरणांची उभारणी योग्य पध्दतीने झाली नाही. परिणामी ज्यांना जलसिंचनाच्या सुविधा निर्माण व्हाव्यात म्हणून शासनाने प्रयत्न केले त्यांना योग्य प्रमाणात पाण्याची उपलब्धता झालीच नाही. दुसऱ्या बाजूला आपली पिकाऊ जमिन ज्यांना अशा धरणांच्या

उभारणीसाठी द्यावी लागली त्यांना स्थलांतरीत व्हावे लागले. परिणामी आजही कित्येक शेतकरी शेती पिकवण्यासाठी आवश्यक असलेल्या जलसिंचनाच्या सुविधांपासून दूरच राहिले आहेत.

**५. शेतीतून उत्पादीत शेतीमालाची साठवणूक करण्यातील अडथळे :** शेतीत वर्षभर काबाडकष्ट करून पदरात पडलेला अत्यल्प का असेना पण जो मिळाला तो शेतीमाल साठवून ठेवण्याच्या अगर त्यावर योग्य त्या प्रक्रिया करण्याच्या सुविधा सर्वच शेतकऱ्यांजवळ उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी असा नाशवंत माल बाजारपेठात पाठवून देतो. एकाच वेळी प्रमाणापेक्षा जादा मालाची आवक झाल्यामुळे ज्यांच्याकडे अशा प्रकारची सुविधा उपलब्ध आहे ते व्यापारी व अगर दलाल तो माल अत्यल्प किंमतीला शेतकऱ्यांकडून विकत घेतात व योग्य वेळी तोच माल बाजारपेठेत आणून काहीही कष्ट न घेता त्या मालाला मिळणारा जादाचा दर फायद्याच्या स्वरूपात आपल्या पदरात पाडून घेतात व शेतकरी मात्र आपल्या मुलभूत गरजाही भागवू शकत नाही.

**६. शेती व्यतिरिक्त इतर उत्पनाच्या साधनांचा अभाव :** पिढयानपिढया केवळ शेतीवरच अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण भारतात आजही मोठ्या प्रमाणात आढळते. स्वातंत्र्योत्तर काळात जरी सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार झाला. असला तरी शिक्षणाची गंगोत्री सर्व ग्रामीण भागात आदिवासी विभागात पोहचली आहे का? शिवाय जेथे शिक्षण पोहचले तेथे शिक्षणाच्या सर्व सुविधा योग्य प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत का हा ही प्रश्न तितकाच गंभीर आहे. याबरोबरीनेच आजची शिक्षणप्रणाली जे शिक्षण उपलब्ध करून देते त्यातून उत्पन्नाची इतर साधने उपलब्ध होतात का? हा ही तितकाच गंभीर प्रश्न आहे. शिवाय आज तर आपल्या देशात नव्या शिक्षण धोरणाचा पुरस्कार करायचे ठरवले जात आहे. यासाठी योग्य पायाभूत सुविधा आदिवासी खेड्या-पाडयात किंवा ग्रामीण भागात उपलब्ध आहेत का? असल्या तरी त्या सुविधांचा स्विकार सर्व शेतकऱ्यांना सहजगत्या करता येणार आहे का हा ही तितकाच कळीचा मुद्दा आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या ज्या मुलांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली त्यापैकी काही तरूणांना नोकरी करण्याच्या काही संधी उपलब्ध झाल्या ते शेती पासून दूर गेले तर ज्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत ते बेकार राहिले. अशा ग्रामीण भागातील बेकारांची संख्या दिवसागणीक वाढतच आहे. हे तरूण शेतात काम करू शकत नाहीत किंवा ते त्यांना जमतही नाही हे वास्तव चित्र आहे. काही शेतकरी जरी दुध उत्पादन, कुक्कुटपालन यासारखी इतर कामे करताना आढळत असले तरी त्यांचेही प्रमाण अत्यल्पच आढळते. परिणामी ज्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली पण काम करण्याची संधी मिळाली नाही ते बेकार तर झालेच शिवाय ज्यांना शिक्षणाची संधीच मिळाली नाही ते निरक्षर राहीले.

**७. शेतीमाल खरेदी विक्रीतील गैरव्यवहार व मध्यस्थांचा वर्ग :** शेतीमालाची खरेदी-विक्री होत असताना तराजू व वजनकाटे व्यवस्थिती वापरले जात नाहीत. मालाची प्रतवारी ठरवण्याचे काम व्यापारी स्वतःच करतात व त्यांना योग्य वाटेल तितकीच किंमत त्यांच्याकडून केली जाते. त्यांनी निश्चित केलेल्या किंमतीलाच ते शेतकऱ्यांकडून शेतमालाची खरेदी करतात. याबरोबरीनेच सरकारच्या बाजारसमितीचे विविध कर देखील शेतकऱ्यांकडूनच वसूल करतात. त्याच्याकडून विकत घेतलेल्या शेतमालाची पावती दिली जात नाही. असे विविध प्रकारे शेतकऱ्याला बाजारपेठांतून व्यापारी केवळ लुबाडतातच.

**८. बाजारपेठांबाबतच्या योग्य ज्ञानाचा अभाव :** विशिष्ठ मालासाठी कोणती निश्चित बाजारपेठ उपलब्ध

आहे. आपल्याला आपल्या शेत मालाची योग्य किंमत नेमकी काठे मिळेल याबाबतचे ज्ञान शेतकऱ्यांना त्यांच्या अज्ञानामुळे माहिती नसते. विशिष्ट बाजारपेठ, सरकारी गोदाम, मालाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर निश्चिती नेमकी कशी केली जाते याबाबत शेतकरी अज्ञानीच असतात. परिणामी या बाबत पुरेपूर माहिती असलेले व्यापारी दलाल व मध्यस्थ यांच्यावरच शेतीमालाच्या दराबाबत शेतकरी अवलंबून राहतो. परिणामी त्याला कधीच त्याने उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य दर मिळत नाही.

९. **जागतिकीकरणाचे दूष्परिणाम** : जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा स्विकार केल्यामुळे श्रीमंत राष्ट्रांत त्यांच्या गरजेपक्षा जादा उत्पादित झालेला शेतीतील माल सहजगत्या अत्यंत कमी किमतीला भारतीय बाजारपेठांमध्ये उपलब्ध होऊ लागला आहे. परिणामी अप्रगत तंत्रज्ञानाचा व परंपरागत पध्दतींचा अवलंब करून भारतीय शेतकरी जो शेतमाल आपल्या शेतात उत्पादीत करतो त्याला मात्र त्याने शेतमालाच्या उत्पादनासाठी केलेला खर्च भरून निघेल इतकाही दर मिळत नाही. परिणामी शेती उत्पादन तोटयात जाऊन त्यांच्यात दारिद्र्याची समस्या निर्माण होते.

**१०. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून जीवनाच्या मुलभूत गरजाही भागवणे अशक्य** : शेतकऱ्यांच्या गरजा पूर्वी मर्यादित होत्या व त्यांची पूर्तता कशी बशी का असेना करून शेतकरी जीवन कंठत होता. आज शेतकऱ्यांच्या गरजांची पूर्तता करण्याची क्षमता त्यांना शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून भागवणे अशक्य बनले आहे. शेतीसाठी लागणारी साधने, औजारे, दळणवळणाच्या सुविधा, शिक्षण यासाठी त्याला मोठ्या प्रमाणात खर्च करण्याविना पर्याय उरलेला नाही. ज्या भागातील शेतकरी पारंपरिक पिकांपासून नगदी पिकांकडे वळला त्याच्या गरजा तर निश्चितच वाढल्या आहेत. आपल्या नित्याच्या गरजा भागवण्यासाठी त्याला बाजारपेठांकडे धाव घ्यावी लागत आहे. येथे शेतीमालाचे दर निश्चित करण्याचे सर्व अधिकार व्यापारी व सहकारी संस्थांच्या पदाधिकारी वर्गाच्या हातातच केंद्रीत झालेले आहेत परिणामी तो घेत असलेल्या उत्पादनाला मिळणाऱ्या बाजारपेठेतील दरावर त्याचे कोणतेच नियंत्रण राहिलेले नाही. म्हणूनच आज शेतकरी मग तो प्रगत असो अगर अप्रगत आज पूर्णपणे नागवला जातो आहे.

**११. दारिद्र्य** : भारतातील शेतकरी दारिद्र्यात जन्माला येतो. द्रारिद्यात जीवन जगतो व दारिद्र्यातच मरतो असे म्हंटले जाते. आपल्याला काही प्रमाणात मान्यच करावे लागेल. हे दारिद्र्य दूर करण्याचा कोणताच जादूई दिवा आजपर्यंत तरी त्याला सापडलेला नाही. मुळात दरिद्री असलेला शेतकरी आपल्या नव्या पिढीला उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देवू शकत नाही. शेतीसंबंधीत नव्या तांत्रिक साधनांचा अगर तंत्रज्ञानाचा अवलंब आपल्या शेतीत करू शकत नाही. परिणामी तो पारंपरिक शेतीत सुधारणा करू शकत नाही. सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेले अर्थसहाय्य त्याला सहजगत्या उपलब्ध होत नाही. त्याची उपलब्धता व्हावी म्हणून शासनाने काही अर्थसहाय्य दिले तरी आपल्या बेभरवशाच्या शेती उत्पादनातून त्याला त्याची परतफेड करता येत नाही. शिवाय आजही परंपरेत अडकलेल्या शेतकऱ्याला आपल्या मुला अगर मुलीच्या लग्नासाठी, सण समारंभासाठी, धार्मिक कार्यासाठी कर्ज काढण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. काढलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची याचीच चिंता त्याला सतत लागून राहते. शेवटी या सगळया चिंतांचा कडेलोट

झाला की तो आत्महत्येच्या मार्गाचा अवलंब करतो. म्हणूनच महाराष्ट्रातील विदर्भ मराठवाड्यातील कित्येक शेतकरी दरवर्षी आत्महत्या करताना दिसून येतात हे सामाजिक तथ्य आहे. असा आत्महत्येचा मार्ग स्वीकारणारा शेतकरी परत आपल्या उरलेल्या कुटुंबाच्या कर्जात भरच पाडतो. हे दुष्टचक्र लवकर संपेल असे आजतरी वाटत नाही. परिणामी आज शेतक-यातील दारिद्रयाच्या समस्येने केवळ भारतीय शेतकरीच नव्हे तर सपूर्ण भारतीय समाजासमोर ही भयावह समस्या उभी केली आहे.

**सारांश** : भारतातील शेतक-यांच्या समस्यांचा आढावा घेत असताना एक बाब आपल्यासमोर येते की आजही आपल्या उदरनिर्वाहासाठी केवळ शेती व शेती उत्पादनावरच अवलंबून असलेल्यांची संख्या सुमारे ६५ ते ७० टक्के आहे.सातत्याने वाढत गेलेल्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीचे तुकडीकरण मोठया प्रमाणात झाले आहे. ते इतके आहे की नव्या तंत्रज्ञानाचा अगर साधनांचा वापर करून शेती करण्याची काही शेतकऱ्यांची इच्छा असली तरी असे तंत्रज्ञान त्यांच्या वाट्याला आलेल्या जमिनीच्या तुकड्यात करता येत नाही. आजही जलसिंचनाच्या सुविधा योग्य प्रमाणात शेतकऱ्यांना उपलब्ध झालेल्या नाहीत. सातत्याने पडत असलेल्या दुष्काळामुळे केवळ एकाच पिकावर शेतकऱ्यांना अवलंबून रहावे लागत आहे. कित्येक वेळा अतिपावसामुळे नद्याना येत असलेल्या पुरामुळे उभी पिके पाण्याखाली गाडली जात आहेत. प्रचंड प्रमाणात येणारी वादळे, जंगली श्वापदे यांच्या उच्छादांमुळे शेतीचे नुकसान होत आहे. आलेल्या शेतमालाची साठवणूक करण्यासाठी योग्य सुविधा शेतकऱ्यांकडे उपलब्ध नाहीत. परिणामी त्यांना नाशवंत शेतमाल लवकरात लवकर बाजारात पाठवण्याविना पर्याय उपलब्ध नाही. बाजारपेठातील व्यापारी व दलालांकडून त्यांच्या अज्ञानाचा पुरेपूर फायदा उठवला जात आहे. परिणामी शेतीत कष्ट करत असताना घेतलेल्या श्रमाचा व पैशाचा पुरेसा व योग्य मोबदला मिळत नाही. आपल्या मुलभूत गरजा भागवणेही शेतकऱ्यांना अशक्य होत आहे. पुढचे दिवस चांगले येतील या अपेक्षेने कर्ज काढून शेतीत कष्ट उपसणारा शेतकरी दिवसेंदिवस दरिद्रीच होत आहे. याचा दृष्य परिणाम म्हणून आपण शेतकऱ्यांच्या वर्षागनीक वाढत चाललेल्या आत्महत्येच्या संख्यांच्या माध्यमातून स्पष्टपणे जाणवत आहे. परिणामी शेतकऱ्यांत पिढयान पिढ्या चालत आलेला दारिद्र्याचा वारसा अव्याहतपणे एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या सर्व गोष्टीची जाणीव होत असलेला शेतकरी कित्येक वर्षांपासून आपल्यावर होत असलेल्या अन्याय व अत्याचाराच्या बाबतीत संघटीत होऊन या परिस्थितीचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत आहे. यातून शेतकऱ्यांत योग्य जाणीव निर्माण व्हावी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजतागायत अनेक समाजधुरींनानी, समाजसुधारकांनी, शेतकरी नेत्यांनी प्रयत्नांची परिकाष्टा केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतकरी आंदोलने व शेतकरी चळवळी भारतात झाल्या आहेत व आजही त्यात खंड पडलेला नाही.अशा आंदोलनांचा व चळवळींचा थोडक्यात आढावा आपण या प्रकरणाच्या पुढच्या घटकात घेणार आहोत.

### ३.३.२ प्रमुख शेतकरी चळवळी

शेतकऱ्यांच्या चळवळींचे कालक्रमानुसार व चळवळींच्या स्वरूपानुसार आपल्याला अभ्यास करणे सोयीचे होईल. कालानुसार १९ व्या शतकातील आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धातील अशा दोन काळात शेतकरी चळवळींचे वर्गीकरण करणे सहज शक्य होईल. विसाव्या शतकातील सुरूवातीची दोन तीन दशके व

स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीचे दशक असे वर्गीकरण केल्यास आपल्याला प्रमुख शेतकऱ्यांच्या चळवळींचा अभ्यास करणे सोयीचे होईल.

**पुर्नस्थापनावादी चळवळी :** साधारणपणे १७६५ ते १८५७ या दरम्यान पुनर्स्थापनावादी अशा स्वरूपाचे अनेक उठाव झाले. यांचे नेतृत्व हिंदू व मुस्लिमांतील छोटे राजे रजवाडे पुर्वीचे मोगलांच्या राजवटीतील महसूल अधिकारी, डोंगराळ भागातील आदिवासी टोळयांचे नायक आणि दक्षिण भारताात स्थानिक जमीनमालक आणि लष्करी अधिकारी यांनी केले. त्यांना शेतकऱ्यांच्या व काही वेळा पूर्वाश्रमीच्या सैनिकांचाही पाठिंबा लाभलेला होता. हे उठाव कधी ब्रिटिश राजवटीविरूध्द तर कधी या राजेरजवाड्यांविरूध्द (ज्यांनी) भरमसाठ कर लादला होता त्यांच्याविरूध्द झाल्याचे दिसून येते. या उठावांचे महत्वाचे उद्दिष्ट ब्रिटीशांची हकालपट्टी करून पूर्वीचे सरकार परत आणणे व पूर्वीचे शेती व्यवहार पुर्नस्थापित करणे हेच होते. या उठावांमध्ये शेतकरी सहभागी झाले होते याचे महत्वाचे कारण म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी सारा वसुलीसाठी त्यांची मोठया प्रमाणात पिळवणूक करत होते आणि दरिद्री बनवित होते. अशा प्रकारच्या सुमारे २९ उठावांची नोंद आपणास ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये पहावयास मिळते. यापैकी कांही महत्वाचे उठाव म्हणून खालिल उठावांचा उल्लेख आपणास करता येईल.

१. अवधच्या हिंदू व मुसलमान जमिनदारांचा व राजा चैत सिंगच्या (१७७८ ते १७८१) दरम्यानचा उठाव

२. उत्तर कर्नाटकच्या तिनवेल्ली भागातील पाळेगर व त्यांच्या शेतकऱ्यांच्या (१८०१ ते १८०५) मधील उठाव.

३. पळसी राज्याच्या नेतृत्वाखाली हजारो गनिमी सैनिकांचा मलबारमधील (१७९६ ते १८०५) उठाव.

४. त्रावणकोर व कोचिनमधील त्रावणकोर संस्थानच्या वेलु थंपी या प्रधानाने ३०.००० सशस्त्र सैन्यासह केलेला उठाव. ज्यामध्ये मोठया प्रमाणात शेतकरी सहभागी झालेले होते पण या उठावातील बहुसंख्य नेत्यांना ब्रिटीशानी क्रूरपणे ठार मारले व हे सर्व उठाव पाशवीबळाच्या सहाय्याने चिरडून टाकण्यात ते यशस्वी झाले. काही उठावांची परिणीती म्हणून शेतकऱ्यांवरील सारा वसुलीची जबरदस्ती काही प्रमाणात कमी करण्यात आली. यापैकी १८५५-५६ मधील संथाळांचा उठाव व १८५७-५८ मधील सैनिकांचा उठाव किंवा पहिले स्वातंत्र्ययुध्द हे सगळ्यात मोठे उठाव होते. १८५७ च्या उठावाची सुरूवात जरी हिंदू मुस्लिम सैनिकांकडून केली गेली असली तरी दरिद्री शेतकरी. शेतमूजर व सैनिक हाच या उठावाचा खरा कणा होता. या उठावाची व्याप्ती जवळजवळ सर्व उत्तर भारतात पसरलेली होती. बराच काल चाललेला हा उठाव ब्रिटीशांनी आपल्या पाशवी बळाच्या सहाय्याने अत्यंत निर्दयीपणे मोडून काढण्यात यश मिळवले.

**धार्मिक चळवळी :** १८५७ चा उठाव असफल झाल्यानंतर काही बंडखोर शेतकरी दरोडेखोरांच्या टोळयात सामील झाले तर काही धार्मिक नेत्यांच्या स्थानिक पातळीवरील लढ्यात सामिल झाले. स्टीफन फुक्स यांनी भारतातील अशा स्वरूपाच्या चळवळींचा अभ्यास केला आहे. अशा चळवळीचा नेता हा प्रेषिताप्रमाणे भावीकाळातील आदर्श समाजाचे कल्पित स्वप्न आपल्या अनुयायांपुढे ठेवतो व ते काही दैवी चमत्कारांनी

पृथ्वीवर अवतरेल अशी श्रध्दा अनुयायांच्या मनावर बिंबवतो. त्यांनी ब्रिटीशांविरूध्द लढणाऱ्या शेतकाऱ्यांच्या १९ अशा चळवळींची नोंद केली असून त्यांच्या मते अशा चळवळी मुख्यतः मुस्लिम धर्मियांत मोठया प्रमाणात झाल्या तर काही प्रमाणात त्या हिंदू धर्मियांत व आदिवासी समाजातही झाल्याचे आढळते.

यातील काही महत्वाच्या चळवळीमध्ये आपल्याला मोपला शेतकऱ्यांची केरळातील कुळांची 'मांबूराम टंगालांच्या' नेतृत्वाखालील १८३० ते १८५० या कालावधीतील चळवळ. १८६७ ते १८७० या कालावधीत गुजरातमधील 'जोरिया भगत' यांच्या नेतृत्वाखालील नाइकदा आदिवासी जमिनीची चळवळ. १८९० मधील 'बिरसा मुंडा' याच्या नेतृत्वाखालील मुंडा आदिवासी जमातीची चळवळ या चळवळींचा समावेश करावा लागेल. या चळवळीमधील धार्मिक नेत्यांची भाकिते जरी खोटी ठरली तरी या सर्व चळवळीतील अनुयायांच्या मनात पिळवणूकीविरूध्द जिद्दीने ठामपणे उभे राहण्याची भावना निर्माण केली होती हे मान्य करावे लागेल.

**सामूहिक उठाव :** शेतकऱ्यांच्या चळवळींच्या संदर्भात या स्वरूपाचे उठाव महत्वपूर्ण आहेत. कारण यामागची शक्ती व नेतृत्व शेतकऱ्यांचेच होते. या उठावामागे धार्मिक चळवळीप्रमाणे काही विचारप्रणाली अगर करिष्मा असलेले नेतृत्व नसले तरी त्यांचे स्वरूप आकस्मिक व नाट्यमय होते. या उठावांचे मुख्य उद्दिष्ट त्यांची काही गाऱ्हाणी दूर करणे हेच होते. सुरूवातीला अत्यंत शांततापूर्ण मार्गाने सामुहिक बहिष्कार असेच या चळवळींचे स्वरूप होते. पण अत्याचारी मार्गाने जेंव्हा त्यांना दडपूण टाकण्याचा प्रयत्न ब्रिटीशांकडून झाला तेंव्हा त्याला प्रत्युत्तर म्हणून सशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाचा अवलंब या उठावातील कर्त्यांकडून झाला होता.

अशा उठावापैकी कांही महत्वाच्या उठावांमध्ये १) विष्णुपूर व बिरभूममधील शेतकरी व दरोडेखोरांचे १७८९ मधील बंड २) हरियाणातील जाट शेतकऱ्यांचे १८०९ मधील बंड ३) खानदेशातील शेतकऱ्यांचे १८५२ मधील बंड ४) १८७० मधील बंगालमधील संथाळांचा उठाव ५) १८७५ मधील दख्खनचे दंगे यांचा समावेश करता येईल. या उठावांचे प्रभाव लाखो लोकांवर पडला होता. या बंडांमध्ये मुख्यतः लहान शेतकरी आणि खंडाने जमीन कसणारे शेतकरी सामिल झाले होते. या उठावामागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे जमिनदार व सावकारांकडून होणारी शेतकरी वर्गाची पिळवणूक होय.

**महाराष्ट्रातील उठाव :** महाराष्ट्रात पेशवाईच्या अस्तानंतर व आदिवासी राजांची राज्ये गेल्यावर ब्रिटीशांची राजवट सुरू झाली. याविरोधी निर्माण झालेल्या असंतोषाची परिणीती ब्रिटीशांविरोधातील सशस्त्र उठावांत झाली. यापैकी काही उठावांमध्ये पुढील प्रमुख उठावांचा समावेश करावा लागेल. १) १८२६ साली उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागातील रामोश्यांचे बंड व १८३० व पुन्हा १८३९ ते १८४५ या काळात चिमणजी जाधव भाऊ खेर आणि नाना दरबारे यांच्या पुढाकाराखाली झालेले कोळयांचे बंड. २) खानदेशातील भिलांनी १८२२ ते १८५७ या कालावधीत ब्रिटीशांविरूध्द केलेले बंड. याबरोबरीनेच १८५७ च्या उठावाचे पडसाद म्हणून काही ठिकाणी ब्रिटीशांविरूध्द बंड घडवून आणण्याचे प्रयत्न झाले. पण ते फारसे यशस्वी होऊ शकाले नाहीत. पण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी उग्र रूप धारण केले असतानाही सारा वसुलीची जबाबदारी असलेले महसुल अधिकारी साऱ्यात मुळीच सवलत देत नव्हते. एका बाजूला सरकार तर दुसरीकडे लोभी सावकार यांच्या कचाट्यात शेतकरी सापडला होता.

३) १८६७ साली पुण्यात स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने शतेकऱ्यांच्या या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी वेगवेगळया ठिकाणी असलेल्या शेतकऱ्यांमध्ये याबाबत जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र सरकारने शेतकऱ्यांतील असंतोषाची पर्वा न करता सारा वसुलीचा आपला हेका तसाच ठेवला. परिणामी चिडलेल्या शेतकऱ्यांनी नगर सोलापूर पुणे जिल्हयातील सावकार गुजर मऱावाड्यांविरूध्द सामाजिक बहिष्कारास सुरूवात केली. शेतकऱ्यांना असहय झालेला शेत सारा हेच या दंगलींमागील महत्वाचे कारण होते. दरम्यानच्या काळात झालेला वासुदेव बळवंत फडके यांचा सशस्त्र बंडाचा उठावही पुर्णपणे फसला होता. पण हे ही तितकेच खरे आहे की १९ व्या शतकातील जे महत्वाचे लढे झाले त्यात शेतकरी वर्गाचाही तितकाच महत्वाचा वाटा होता. १८७५ च्या दख्खनच्या उठावामध्ये तर शेतकरीच मुख्य होते. या उठावाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांविरूध्दच्या अन्यायाचा प्रतिकार करणे हाच होता.

४) महात्मा फुले यांनी जरी प्रत्यक्ष शेतकऱ्यांची चळवळ उभी केली नसली तरी शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक लिहीले. महात्मा फुल्यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती व त्या आधारे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सावकार व भटजी वर्गाच्या कारवायांबद्दल शेतकरी वर्गात जागृती केली. सत्यशोधक समाजाने १८७३ साली 'दीनबंधू' नावाचे साप्ताहिक सुरू केले व त्यातून शेतकऱ्यांची दुखणी मांडून त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील शेतकरी चळवळी व उठाव :**

१९ व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राजकारणात राष्ट्रीय कॉग्रेसने राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करण्यास सुरूवात केली. या काळात देशाच्या वेगवेगळया भागातील शेतकरी कामगार व मध्यम वर्गाच्या चळवळी निर्माण झाल्या त्या मोठया प्रमाणात पसरल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी चळवळीला प्रचंड स्वरूप प्राप्त झाले. ग्रामीण भागातील विशेषतः शेतकरी वर्गाची ताकद गांधींनी चांगलीच ओळखली होती. त्यांनी शेतकऱ्यांबरोबरच कामगार व मध्यमवर्गीय एकत्रीत लढतील असे लढे उभारले. खरा भारत खेड्यांतच आहे हे ओळखून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नात विशेष रस घेतला व केवळ त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी काही खास चळवळी सुरू केल्या. परिणामी शेतकरी वर्गात राष्ट्रीय भावना जागृत झाली व त्यांना स्वतःच्या प्रश्नांबाबत चागलीच जाणीव झाली. ते भानावर आले व त्यांच्या अशा चळवळीतील सहभाग वाढला. गांधींच्या नेतृत्वाखाली झालेले खेडा चंपारण्य सत्याग्रह व बार्डोलीचा सत्याग्रह महत्वाचे सत्याग्रह ठरले. एकपरीने शेतकरी चळवळीला या सत्याग्रहांनी एक दिशा मिळवून दिली. यापैकी चंपारण्य सत्याग्रहात त्यांनी परदेशी मळेवाल्यांच्या बेकायदेशीर नीळ लागवडीविरोधी आणि त्यांच्याकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकीविरूध्द लढा दिला. खेडा सत्याग्रहात अन्याय, सारा वसुलीविरूध्द लढा उभारला. बार्डोली सत्याग्रहात अन्यायी कर लावण्याविरूध्द आवाज उठवला. याबरोबरच जमिनीच्या नुकसानभरपाईचा प्रश्न मूळशी सत्याग्रहात हाताळला. अशा प्रकारे शेतकरी चळवळीला एक निश्चित दिशा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

पण त्यांच्या चळवळीवरील एक महत्वाची मर्यादा म्हणजे त्यांनी शेतकऱ्यांच्या थेट ब्रिटीश सरकारशी संबंधीत अशाच प्रश्नांना हात घातला. जमीन महसूल, शेतसारा, दुष्काळ निवारण किंवा कर इत्यादींचा संबंध सरकारशी होता व शेतीक्षेत्रातील इतर वर्गांशी नव्हता. दुसरी महत्वाची मर्यादा म्हणजे त्यांनी या लढयांमध्ये गरीब शेतकरी कुळे व शेतमूजर प्रत्यक्ष त्यांची पिळवणूक करणाऱ्या जमीनदार श्रीमंत शेतकरी, व्यापारी किंवा सावकारांविरूध्द उभे राहतील असे लढे उभारणे टाळले.

**सविनय कायदेभंगाची चळवळ आणि शेतकरी** : काँग्रसने कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यासाठी गुजरातमधील बार्डोली तालुक्याची निवड केली. तेथे १९२८ साली सारबंदीचे आंदोलन सुरू केले. या सत्याग्रहात सुरूवातीला गुजरातमधील श्रीमंत व मध्यम शेतकरी असलेला पाटीदार समाज सहभागी झाला होता. त्यांच्याबरोबरीनेच अत्यंत हलाखीत जीवन जगणाऱ्या कनिष्ठ वर्गातील शेतकरीही सहभागी व्हावा यासाठी त्यांनी कनिष्ठ जाती आणि आदिवासी समाजात चरखा.दारूबंदी असे रचनात्मक कार्यक्रम हाती घेण्याची सूचना 'पाटीदार युवक' मंडळाला दिली. यामुळे पाटीदार शेतकरी व कनिष्ठ जातीतील शेतमजूर एकत्रित येऊन राजकीय कृती करण्याची तयारी परिपूर्ण झाली. या लढयामागे जरी महात्मा गांधींची प्रेरणा असली तरी लढ्याचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेलांनी केले. ही चळवळ सरकारने दडपून टाकण्याचा भगिरथ प्रयत्न केला. पण शेवटी तडजोडीचा मार्ग स्वीकारण्यात येऊन अहिंसात्मक मार्गाने चाललेला हा लढा मागे घेण्यात आला. यामध्ये शेतकऱ्यांचे वेगवेगळे वर्ग पटेलांच्या नेतृत्वाखाली एकजुटीने लढले.

**१. अवध मधील साराबंदीची चळवळ** : १९३० च्या सुरूवातीला पं.जवाहरलाल नेहरूंनी अवध मधील १९२९ च्या जागतिक मंदीचा तीव्र फटका बसलेल्या आणि परिणामी शेतसारा भरणे अशक्य झालेल्या शेतकऱ्यांना संघटीत करून ही चळवळ सुरू केली. बार्डोली सत्याग्रहाप्रमाणेच याही लढयात जमीनदार व शेतकरी यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. १९३२ पर्यंत ही चळवळ सुरूच राहिली. मोठया प्रमाणात शेतकऱ्यांनी स्वतःला अटक करवून घेतली. सरकारच्या दडपशाहीला दाद न देता हा लढा शेतकऱ्यांनी शांततापूर्ण मार्गाने सुरूच ठेवला.

**२. महाराष्ट्रातील साराबंदी व तुकडेबंदीविरूध्द चळवळ** : १९२७ साली छोटया जमिनीसंबंधी विधेयक मुंबई सरकारने तयार केले ज्यात प्रामुख्याने तुकडेबंदीविरूध्द तरतुदी होत्या. या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले तर ८० टक्के शेतकरी भूमिहीन होतील अशी भिती निर्माण झाली. परिणामी या विधेयकाला विरोध करण्यासाठी २५ जुलै १९२८ रोजी पुण्यात झालेल्या सभेत 'मुंबई प्रादेशिक शेतकरी संघ' स्थापन करण्याचे आवाहन केले गेले. या सभेत महाराष्ट्र व कर्नाटकातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन 'लहान जमीनधारणा' विधेयकाला 'जमीन महसूल विधेयकाला' आणि मुंबई सरकारच्या 'बार्डोली धोरणाला' तीव्र विरोध प्रकट केला.

**३. जंगल सत्याग्रह** : सरकारच्या जंगलविषयक धोरणांमुळे प. महाराष्ट्रातील सर्वच थरातील शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. अहमदनगर ऩाशिक पश्चिम खानदेश, सातारा व मध्य प्रांताच्या काही जिल्हयातील शेतकऱ्यांच्या काही प्रमुख मागण्या (उदा. गुरे चारण्याचे शुल्क कमी करावे, जंगली जनावरांपासून

पिकांचे संरक्षण करण्यासाठी शस्त्रे बाळगण्यास परवानगी असावी, राखीव जंगलांच्या लिलावात शेतकऱ्यांना सवलती दिल्या जाव्यात, वाळलेले लाकूड, सरपण, पाचोळा इत्यादी शेतकऱ्यांना मोफत देण्यात यावा. मालकीच्या जमिनीत वाढलेल्या सागवानाच्या झाडांवर शेतकऱ्यांचा हक्क असावा) होत्या.

सरकारच्या जंगलविषयक कायद्यात शेतकऱ्यांना वेगवेगळया मार्गांनी दंड करण्याच्या व जंगलसंपत्तीवरील त्यांचे नैसर्गिक अधिकार काढून घेण्याच्या तरतूदी होत्या. या सर्वाला विरोध करण्यासाठी महाराष्ट्रातील गाजलेल्या जंगल सत्याग्रहामध्ये १८ जुलै १९३० रोजी झालेल्या सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील बिळाशी येथे जंगल सत्याग्रह हा एक महत्त्वाचा सत्याग्रह आहे. तसेच १९३० साली अहमदनगर जिल्हयातील अकोला संगमनेर तालुक्यात जंगल कायदा तोडण्याचा सत्याग्रह सुरू झाला. २२ जुलै १९३० रोजी सुमारे ५८ हजार शेतकरी स्त्री पुरूष व मुले जंगल कायदा तोडून आपल्या जनावरांसह जंगलात शिरले. यामध्ये गावकऱ्यांचा लक्षणीय सहभाग असल्यामुळे पोलिसांना हे आंदोलन नियंत्रणात आणण्यात यश मिळाले नाही. पोलिसांनी अथक प्रयत्न करूनही हा सत्याग्रह कित्येक महिने चालूच राहिला.

**किसान सभेचे कार्य** : १९२० साली भारतात साम्यवादी चळवळीला सुरूवात होऊन भारतीय समाजवादी पक्षाची स्थापना झाली होती. संघटनात्मक सोयीसाठी या पक्षाने दुसरा 'कामगार आणि किसान पक्ष' काढला. या पक्षाचे शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत विचार अधिक जहाल होते.परंतू जहाल गटांना व शक्तींना खास शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र संघटन स्थापन करावयाचे होते. १९३६ मध्ये या जहाल गटाने एकत्र येऊन 'अखिल भारतीय किसान सभा' स्थापन केली. या किसान सभेच्या प्रादेशिक पातळीवरील संघटनांनी अत्यंत महत्वपूर्ण कार्य सुरू केले. यामध्ये मुख्यतः बिहार प्रादेशिक किसान सभेने स्वामी सहजानंदांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृतीचे काम मोठया प्रमाणावर केले होते. या सभेने जमिनदार विरोधी व कुळांच्या जमिनीवरील हक्कांचे संरक्षण करणारी चळवळ सुरू केली. आंध्रमधील किसान सभेने प्रा. एन. जी. रंगा यांच्या नेतृत्वाखाली प्रामुख्याने मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळले असले तरी कांही प्रमाणात गरीब शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष दिले होते. मात्र अखिल भारतीय किसान सभा संघटनात्मक दृष्टीने फारशी बळकट नव्हती. बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल अशा काही शाखा जरी ताकदवान असल्या तरी इतरत्र या सभेचे कार्य फारसे प्रभावी झाले नाही. महाराष्ट्रात डिसेंबर १९३६ मध्ये 'फैजापूर' येथे या सभेच्या भरलेल्या अधिवेशनाला ५०० शेतकऱ्यांचा मोर्चा २०० मैल अंतर चालून मनमाडहून फैजापूरला अधिवेशनासाठी आला होता. या अधिवेशनात शेतसारा, वेठबिगारी व ग्रामीण कर्ज याविषयी महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. पण एकंदरीत पाहता महाराष्ट्रात या सभेचे कार्य फारसे झाले नाही. कारण महाराष्ट्रात ही सभा केवळ किरकोळ स्वरूपाचे लढेच लढत होती. यामधील काही महत्वपूर्ण लढ्यांमध्ये खालील लढ्यांचा समावेश आपल्याला करता येईल.

**अ. वारल्यांचा लढा** : किसान सभेने महाराष्ट्रात लढवलेला हा सर्वात मोठा लढा असून हा १९४५ साली सुरू करण्यात आला होता. वारली आदिवासींना एकत्र करून गोदावरी परूळेकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हा लढा चालवला होता. १९४७ मध्ये या लढ्याचे वारल्यांच्या उठावामध्ये रूपांतर झाले होते. या लढयाचे वेठबिगारी नष्ट करणे, शेतमजूरी वाढवून घेणे व वारल्यांवर होणारे अत्याचार थांबवणे हे तीन महत्वाचे हेतू होते. या सशस्त्र लढ्याने पोलिसांनाही जंगलात हिंडायची भिती वाटत होती.

**ब. तेभाग आंदोलन :** किसान सभेने केलेल्या आंदोलनाचा आढावा घेत असताना एक महत्वाचे आंदोलन म्हणून या आंदोलनाचा उल्लेख करावा लागतो. किसान सभेने चालवलेल्या या लढ्याची व्याप्ती व प्रभाव मर्यादित असला तरी स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आले होते म्हणूनच हा लढा महत्वाचा ठरला. या लढ्यापूर्वी शेतकऱ्यांचे जे लढे झाले होत ते जरी राष्ट्रीय चळवळीच्या चौकटीतील असले तरी त्यांचे स्वरूप गांधीवादी होते व ते प्रेरणावादी आणि सुधारणावादी स्वरूपाचेच होते. ते मुख्यतः शांततेच्या मार्गाने व अहिंसात्मक मार्गांनीच लढले गेले होते. पण तेभाग आंदोलनामागील मुख्य प्रेरणा ही डाव्या विचारप्रणालीची होती आणि त्या विचारांतून राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या ग्रामीण जनतेने जाणीवपूर्वक केलेला हा उठाव होता. ही चळवळ दिनापूर जिल्हयातील 'अतवारी' या गावात सुरू झाली. या चळवळीने गावातील बर्गदारांनी जोतदारांना अर्धा हिस्सा देण्यास नकार दिला व भाताचे पीक जोतदारांच्या खळयात न नेता स्वतःच्या खळयातच ठेवले.यापाठीमागे त्यांची अशी मागणी होती की एकूण उत्पन्नापैकी १/३ हिस्सा जोतदारांनी घ्यावा व २/३ हिस्सा बर्गदारांना मिळावा. बर्गदारांच्या या कृतीमुळे पोलिसांना यामध्ये पडणे भाग पडले. यातून पोलिस व बर्गदारांमध्ये संघर्ष निर्माण झाला. आपल्याला अटक होईल या भितीपोटी किसान सभेचे कार्यकर्ते भूमिगत झाले. बर्गदारांनी केलेल्या या चळवळीचे लोण हळूहूळ संपूर्ण दिनापूर जिल्हयात व नंतर इतर जिल्हयातही पसरले. या लढ्यामध्ये बर्गदारांनी उत्सफूर्तपणे सहभाग घेतला. काही ठिकाणी पोलिसांशी संघर्ष झाल्यावर त्यांनी पोस्ट ऑफिस व पोलिस स्टेशनवर सशस्त्र हल्ले केले व जमिनदारांची कचेरीही ताब्यात घेतली.स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेले आणखी एक महत्वाचे आंदोलन म्हणून आपल्याला तेलंगणातील शेतकरी उठावाचा उल्लेख करावा लागेल. हे आंदोलन स्वातंत्र्य पूर्वकाळात सुरू झाले असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजेज १९५१ पर्यंत चालले होते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळी :** भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या चळवळीमध्ये उत्सूर्तपणे सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या आशा अपेक्षाही मोठया प्रमाणात वाढल्या होत्या. आपल्यासमोर उभ्या राहिलेल्या व रहात असलेल्या शेतीविषयक समस्यांची सोडवणूक आपल्या शासनाकडून सहजगत्या केली जाईल व काही प्रमाणात का असेना आपल्याला अधिक सुखाचे दिवस पहायला मिळतील अशी शेतकरी लोकांची अपेक्षा होती. या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी शासनाकडून जमिनसुधारणा व शेतीचा विकास व्हावा यासाठी काही कायदे व सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. भारतात झालेल्या हरित क्रांतीचाही प्रभाव भारतीय शेतकरी वर्गावर पडला. शेतीचे आधुनिकीकरण झाले. पूर्वी केवळ मनुष्य बळावरच सुरू असलेल्या शेतात यंत्रांच्या वापराला व परंपरागत बियाणांच्या बदल्यात अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित बियाणांचा नैसर्गिक खतांच्या ऐवजी रासायनिक खतांचा वापर सुरू झाला व शेती उत्पादनात काही प्रमाणात वाढ झाली. याबाबत दूमत असण्याचे कारण नाही. पण जेंव्हा आपल्या अपेक्षांची पूर्तता होत नाही हे शेतकरी वर्गाच्या लक्षात यायला लागले त्यावेळी त्यांनी शासनाविरोधी चळवळी करायला व आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी प्रयत्न करायला सुरूवात केली. या स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झालेल्या व आजही सुरू असलेल्या चळवळी अगर आंदोलने मुख्यतः कम्युनिस्ट व डाव्या पक्षांकडून व शेतकरी संघटनांनी चालवली असून त्यातील महत्त्वाच्या चळवळींचा व आंदोलनांचा आढावा आपल्याला खालिलप्रमाणे घ्यावा लागेल.

**१. तेलंगणातील शेतकरी उठाव :** १९४६ ते १९५१ या काळात परदेशी विचारवंतानी भारतीय शेतकरी आंदोलनांपैकी तेलंगणा उठाव व बंगालमधील तेभाग चळवळ हीच महत्वाची शेतकरी आंदोलने असल्याचे मत मांडले आहे.पूर्वीच्या निजामाच्या हैद्राबाद संस्थानी राज्याचा तेलंगणा हा एक भाग होता. या भागातही भारतातील इतर भागाप्रमाणेच सरंजामशाही शेती पध्दतीमुळे लहान शेतकरी, कुळे, शेतमजूर यांचा अनन्वित अत्याचार व छळ होत होता. त्यांना सरंजामदारांना प्रचंड कर द्यावा लागत होता. सावकारांकडून होणारी पिळवणूक जहागिरदारांकडून होणारी वेठबिगारीची सक्ती या सर्व गोष्टीविरूध्द शेतकऱ्यांच्यात प्रचंड असंतोष निर्माण होत होता. या भागातील शेतकऱ्यांचे संघटन करून भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या असंतोषाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी खेडोपाडी शेतकऱ्यांची दले उभी केली. निजामाच्या पोलिसांनी आणि जहागिरदारांच्या गुंडांनी जेंव्हा दडपशाहीला सुरूवात केली तेंव्हा या दलांनी त्यांचा प्रतिकार करायला सुरूवात केली. शेतकऱ्यांनी जमिनी ताब्यात घेऊन त्या आपापसात वाटून घेतल्या. १९४७ ला स्वतंत्र झालेल्या भारतात सामिल व्हायला हैद्राबादच्या संस्थानाने विरोध केला. तेंव्हा १९४८ साली सरकारने आपले सैन्य हैद्राबाद संस्थानात पाठवून पोलिस कारवाई केली. सैन्याने हा उठाव मोडून काढण्याचा प्रयत्न केला. काही सुधारणांचे प्रस्ताव मांडून जहागिरदारी नष्ट करण्यात आली. पुढच्या काळात मात्र चळवळीच्या नेत्यांमध्येच बेदिली निर्माण होऊन श्रीमंत कुटुंबातून आलेले या चळवळीचे नेते चळवळीतून बाहेर पडले. परिणामी ही केवळ गरीब शेतकऱ्यांचीच चळवळ उरली. त्यांनी आपल्या परीने ही चळवळ १९५१ पर्यत सुरूच ठेवली. पण कम्युनिस्ट पक्षाने अखेर ऑक्टोंबर १९५१ मध्ये ही चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेतला.

**१९५१ ते १९६५ या कालावधीतील शेतकरी आंदोलने** : १९५१ साली तेलंगणाचे आंदोलन मागे घेतल्यानंतरच्या काळात सुमारे १५ वर्षे आपल्याला शेतकरी आंदोलनाच्या आघाडीवर सामसूम असल्याचे आढळते. १९६५ नंतर मात्र ग्रामीण भागातील असंतोषाने हळूहळू डोके वर काढायला सुरूवात केली आणि १९६७ साली पश्चिम बंगालमधील नक्षलबाडीच्या उठावाने चांगलीच खळबळ निर्माण केली.

**१. नक्षलवादी चळवळ :** पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट पक्षाच्या एका गटाचे असे स्पष्ट मत होते की जमिनसुधारणांच्या कार्यक्रमातून अपेक्षित बदल घडून येत नाही. याबरोबरीनेच शेतकऱ्यांतील राजकीय जाणीव कमी होते.अशा सुधारणावादी उपायांना विरोध करण्यासाठी आणि सरंजामी वर्ग व शासन संस्था यांच्या विरोधात उठाव करण्यासाठी गरीब शेतकरी व आदिवासी भूमिहीन शेतमजूरांना त्यांनी प्रवृत्त करायला सुरूवात केली. त्यांच्या या प्रयत्नांचा परिणाम म्हणून पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलिगुडी तालुक्यात नक्षलबाडी या संथाळ आदिवासींच्या गावात संथाळ शेतकऱ्यांनी जमीनदारांकडून आपल्या जमिनी मे महिन्यात उठाव करून आपल्या आपल्या ताब्यात घेतल्या. त्यांच्या या कृतीला विरोध करायला गेलेल्या पोलिसांनाही त्यांनी सशस्त्र विरोधच केला. हीच नक्षलवादी चळवळीची सुरूवात होय. या चळवळीचा पाया मुख्यतः आदिवासी शेतमजूर व गरीब शेतकरीच होता. हा उठाव सुमारे दोन महिने चालला होता. या उठावानंतर कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी देशाच्या विविध भागात सुमारे दशकभर शेतकरी आंदोलनांना सुरूवात केली.

१९७० साली किसान सभा व शेतमजूर संघानी देशपातळीवर जंगल जमीन व सरकारी जमिनी ताब्यात घेऊन भूमिहीनांमध्ये वाटणे या मुख्य उद्देशाने देशभर 'जमिन बळकाव' आंदोलने सुरू. या चळवळीत काही

मंत्र्यांच्या अतिरिक्त जमिनीही ताब्यात घेण्यात आल्या. शांततेने झालेल्या या सत्याग्रहात असंख्य लोकांनी स्वतःला अटक करवून घेतली.

१९७० नंतर झालेल्या हरितक्रांतीच्या विपरीत परिणामांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले. शेतीसाठी लागणाऱ्या नव तंत्रज्ञानासाठी शेतकऱ्याला पूर्णपणे शहरी उद्योगांवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय उरला नाही. नव्या शहरी बाजारपेठेवरील शेतकऱ्याचे अवलंबन वाढले. याच काळात शहरी बाजारपेठेतील शेतीमालाच्या किंमती शहरी व्यापाऱ्यांकडून व ग्राहकांकडून ठरवल्या जाऊ लागल्या. या किंमतीतील चढउतारांचा परिणाम शेती उत्पादनावर मोठया प्रमाणात होऊ लागला. परिणामी पूर्वी स्वयंपूर्ण असणारा शेतकरी हळूहळू शहरी उद्योग, व्यापारी व ग्राहकांवर अवलंबून राहू लागला. नगदी पिकांचे महत्व वाढले. या बरोबरीनेच भांडवली शेतीचा अवलंब करत असलेल्या श्रीमंत शेतकऱ्यांकडून गरीब शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात पिळवणूक सुरू झाली. श्रीमंत शेतकरी वर्गाने कधी गरीब शेतकरी व आदिवासींची फसवणूक करून तर कधी अत्यंत कमी किंमतीत आदिवासी व ग्रामीण शेतकऱ्यांकडून शेती विकत घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. परिणामी या कालावधीत जमीनीला मुकलेल्या ग्रामीण व आदिवासी शेतमजूरांचा एक मोठा वर्ग उदयाला आला व त्यांची मोठया प्रमाणात पिळवणूक होऊ लागली. परिणामी आपल्या होत असलेल्या पिळवणूकीला विरोध करण्यासाठी शेतकरी जागृत होऊ लागला व आपल्याविरूद्धच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांनी देशाच्या विविध भागात चळवळी उभारायला सुरूवात केली. या काळात पंजाब तामिळनाडू, पंजााब, कर्नाटक या राज्यातील शेतकऱ्यांनी सरकारविरोधी चळवळ सुरू केली. तर बिहारमध्ये संथाळ, मुंडा व इतर राज्यातील शेतकरी वर्गाने 'झारखंड मुक्ती मोर्चा' या संघटनेच्या नेतृत्वाखाली आपल्यावरील अन्यायाविरोधी प्रखर चळवळ सुरू केली.

**महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळी :** महाराष्ट्रात झालेल्या जमीन सुधारणांमूळे आणि 'कसेल त्याची जमीन' यासारख्या कायद्यांमुळे जमीनीचे कुळांकडे हस्तांतर झाले. पण कायद्यातील पळवाटांचा अवलंब करून जमीन मालकांनी बेनामी जमिनी करून त्यांच्यावरचा आपला हक्क अबाधीतच ठेवला होता. काही ठिकाणी त्यांनी कुळांना हुसकावून लावले. परिणामी शेतमजूरांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. पंचवार्षिक योजनाद्वारे शेतीविकासाच्या योजना सरकारने हाती घेतल्या. याबरोबरच लहान मोठ्या पाणीपुरवठा योजना सुरू केल्या. शिवाय शेतीसाठी मुलभूत सोयी करण्यावर व शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यासाठीच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले. परिणामी या सर्वाचा फायदा ग्रामीण भागातील उच्च व मध्यम शेतकरी वर्गाला झाला. हरितक्रांतीनंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात एका बाजूला नवश्रीमंत शेतकरी वर्गाने मोठ्या प्रमाणात सुबत्ता मिळवली. ऊस, कापूस यासारख्या नगदी पिकांच्या मागे लागलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत गेले. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाचे विभाजन होऊन त्यांच्यात जमीनदार, श्रीमंत जमीन मालक, शेतकरी, सुरक्षित कुळे, शेतमजूर असे विविध वर्ग निर्माण झाले. यामुळे ग्रमीण भागातील संपत्तीच्या वाटपाचे प्रमाण बघितले तर सुमारे १० टक्के ग्रामीण साधनांकडे ६२ टक्के मालमत्ता एकवटली. यापैकी सुमारे ३० टक्के शेतकऱ्यांकडे ८५ टक्क्याहून अधिक मालमत्ता एकवटली. परिणामी राहिलेली ७० टक्के ग्रामीण कुटुंबे जवळजवळ निर्धन गटातच ढकलली गेली.

**१. डाव्या पक्षांची आंदोलने :** अशा परिस्थितीतत डाव्या पक्षांनी शेतकऱ्यांना संघटीत करून यासाठी १९७३ पासून रोजगार हमी योजना सुरू करावी. कर्जपुरवठा, गरिबांसाठी घरे, शेतीमालाला रास्त भाव या मागण्यांसाठी आपली आंदोलने सुरू केली. पण त्यांच्या आंदोलनांचा प्रभाव फारसा उरला नाही.

**२. शेतकरी कामगार पक्षाचे कार्य** : स्वतःला डावा पक्ष म्हणवून घेणारा महाराष्ट्रातील आणखी एक पक्ष म्हणून आपल्याला शेतकरी कामगार पक्षाच्या कार्याचा आढावा घेणे गरजेचे आहे. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख यांचे नेतृत्व लाभलेल्या या पक्षाने कर्जमाफी, शेतसारा कमी करावा अशा मागण्या तत्कालीन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या होत्या. पण तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्या अमान्य केल्या. १९५० साली दाभाडी येथे भरण्यात आलेल्या अधिवेशनात जमीनसूधारणा, शेतमजूरांना पुरेसे जीवन वेतन देणे, सावकारी नष्ट करणे, शेतीव्यवसायाला कर्जपूरवठ्याची सोय करणे असा १५ कलमी जाहिरनामा मांडला. याला 'दाभाडी प्रबंध' असे संबोधण्यात आले. १९८० नंतर शेकापने महाराष्ट्रात काही भागात खंडकरी शेतकऱ्यांच्या शासकीय योजनाखाली सरकारच्या ताब्यातील जमिनीचा योग्य मोबदला मिळावा यासाठी मोठी आंदोलने रायगड जिल्हयात केल्याचे दिसून येते.

२. **लालनिशाण पक्षाचे कार्य** : १९७० मध्ये शेतमजूरांमध्ये संघटन करण्यासाठी लालनिशाण पक्षाने अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यात पहिली भूमिहीन शेतमजूरांची परिषद भरवली होती. या परिषदेत दुष्काळ निर्मूलनाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली. यानंतर शासकीय शेती व ऊसाच्या शेतावर काम करणाऱ्या मजूरांना संघटीत करून त्यांच्या कामाचे तास सुट्टया आणि किमान वेतनाच्या प्रश्नावर लालनिशाण पक्षाने आंदोलने उभारली.

३. **समाजवादी पक्षाची शेतकरी व शेतमजूर पंचायत** : १९६९ साली स्थापन झालेल्या या संघटनेच्या उद्दिष्टामध्ये सरकारी पडीक जमीनीचे व जंगल जमिनीचे भूमिहीनांनध्ये पुर्नवाटप करणे कमाल जमीनधारणा कायद्याची अंमलबजावणी आणि अतिरिक्त जमिनीचे भूमिहीनांमध्ये फेरवाटप करणे, शेतकरी व शेतमजूर पंचायतीने प्रामुख्याने शेतकऱ्यांना जमिनीसंदर्भातील कायदाविषयक गोष्टीत मदत करणे व शेतमजूरांच्या जीवनवेतनाचा प्रश्न उचलून धरण्याचा प्रयत्न केला. दलित आदिवासी शेतमजूर यांना समान न्याय मिळावा. ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना व शेतमजूरांना फायदेशीर ठरेल अशी शेतीची पुर्नरचना करणे या प्रमुख उद्दिष्यांना नजरेसमोर ठेवून या शेतमजूर पंचायतीने आपले कार्यक्षेत्र निश्चीत करून शेतकऱ्यांना जमिनीविषयी कायदेशीर सल्ला देण्याचे व शेतमजूरांच्या जीवनवेतनाचा प्रश्न उचलून धरला होता. केवळ एक वर्षाच्या आतच संघटनेने मोठ्या प्रमाणात गरीब शेतकरी व भूमिहीन शेतमजूरांना संघटित करण्यात यश मिळवले. १९७३ मध्ये त्या भागातील एका मोठ्या जमिनदाराचा खाजगी सशस्त्र सेना उभारण्याचा प्रयत्न केला. या मार्क्सवादी कार्यकर्त्यांनी याला प्रचंड विरोध केला. एप्रिल १९७४ साली शेतकऱ्यांनी संपाचे हत्यार उचलले. संघटना व जमिनदारांतील संघर्षामध्ये वाढ झाली. ही चळवळ अजूनही काही प्रमाणात सुरूच असली तरी तीचे कार्यक्षेत्र मात्र मर्यादितच राहिले आहे.

४. **पालघर तालुक्यातील भूमिसेना आंदोलन** : ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील वारली आदिवासीखाली शेतकऱ्यांनीही आदिल नावाच्या आदिवासी नेत्यांच्या नेतृत्वाखाली भूमिसेना ही अराजकीय

संघटना स्थापन केली. या संघटनेने सावकार व जमीनदांविरूध्द उत्सूर्तपणे लढा पुकारला. सुरूवातीला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आदिवासीची असलेली पण सावकारांनी जबरदस्तीने ताब्यात घेतलेल्या शेतातील उभी पिके कापून आपल्या ताब्यात घ्यायला सुरूवात केली. स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सावकारांनी तक्रारी दाखल केल्या. यांच्याकडे सुरूवातीला दुर्लक्ष करण्यात आले. पोलिस बळाचा वापर करून काही आदिवासींना तुरूंगात डांबण्यात आले पण चळवळीच्या उद्रेकाने शेवटी अधिकारी वर्गाला या तक्रारींकडे लक्ष देण्याशिवाय पर्यायच उरला नाही. आपली उभी पिके कापण्याचे व ते आदिवासींमध्ये वाटण्याचे सत्र या संघटनेने चालूच ठेवले. शेवटी अशा ८०० प्रकरणांमध्ये तडजोड करण्यात अधिकारी यशस्वी झले. अतिरीक्त जमिनी आदिवासींमध्ये वाटण्यात आल्या पण जमिनी कसण्याची कोणतीच साधने उपलब्ध नसल्याने आदिवासींना त्या जमिनी सावकारांना परत कराव्या लागल्या. अशा समस्येतून शेतकऱ्यांची सुटका व्हावी या हेतूने आंदोलनाच्या नेत्यांनी शहरातील कांही हितचिंतकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचा प्रयत्नही केला. पण हा प्रयत्नही असफलच ठरला. यातूनही आपली हार न मानता या आंदोलनाच्या नेतृत्वाने शेतकऱ्यात राजकीय जाणीव निर्माण करण्याचे प्रयत्न आजही चालूच ठेवल्याचे दिसून येते. शेतमजूरांना वेठबिगारीतून मुक्त करण्यासाठीचा आपला लढा सुरूच ठेवला.

**५. शेतकरी संघटनेच्या चळवळी :**

**शेतकरी चळवळ :** महाराष्ट्रात शेतकरी संघटनांच्या चळवळींने आपल्या मागण्या व आंदोलनाचे स्वरूपही बदलले. १९७८ साली पुणे जिल्हयातील खेड तालुक्यात शरद जोशी यांनी संघटनेच्या बांधणीला सुरूवात केली आणि मार्च १९८० मध्ये या संघटनेने शरद जोशींच्या नेतृत्वाखाली कांद्याच्या योग्य भावासाठी पहिले मोठे रास्ता रोको आंदोलन केले. याबरोबरीने या संघटनेने ऊसाच्या भावाचा प्रश्न उचलून धरत रास्ता रोको व रेल रोको आंदोलन केले. परिणामी शेतकरी वर्गाच्या अस्तित्वाची जाणीव संपूर्ण समाजात निर्माण झाली. त्यामुळे शरद जोशींना शेतकरी संघटनेचे प्रणेते म्हणून ओळखले जाते. आज मात्र शेतकरी संघटनेचे नेतृत्त्व रघुनाथ (दादा) पाटील करीत आहेत.

**१) कांदा आंदोलन १९८० :** फेब्रवारी १९८० मध्ये चाकणच्या बाजारातील कांद्याचे भाव प्रचंड प्रमाणात घसरले. परिणामी १ मार्च १९८० रोजी शेतकऱ्यांनी आंदोलनास सुरूवात केली व यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या बैलगाड्यांसह चाकण पुणे येथे रस्ता रोको आंदोलन केले. अखेर १५ मार्च रोजी शासनाने शेतकऱ्यांच्या बहुसंख्य मागण्या मान्य केल्याने शरद जोशींनी हे आंदोलन मागे घेतले. शासनाने पुन्हा एप्रिल मध्ये कांदा खरेदी बंद केल्यामुळ परत एकदा असेच आंदोलन नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील निफाड या गावी करण्यात आले.

**२) ऊस आंदोलन – नाशिक जिल्हा :** ऑगस्ट ते नोव्हेंबर १९८०ः ऊस पिकवणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली ऊसाला प्रतिटन ३०० रूपये भाव मिळावा यासाठी आंदोलन केले. आपला ऊस गळीतासाठी साखर कारखान्यांना देणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. साखर लॉबीने हे आंदोलन दडपूण टाकण्याचा प्रयत्न केला पण त्याला न

जुमानतात शेतकऱ्यांनी आपला लढा चालूच ठेवला. सरकारने त्यांच्यावर दडपण आणण्याच्या हेतूने ऊसाचा पाणीपुरवठा व वीजपुरवठा बंद केला. याला विरोध करण्यासाठी नाशिक, धुळे व नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रास्ता रोको व रेल रोको आंदोलनाला सुरूवात केली. या शांततामय मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर पोलिसांनी खरवंडी येथील आंदोलकांवर लाठीमार व गोळीबारही केला .यामध्ये दोन शेतकरी मरण पावले. शेतकरी नेत्यांना अटक केली गेली. शरद जोशींनी तुरूंगातच उपोषणाला सुरूवात केली. २० नोव्हेंबरला विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी एक दिवस चक्का जाम आंदोलन करून या आंदोलनाला पाठींबा दिला व हजारो शेतकऱ्यांनी स्वतःला अटक करवून घेतली. २७ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्र्यांनी ऊसाला प्रतिटन ३०० रूपये व कापसालाही योग्य भाव दिला जाईल अशी घोषणा केली. परिणामी आंदोलन स्थगित करण्यात आले.

**३) तंबाखू आंदोलन निपाणी (मार्च १९८१)** निपाणी येथील शेतकऱ्यांच्या व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या लुटीविरूध्द शेतकरी संघटनेने निपाणी येथे शासनाला सुरूवातीस कल्पना देऊन आणि विचारविनिमयासाठी मुदत देऊनही या शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामूळे १४ मार्च १९८१ रोजी शरद जोशींच्या नेतृत्वाखाली सुमारे ५० हजार शेतकऱ्यांनी पुणे-बेगलोर राष्ट्रीय महामार्ग अडवला होता. हे आंदोलन तब्ब्ल २३ दिवस चालले होते. शेतकऱ्यांनी जेथे रस्ता अडवला होता तेथेच तंबू ठोकून एक 'आंदोलन नगर' च उभारले होते. हा शांततामय मार्गाने सुरू असलेला लढा मोडून काढण्यासाठी कर्नाटक शासनाने ६ एप्रिलला या आंदोलनाच्या नेत्यांना व ८००० आदोलक स्त्री -पुरूषांना अटक केली तर उरलेल्या हजारो आदोलकांवर बेछूट अश्रुधुर व लाठीमार केला व याच्या सहाय्याने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनावर केलेल्या बेछूट गोळीबारात १२ शेतकरी मृत्यूमुखी पडले. या आंदोलनाची मुख्य मागणी तंबाखूला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा हीच होती. या आंदोलनाचे मुख्य लक्ष सरकार हे नसून तंबाखू व्यापारीच होते. शेवटी २० एप्रिलला कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांची तंबाखू खरेदी-विक्री प्रकिया करण्यासाठी एक सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला आणि एकापरीने आंदोलक शेतकऱ्यांची मागणी मान्य केली.

**४) दूध आंदोलन (जून १९८२)** : २२ एप्रिल १९८२ रोजी धुळ्यात भरलेल्या शेतकरी संघटनेच्या मेळाव्यात दूध आंदोलन करण्याचे निश्चित केले. याबरोबरीनेच शेतकऱ्याविरोधी असलेल्या शासनाच्या धोरणांना विरोध करण्यासाठी दुधाचे भाव वाढवून मिळणार नाहीत हे शासनाने जाहिर केल्यामुळे दुधाचे भाव वाढून मिळाले पाहिजेत म्हणून २८ जून १९८२ पासून दूध आंदोलन सुरू करण्यात आले. मात्र नाशिक, धुळे, सातारा, पुणे या जिल्ह्यांचा अपवाद वगळता या आंदोलनाला फारसा पाठिंबा न मिळाल्याने हे आंदोलन फसले. आजही कोल्हापूर जिल्ह्यातील स्वाभीमानी शेतकरी संघटना, रयत क्रांती आघाडी या सारख्या संघटना शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव मिळावा, दूधाला योग्य भाव व शासनाकडून अनुदान मिळावे या मागण्यांसाठी आंदोलने करताना आढळतात. पण त्यांनाही फारसा पाठिंबा मिळत नसल्याचे दिसून येते.

**५) पंढरपूर-विठोबाला साकडे मेळावा १६ नोव्हेंबर १९८३** : या अधिवेशनाला शेतीमालाला योग्य भाव मिळावा व 'कृषीमूल्य आयोग' बरखास्त करावा यासाठी सुमारे ६० ते ६५ हजार शेतकऱ्यांनी मागणी केली. याबरोबरच १९८४ हे शेतकऱ्यांचे स्वातंत्रवर्ष आहे असे घोषित केले.

**६) परभणी अधिवेशन :** या अधिवेशनाला महाराष्ट्राच्या विविध भागातील शेतकरी व इतर राज्यातील प्रतिनिधी उपस्थित राहिले होते. अधिवेशनात पुढारी व कर्जवसुली अधिकाऱ्यांसाठी गावबंदी कार्यक्रम, कृत्रिम कापड वापरण्यास बंदी करणे, ट्रॅक्टर, इंजिन, इलेक्ट्रीक मोटर अशा वस्तू निदान वर्षभर खरेदी न करणे असे आदेश देण्यात आले होते.

**७) चंदिगडच्या राजभवनावर पिकेटिंग मार्च १९८४ :** यामध्ये पंजाबमधील भारतीय किसान युनियनच्या आंदोलनात महाराष्ट्रातील सुमारे दीड हजार शेतकरी सहभागी झाले. पुढे पंजाबमधील शेतकरी आंदोलनात शरद जोशींनी जुलै मध्ये सहभाग घेतला तेंव्हा त्यानांही अटक करण्यात आली. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी जेलभरो आंदोलन केले. १९८४ मध्ये शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी प्रचार फेरी, प्रचार सभा यांची आखणी करण्याचे ठरविण्यात आले.

**८) कापूस आंदोलन ९ व १० नोव्हेंबर, १९८६ आणि नोव्हेंबर–डिसेंबर, १९८६ :** दोन टप्प्यातील या आंदोलनात सुरूवातीला कृत्रिम धाग्याच्या कापडावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला व ठिकठिकाणी अशा कापडाची होळी करण्यात आली. याबरोबरव दुष्काळी भागातील शेतमजूरांना काम मिळावे. शेतमजूरांसाठी असे काम उपलब्ध करून देण्यात यावे यासाठीही आंदोलने उभारली गेली. पुढे २३ नोव्हेंबर, १९८६ रोजी विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ अमरावती, अकोला या जिल्ह्यात आणि मराठवाडयातील परभणी नांदेड या जिल्ह्यात शेतकरी संघटनेने अत्यंत शांततेने 'रास्ता रोको आंदोलने केली.

**९) कर्जमुक्ती आंदोलन :** १९८८–१९८९ः 'शेतीमालाला रास्त भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गाची प्रचंड लूट होते. असा तुटीचा धंदा करण्यासाठी शासनाकडून जे कर्ज दिले जाते त्याची परतफेड करणे शेतकऱ्याला अशक्य होते. त्यांची या कर्जातून नादारी घोषित करून त्यांना मुक्त करावे या विचाराने केवळ रस्त्यावर आंदोलन न करता न्यायालयात वकिलांच्या मदतीने हा लढा लढण्याचे ठरवण्यात आले. शेतकरी लोकांकडून कर्जमुक्ती साठी अर्ज भरून घेऊन ते न्यायालयात सादरही करण्यात आले. बराच काळ चाललेला हा न्यायालयीन लढा ठरला. नंतर राज्य व केंद्र सरकारनेही कर्जमाफीची योजना मंजूर केली.

याबरोबरीनेच राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने व सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती आघाडीनेही आपल्या आपल्या ताकदीच्या जोरावर कोल्हापूर, सांगली, सातारा व जवळच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संघटित करून ऊस दराच्या वाढीसाठी व दूध दराच्या बाबत मोठया प्रमाणात आंदोलने हाती घेतली आहेत व आजही प्रसंगानुरूप या नेत्यांच्या हाकेला ओ देऊन या भागातील शेतकरी विविध प्रकारची आंदोलने चालवत आहे.

**सारांश :** अगदी थोडक्यात शेतकरी व शेतीसंबंधीत घटकांना योग्य न्याय मिळावा. त्यांच्या शेती उत्पादनाला रास्त भाव मिळावा. त्यांच्या समस्यांपासून त्यांना मुक्ती मिळावी या हेतूने अगदी प्राचिन काळापासून वेगवेगळया मार्गांनी व वेगवेगळया नेत्यांनी शेतकरी बांधवांना संघटीत करण्याचा, त्यांच्यात योग्य जाणीव व जागृती करण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. आजही तो प्रयत्न त्यांच्याकडून होताना दिसतो आहे. आज काही

प्रमाणात जागृत झालेला शेतकरी आपल्या रास्त मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून शासनाशी भांडावयास तयार होतो आहे हेच दिसून येते. पण यासाठी प्रदीर्घ कालावधी जावा लागला हे वास्तव आपल्याला मान्य करावे लागते.

### ३.३.३. शेतकरी चळवळींचे परिणाम :

**शेतकरी चळवळीचे किंवा आंदोलनाचे परिणाम** : अगदी सुरूवातीपासून असंख्य समस्या व अडचणींना तोंड देत आलेला दिवस ढकलत संपूर्ण लोकांच्या हाता तोंडाची लढाई सहजगत्या सुटावी यासाठी जीवापाड झटत असलेला शेतकरी, पूर्वीच्या जमिनदार, सावकार व नगदी पिकांवर पोसलेल्या अगदी अलिकडच्या काळातील सहकार महर्षीच्या विरोधात उभा ठाकत असल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते. नेमके शेतकरी चळवळीचे समाजावर काय परिणाम झाले आहेत याचा आढावा आपल्याला खालिलप्रमाणे घेता येईल.

**१. शेती उत्पादनात झालेली वाढ** : स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या विकासासाठी शासनाकडून वेगवेगळया योजना राबवल्या गेल्या. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शासकिय पातळीवरून विविध कायदे करण्यात आले. जमिनदारी निर्मुलन व वेठबिगारीला चाप बसावा यासाठी कायदे केले गेले. शेतकऱ्यांना सुलभरीत्या कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी सहकारी पतपुरवठा सुरू केला. शेतकरी संघांची स्थापना करण्याचा प्रयत्न केला गेला. शेतीसाठी सुधारित बि बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी शासकीय पातळीवरून प्रयत्न केले गेले. हरित क्रांतीनंतरतर सुधारीत शेती अवजारे, बी-बियाणे उपलब्ध करण्याची चढाओढ लागली. शेतीत वापरण्यासाठी सुधारीत तंत्रज्ञान शेतकरी वर्गाला कसे उपलब्ध करून देता येईल याचा गांभिर्याने विचार सुरू झाला. परंपरागत शेतीपेक्षा नगदी पिकांखाली आलेल्या जमिनीचे क्षेत्र वाढत गेले. अशा शेती मालावर प्रक्रिया करणारे कारखाने सहकारी तत्वावर सुरू करण्यावर भर देण्यात आला. शेतीबरोबरीनेच शेतीशी संबंधीत दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी संकरीत जनावरांची पैदास वाढवण्यावर भर देण्यात आला. शेती उत्पादनाकडे शेतकऱ्यांनी एक व्यवसाय म्हणून पहावे अशी विचारसरणी निर्माण झाली. यामुळे मुळ शेतकऱ्याला लाभलेली अगर कायद्याने मिळालेली जमीन टिकवूण ठेवण्यात शेतकरी कमी पडू लागला. परत एकदा शेतकऱ्याला मिळालेली जमिन सावकाराकडे जमिनदाराकडे अगर शहारातून आलेल्या नवश्रीमंतांच्या मध्यम वर्गाला आपल्या जमिनी द्याव्या लागल्या. लोकसंख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली परिणामी शेती भावाभावांमध्ये तुकड्याच्या स्वरूपात वाटली जाऊ लागली. आपल्या वाटयाला आलेल्या जमिनीत कष्ट करून वर्षाची बेगमी होणार नाही हे लक्षात आल्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांनी कांहीतरी चाकरी अगर नोकरी मिळवण्यासाठी शहरांतील नवउद्योगांकडे धाव घ्यायला सुरूवात केली व सर्वांनाच अशी नोकरी उपलब्ध न झाल्याने अशा शहरातील गावाकडून काहीतरी करून पोट भरण्यासाठी आलेल्या मुलांमध्ये बेकारीची समस्या वाढत गेली.

**२. कुटुंबसंस्थेवर पडलेला ताण** : पूर्वी भारतात संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात होती व घरातील सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्रच रहात होते. पण बदललेल्या परिस्थितीच्या परिणामी एकत्र कुटुंबाचे विघटन व्हायला सुरूवात होऊन विभक्त कुटुंबव्यवस्थेला चालना मिळाली. यामुळे पूर्वी कुटुंबप्रमुखाच्या नियंत्रणाखाली राहणारी पिढी नियंत्रणाला जुमानेशी झाली आणि ग्रामीण भागात पूर्वी अस्तित्वात नसलेली वृध्दांची समस्या निर्माण

झाली. आज तर शहरात गेलेला व स्थिरस्थावर झालेला मुलगा आपल्या पत्नीसह शहरात वास्तव्य करणे पसंत करू लागला. परिणामी कुटुंबाविषयी आपल्या जून्या पिढयांविषयी पूर्वीचा आदर उरला नाही. यातून वृध्दाश्रमांच्या निर्मितीला चालना मिळाली. आज जरी अशा वृध्दाश्रमात प्रामुख्याने दुर्लक्षित शहरी वृध्दांची भरती मोठया प्रमाणात दिसत असली तरी हळूहळू हे लोन ग्रामीण भागात व शेतकरी कुटूंबातही झिरपू लागले आहे हे वास्तव मान्यच करावे लागेल.

**३. गावकुसावर झालेला परिणाम** : पूर्वी जातिसंस्थेच्या नियमांचे मोठया प्रमाणात शेतकरी कुटुंबात व ग्रामीण भागात पालन होत होते. गाव गुण्यागोविदाने नांदत होता. सर्वांच्या सगळया गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांकडून व बारा बलुतेदारांकडून व अठरा आलुतेदारांकडून केला जात होता. परिणामी गाव म्हणजे एक स्वावलंबी बेटच बनले होते. पण बदलत्या काळात ही बंधने गळून पडू लागली आहेत. मागासवर्गीयांना लाभलेल्या सवलतींमुळे त्यांच्यातही शिक्षणाचा प्रसार झाला. या समाजातील तरूण वर्गही नोकरी धंद्यासाठी शहरांची वाट चोखाळू लागला.परिणामी शेतात काम करण्यासाठी मनुष्य बळाचा तुटवडा जाणवू लागला. ही ऊणीव नव्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने काही प्रमाणात भरून काढल्याचा दावा जरी केला जात असला तरी हे नवतंत्रज्ञान स्वीकारण्या इतपत सधनता ग्रामीण भागातील सर्वसामांन्य शेतक-यांकडे नाही. हे ही विसरून चालणार नाही.

**४. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारभावावर आधारीत किंमत मिळू लागली** : आस्मानी व सुलतानी संकटांना धैर्याने सामोरे जात शेतकरी शेतीत उत्पादन घेत आहे. पण त्याच्या मालाला त्याच्या मताप्रमाणे नव्हे तर व्यापारीवर्गाच्या व ग्राहकांच्या मर्जीप्रमाणे दर मिळू लागला. परिणामी जरी शेती उत्पादनात वाढ होत गेलेली दिसत असली तरी आजही भारतातील बहुसंख्य शेतकरी दरिद्रीच आहेत. एका बाजूला आपल्या शेतात वर्षभर राबूनदेखील केवळ शेतात उत्पादन चांगल्याप्रकारे यावे यासाठी स्वतःची जमिन घाण ठेवतो. मुलीच्या लग्नासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी सरकारी बँका व खाजगी सावकाराकडून कर्ज उभारून शेतात राबतो आहे.या सर्वाचा कडेलोट झालेला शेतकरी कर्ज कसे फेडायचे या विवंचनेने स्वकेंद्रीत होऊन आत्महत्येचा मार्ग अवलंबताना एका बाजूला दिसत आहे. अशा दुर्दैवी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा दिवसागणीक वाढतो आहे. ही खरोखरच चिंतनाची व चिंतेची बाब आहे. आहे.

**५. शेतकऱ्यांत निर्माण झालेली स्वहक्कांची जाणीव** : याबरोबरच शेतकरी वर्गात जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी समाजसुधारकांनी व नंतर शेतकरी संघटनांनी केलेल्या परिणामांमुळे आज कांही प्रमाणात शेतकरी जागृत होऊ लागला तर दुसरीकडे हे ही दिवस बदलतील व आपल्याला योग्य पध्दतीने शासनाकडून न्याय मिळेल किंवा तो मिळाला नाही तर रस्त्यावर उतरून आपण आपल्या रास्त मागण्या शासनाला मान्य करायला लावायच्या याबाबत त्यांच्यातील जागृती वाढली आहे. यामागे विविध शेतकरी नेत्यांनी काळाच्या ओघात शेतकरी संघटनांच्या उभारलेल्या जाळयांचा आपणास विचार करावा लागेल. अशा चळवळींमुळे शेतकरी आज काही प्रमाणात का असेना संघटित होताना दिसतो आहे.

डाव्यापक्षांनी शेतकऱ्यांसाठी हाती घेतलेली आंदोलने, महेंद्रसिंग टकैत, शरद जोशी, राजू शेट्टी व अलिकडच्या काळात सदाभाऊ खोत आपल्या आपल्या शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला

योग्य भाव मिळावा यासाठी विविध आंदोलने करताना दिसत आहेत व अशा आंदोलनात शेतकरीही आपला काही प्रमाणात फायदा होईल या हेतूने नेत्यांच्या हाकेला ओ देत रस्त्यावर उतरून आंदोलनात सहभागी होत आहे.

शेतकरी संघटनचे नेते व त्यांची राजकीय हाव दुसरीकडे अशा पध्दतीने शेतकरी संघटना निर्माण करून शेतकऱ्यांच्यात जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करतानाच त्यातून आपला फायदा कसा करून घेता येईल याचाही विचार संघटनेच्या नेत्यांकडून होताना दिसून येतो. केवळ राजकीय पक्षाला पाठींबा द्यायचा की नाही या प्रश्नावरून शरद जोशींच्या शेतकरी संघटनेतून फुटून दूर झालेल्या व स्वतःची एक स्वतंत्र संघटना 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' म्हणून स्थापन करण्यात यशस्वी झलेल्या राजू शेट्टी यांनी आपल्या संघटनेच्या ताकदीवर साखर कारखानदारांना सळो की पळो करून सोडले. शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर मिळावा यासाठी शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून लढा उभारला त्याचा फायदा म्हणून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कांही प्रमाणात त्यांच्या ऊसाला योग्य दर मिळाला. याबरोबरच दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला योग्य भाव मिळालाच पाहिजे याबरोबरच शासनानेही अशा दूध उत्पादकांना कांही प्रमाणात अनुदान द्यावे यासाठीही वेगवेळे लढे उभारले आहेत. आजही त्यांचे प्रयत्न त्यादृष्टीने सुरूच आहेत ही एक बाब तर दुसरीकडे आपण संघटित केलेल्या शेतकऱ्यांच्या ताकदीचा पुरेपूर वापर करून आपल्याला राजकीय सत्ता कशी मिळवता येईल व टिकवून ठेवता येईल याचाही विचार करून एकदा कोल्हापूर जिल्हा परिषद सदस्यत्व. दोनदा आमदारकी मंत्रीमंडळात सहभाग व एकदा खासदारकीची निवडणूकही मातब्बर उमेदवाराला पराभूत करून सहजगत्या जिंकली आहे. पण या सत्तेच्या काळात कांही वेळा त्यांच्याकडूनही शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्षच झाल्याचे दिसून येते पण सत्ता बदलानंतर मात्र अलिकडे परत एकदा या संघटनेने दूधाला रास्त भाव मिळावा यासाठी आंदोलन सुरू केले. दूध ऊत्पादक शेतकऱ्यांनी त्याच्या आवाहनाला पाठींबा देत असे आंदोलन सुरू झाल्यावर त्यात उत्स्फूर्त सहभाग घेतल्याचे दिसून येते. या आंदोलनावेळी संघटीत झालेल्या शेतकऱ्यांनी दूध वाहतूक करणारे टँकर अडवूण त्यातील शेतकऱ्यांनीच उत्पन्न केलेले दूध रस्त्यावर ओतून दिले असे का घडले हेच समजत नाही. याचीच प्रचिती सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती संघटनेने केलेल्या दूध आंदोलनावेळी दिसून आली. अगदी अलिकडेच आमदार पदावर विराजमान झालेल्या व स्वतःला शेतकरी नेता समजून त्यांचे संघटन बांधून त्यांच्या न्याय हक्कांसाठी आमदार नसताना ज्यांनी 'आसूड मोर्च्या' सारखी आंदोलने करून शेतकऱ्यांचे प्रश्न समाजासमोर व तत्कालीन शासनासमोर मांडले. त्या नेत्याविषयी एका सामाजिक कार्यकर्त्याने आपल्या फेसबुकवर आपण आज संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्याने का आंदोलन सुरू करत नाही? अशी साधी पोस्ट टाकल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांकडून अश्लिल कॉमेंटस टाकल्याचे दिसून आले. या सामाािजक कार्यकर्त्याने केवळ नव आमदारांना याविषयी फोनद्वारे प्रश्न विचारल्यानंतर तुम्ही तुमच काम बघा आम्ही आंदोलन केंव्हा करायच किंवा करायचं की नाही हे आमच आम्ही ठरवणार असे उत्तर दिले. यावरून अशा स्वयंघोषित शेतकरी नेत्यांच्या शेतकरी चळवळी अगर आंदोलनामागील हेतू नेमका कोणता असावा असा प्रश्नही निर्माण व्हायला जागा निर्माण होते.

### ३.४ सारांश :

एकविसाव्या शतकात सर्वत्र नवतंत्रज्ञानाचा व सोशल मिडायाचा बोलबाला प्रचंड प्रमाणात होत असतानाही आपल्याला भारतीय समाजातील जवळजवळ ६५ ते ७० टक्के लोक आजही शेती आणि शेतीसंबंधीत कार्याशी निगडित असल्याचे मान्य करावे लागते. त्याबरोबरीनेच शेतीक्षेत्रात घडणाऱ्या प्रत्येक बदलांचा परिणाम एकंदर भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो हे ही तितकेच खरे आहे. शेतकरी चळवळींना अगर आंदोलनांना जरी दीर्घ इतिहास लाभला असला तरी स्वातंत्र्योत्तर काळातच मुख्यतः १९७० नंतरच शेतकरी आंदोलने मोठ्या प्रमाणात झालेली आढळतात.

### ३.३.३. शेतकरी चळवळींचे परिणाम

**१. शेती उत्पादनात झालेली वाढ :** स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या विकासासाठी शासनाकडून वेगवेगळ्या योजना राबवल्या गेल्या शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शासकिय पातळीवरून विविध कायदे करण्यात आले. जमिनदारी निर्मुलन व वेठबिगारीला चाप बसावा यासाठी कायदे केले गेले. शेतकऱ्यांना सुलभरित्या कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी सहकारी पतपुरवठा सुरू केला. शेतकरी संघांची स्थापना करण्याचा प्रयत्न केला गेला. शेतीसाठी सुधारित बि बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी शासकीय पातळीवरून प्रयत्न केले गेले. शेती मालावर प्रक्रिया करणारे कारखाने सहकारी तत्वावर सुरू करण्यावर भर देण्यात आला. शेतीबरोबरीनेच शेतीशी संबंधीत दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी संकरित जनावरांची पैदास वाढवण्यावर भर देण्यात आला.

**२. कुटुंबसंस्थेवर पडलेला ताण :** पूर्वी भारतात संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात होती व घरातील सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्रच रहात होते. पण बदललेल्या परिस्थितीच्या परिणामी एकत्र कुटुंबाचे विघटन व्हायला सुरूवात होऊन विभक्त कुटुंबव्यवस्थेला चालना मिळाली. यामुळे पूर्वी कुटुंबप्रमुखाच्या नियंत्रणाखाली राहणारी पिढी नियंत्रणाला जुमानेशी झाली.

**३. गावकुसावर झालेला परिणाम :** पूर्वी जातिसंस्थेच्या नियमांचे मोठया प्रमाणात शेतकरी कुटुंबात व ग्रामीण भागात पालन होत होते. गाव गुण्यागोविदाने नांदत होता. सर्वांच्या सगळया गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न शेतक-यांकडून व बारा बलुतेदारांकडून व अठरा आलुतेदारांकडून केला जात होता. परिणामी गाव म्हणजे एक स्वावलंबी बेटच बनले होते. पण बदलत्या काळात ही बंधने गळून पडू लागली आहेत. मागासवर्गियांना लाभलेल्या सवलतींमुळे त्यांच्यातही शिक्षणाचा प्रसार झाला. या समाजातील तरूण वर्गही नोकरी धंद्यासाठी शहरांची वाट चोखाळू लागला.

**४. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारभावावर आधारित किंमत मिळू लागली :** आस्मानी व सुलतानी संकटांना धैर्याने सामोरे जात शेतकरी शेतीत उत्पादन घेत आहे. पण त्याच्या मालाला त्याच्या मताप्रमाणे नव्हे तर व्यापारीवर्गाच्या व ग्राहकांच्या मर्जीप्रमाणे दर मिळू लागला. एका बाजूला आपल्या शेतात वर्षभर राबूनदेखील केवळ शेतात उत्पादन चांगल्या प्रकारे यावे यासाठी स्वतःची जमिन घाण ठेवून अगर मुलीच्या लग्नासाठी मुलांच्या शिक्षणासाठी सरकारी बँका व खाजगी सावकाराकडून कर्ज उभारून शेतात राबतो आहे.

**५. शेतकऱ्यांत निर्माण झालेली स्वहक्कांची जाणीव :** शेतकरी वर्गात जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी समाजसुधारकांनी व नंतर शेतकरी संघटनांनी केलेल्या प्रयत्नामुळे आज काही प्रमाणात शेतकरी जागृत होऊ लागला

आंदोलनावेळी संघटीत झालेल्या शेतकऱ्यांनी दूध वाहतूक करणारे टँकर अडवून त्यातील शेतकऱ्यांनी केलेले दूध रस्त्यावर ओतून दिले असे का घडले हेच समजत नाही. याचीच प्रचिती सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती संघटनेने केलेल्या दूध आंदोलनावेळी दिसून आली. अगदी अलिकडेच आमदार पदावर विराजमान झालेल्या व स्वतःला शेतकरी नेता समजून त्यांचे संघटन बांधून त्यांच्या न्याय हक्कांसाठी आमदार नसताना ज्यांनी 'आसूड मोर्च्या' सारखी आंदोलने केरून शेतकऱ्यांच्याचे प्रश्न समाजासमोर व तत्कालीन शासनासमोर मांडले. त्या नेत्याविषयी एका सामाजिक कार्यकर्त्याने आपल्या फेसबुकवर आपण आज संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्याने का आंदोलन सुरू करत नाही? अशी साधी पोस्ट टाकल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांकडून अश्लिल कॉमेंटस टाकल्याचे दिसून आले. या सामाजिक कार्यकर्त्याने केवळ नव आमदारांना याविषयी फोनद्वारे प्रश्न विचारल्यानंतर तुम्ही तुमच काम बघा आम्ही आंदोलन केंव्हा करायच किंवा करायच की नाही हे आमचे आंम्ही ठरवणार असे उत्तर दिले यावरून अशा स्वयंघोषित शेतकरी नेत्यांच्या शेतकरी चळवळी अगर आंदोलना मागील हेतू नेमका कोणता असावा असा प्रश्नही निर्माण व्हायला जागा निर्माण होते.

**स्वयंअध्ययन प्रश्न १ (एका वाक्यात उत्तरे द्या.)**

१. कमी कष्ट व जास्त उत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी शेतकरी कोणत्या प्रकारच्या पिकाकडे वळतो आहे.

२. जल सिंचनाच्या बाबतीत भारतीय शेती कशावर अवलंबून आहे.

३. शेती उत्पादनाला योग्य भाव का मिळत नाही.

४. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे कोणाचा फायदा होत आहे.

५. शेतकऱ्यांचे कोणते दुष्टचक्र लवकर संपेल असे आजतरी वाटत नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न २ (रिकाम्या जागा भरा.)**

१. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी .........हे पुस्तक लिहीले.

२. खानदेशातील भिलांनी १८२२ ते १८५७ या कालावधीत ....... विरूध्द बंड केले.

३. .......... शेतकरी संघटनेचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

४. सत्यशोधक समाजाने १८७३ साली कोणते साप्ताहिक सुरू केले.

**३.५ स्वयं –अध्ययन प्रस्नांची उत्तरे :**

**स्वयं अध्ययन प्रश्न १. (एका वाक्यात उत्तरे द्या.)**

१. कमी कष्ट व जास्त उत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी शेतकरी नगदी पिकाकडे वळतो आहे.

२. जल सिंचनाच्या बाबतीत भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे.

३. कारण शेती मालाच्या खरेदी विक्री व्यवस्थेवर शेतकऱ्यांचे नियंत्रण नााही.

४. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे व्यापारांचा फायदा होत आहे.

५. शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र लवकर संपेल असे आजतरी वाटत नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न २ (रिकाम्या जागा भरा)**

१. 'बिरसा मुंडा'याच्या नेतृत्वाखाली मुंडा आदिवासी जमातीची चळवळ सुरू झाली.

२. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांचे आसूड हे पुस्तक लिहीले.

३. खानदेशातील भिलांनी १८२२ ते १८५७ या कालावधीत ब्रिटीशांविरूध्द केलेले बंड.

४. शरद जोशींना शेतकरी संघटनेचे प्रणेते म्हणून ओळखले जाते.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ (योग्य जोड्या जुळवा.)**

| अ. चळवळींची नावे | ब. चळवळींचे प्रमुख नेते |
|---|---|
| १. शेतकरी संघटना | अ. श्री शरद जोशी |
| २. स्वाभिमानी संघटना | ब. श्री राजू शेट्टी |
| ३. रयत क्रांती संघटना | क. श्री सदाभाऊ खोत |

**३.६. सरावासाठी प्रश्न :**

१. भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या विषद करा.

२. भारताातील प्रमुख शेतकरी चळवळींच्यावर चर्चा करा.

३. शेतकरी चळवळींचे समाजावरील परिणाम स्पष्ट करा.

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**

१. एम. एस. राव. 'भारतातील सामाजिक चळवळी' मनोहर पब्लीकेशन २०००.

२. प्राची चिकटे. 'भारतातील सामाजिक चळवळी' डायमंड पब्लीकेशन पुणे २००८.

३. घनशाम शहा 'भारतातील सामाजिक चळवळी' सेज पब्लीकेशन दिल्ली २००४.

❑❑❑

# घटक – ४
# कामगार चळवळी
# (Labor Movements)

**घटक संरचना:**

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ अभ्यास विषयाची मांडणी

 ४.३.१ कामगार संकल्पना

 ४.३.२ भारतातील कामगारांच्या समस्या

 ४.३.३ महाराष्ट्रातील कामगार चळवळी

 ४.३.४ कामगार चळवळींचा परिणाम

४.४ सारांश

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थांना

१) कामगार या संकल्पनेचा अर्थ व भारतातील कामगारांच्या समस्या स्पष्ट करता येतील.

२) महाराष्ट्रातील कामगार चळवळींची पार्श्वभूमी व महाराष्ट्रातील प्रमुख कामगार चळवळी याबाबत स्पष्टीकरण मिळेल.

३) कामगार चळवळींचा कामगार व समाजावरील परिणामांचे स्पष्टीकरण मिळेल.

## ४.२ प्रस्तावना (Introduction) :

कोणताही समाज स्थिर नसतो. समाजामध्ये सतत विविध प्रकारचे सामाजिक परिवर्तन सुरु असते. म्हणजेच समाज हा सामाजिकदृष्ट्या परिवर्तनशील असतो. यापुढे जाऊन विचार केला तर आपणास असे म्हणता येईल की, समाजामध्ये सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया निरंतरपणे सुरु असते. या प्रकारचे सामाजिक परिवर्तन सामाजिक

व्यवस्था, समाजाची संरचना, सामाजिक संबंध, सामाजिक स्तरीकरण इ. घटकांशी संबधित असते. सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी समाजांतर्गत व समाजबाह्य असे दोन्ही प्रकारचे विविध घटक जबाबदार असतात. सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी महत्वाचा घटक म्हणून सामाजिक चळवळींचा उल्लेख करता येईल.

समाजशास्त्र हा विषय इतर विषयांशी समन्वय साधणारा विषय आहे. याचाच अर्थ असा की, समाजशास्त्राचा अभ्यासविषय थेट इतर विषयांशी संबधित आहे. समाजशास्त्रामध्ये अभ्यासल्या जाणाऱ्या विविध घटकांचा संबंध आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा आहे. उदा. समाजशास्त्रामध्ये सामाजिक चळवळींच्या अध्ययनाला महत्वाचे स्थान आहे. त्याचबरोबर राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र इ. सामाजिक शास्त्रांमध्ये समाविष्ट असणाऱ्या विविध विषयांमध्येही सामाजिक चळवळीच्या अध्ययनाला विशेष महत्व आहे. राज्यशास्त्रामध्ये राजकीय दृष्टीकोनातून, इतिहासामध्ये ऐतिहासिक दृष्टीकोनातून तर अर्थशास्त्रामध्ये अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून सामाजिक चळवळी अभ्यासल्या जातात. थोडक्यात, सामाजिक चळवळी हा आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून अभ्यासला जाणारा अत्यंत महत्वाचा घटक आहे. समाजशास्त्रामध्ये सामाजिक चळवळींचे सर्वसामान्य वर्गीकरण पाहता विरोधी चळवळी, सुधारणा चळवळी, क्रांतिकारी चळवळी, प्रतिगामी चळवळी, धार्मिक चळवळी, सामुदायिक चळवळी व व्यक्तिकेंद्रित सामाजिक चळवळी असे प्रकार पडतात. भारतामध्ये या सर्व प्रकारच्या विविध सामाजिक चळवळी घडून आलेल्या आहेत. उदा. शेतकरी चळवळी, दलित चळवळी, आदिवासी चळवळी, पर्यावरण विषयक चळवळी, कामगार चळवळी इ.

सामाजिक चळवळ हे एक प्रकारे सामुहिक वर्तन असते. समाजामध्ये ज्या प्रकारची सामाजिक व्यवस्था अस्तित्त्वात असते त्या प्रकारचे सामुहिक वर्तन त्या समाजामध्ये घडून येत असते. भारतीय समाजव्यवस्थेचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था या समाजव्यवस्थांमध्ये ज्या प्रकारचे बंदिस्त स्वरूपाचे सामाजिक संबंध अस्तित्त्वात होते, त्याच प्रकारचे बंदिस्त सामुहिक वर्तन समाजामध्ये अस्तित्त्वात होते. थोडक्यात, या समाजव्यवस्थांमध्ये सामुहिक वर्तनाला फारसे स्थान नसल्याचे दिसून येते. जसजसा या समाजव्यवस्थांचा प्रभाव कमी होवू लागला तसतसे सामाजिक चळवळीच्या स्वरुपात सामुहिक वर्तन घडून येवू लागले. प्रत्येक सामाजिक चळवळ उदयास येण्यापाठीमध्ये विशिष्ट प्रकारची सामाजिक परिस्थिती कारणीभूत असते. याप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व भारतामध्ये व स्वातंत्र्योत्तर भारताच्या विविध राज्यांमध्ये कामगार वर्गाच्या विविध चळवळी निर्माण होण्यास तत्कालीन सामाजिक परिस्थिती कारणीभूत ठरली. प्रामुख्याने औद्योगिक क्रांतीनंतर कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला व या कामगार वर्गाला दैनंदिन जीवन जगताना विविध प्रकारच्या समस्या उद्भवू लागल्या, या परिस्थितीमधून प्रामुख्याने कामगारांच्या विविध चळवळी उदयास आलेल्या आहेत.

### **४.३ अभ्यास विषयाची मांडणी** (Presentation of Subject Matter):

नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत संलग्नित महाविद्यालयात बी.ए. भाग २ च्या Major Mandatory ($MM^2$) ३ ऱ्या सत्रासाठी 'भारतातील सामाजिक चळवळी' हा पेपर अभ्यासाकरीता आहे. या पेपरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतातील विविध सामाजिक चळवळींची माहिती देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या पेपरमध्ये एकूण चार युनिटचा समावेश करण्यात आलेला आहे. पेपरमधील चौथे

व शेवटचे युनिट 'कामगार चळवळी' असे असून या युनिटमध्ये आपण भारतातील कामगारांच्या समस्या, महाराष्ट्रातील कामगारांच्या प्रमुख चळवळी व कामगार चळवळींचा परिणाम या घटकांची सखोल माहिती जाणून घेणार आहोत. तसेच कामगार ही संकल्पना जाणून घेतल्याशिवाय कामगारांच्या समस्या, कामगार चळवळीच्या उत्पत्तीची पार्श्वभूमी इ. बाबी सविस्तरपणे जाणून घेता येणार नाहीत. यामुळे सदर युनिटच्या संदर्भात कामगार संकल्पना जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या अनुषंगाने सर्वप्रथम 'कामगार' या संकल्पनेच्या विविध व्याख्या व कामगार संकल्पनेचा अर्थ पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेला आहे.

**४.३.१ कामगार संकल्पना** (Concept of Labour):

कार्ल मार्क्सच्या मते, मानव जातीचा इतिहास आर्थिक घटकावर आधारित आहे. मानवाचा इतिहास केवळ दोनच वर्गांवर आधारित आहे. पहिला वर्ग म्हणजे उत्पादन व्यवस्थेमधील उत्पादन साधनांवर मालकी हक्क असणारा वर्ग तर, दुसऱ्या वर्गाची उत्पादन साधनांवर काहीच मालकी हक्क नसतो. हा वर्ग केवळ उत्पादन व्यवस्थेमध्ये शारीरिक कष्ट करीत असतो. आर्थिक घटकाचा इतिहास मांडताना मार्क्सने भांडवलशाही समाजव्यवस्थेमधील कामगार वर्गाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. मार्क्सच्या मते, कामगार हा उत्पादन व्यवस्थेमधील सर्वात महत्वाचा घटक आहे. कारण, कामगार केवळ उत्पादन व्यवस्थेमध्ये शारीरिक कष्ट करीत नाही तर, आपले ज्ञान व कौशल्यांच्या आधारे कच्च्या मालाचे रुपांतर उत्पादनात करत असतो. कामगार ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी काही व्याख्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेल्या आहेत.

All human efforts of body or mind which are undertaken in the expectation of reward. In economics, labour is a factor of production, representing the work done by humans. This includes both physical and mental work, where individuals expect some form of compensation or reward for their efforts. - S. E. Thomas

स्वतःच्या मालकीची उत्पादन साधने नसल्यामुळे ज्यांना जगण्यासाठी आपली श्रमशक्ती विकावी लागते त्यांनी मिळून श्रामिकवर्ग होतो.

सदा कऱ्हाडे (४ थे कामगार साहित्य संमेलन, सोलापूर)

कामगाराची व्याख्या कायद्याने केली असली तरी, जो प्रस्थापित व्यवस्थेला श्रम विकतो, बुद्धी विकतो तो कामगारच असतो. असा कामगार नवनिर्मिती करीत असतो.- उत्तम कांबळे, (१३ वे कामगार साहित्य संमेलन, अमरावती)

वरील विवेचनावरून स्पष्ट होते की, उत्पादन व्यवस्थेमध्ये तुटपुंज्या आर्थिक मोबदल्यात केवळ शारीरिक कष्ट करणारी व उत्पादन साधनांवर कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क नसणारी व्यक्ती म्हणजे कामगार होय. कामगार हा नेहमी मालक वर्गाच्या अधिपत्याखाली काम करीत असतो. तसेच कामाच्या ठिकाणी त्याला कोणत्याही प्रकारचे पद नसते, त्याला केवळ कामगार म्हणूनच ओळखले जाते. उत्पादन व्यवस्थेमधील कामगाराच्या कामाचे स्वरूप व कामासंबंधीचे नियम व अटी ठरविणारा मालक वर्ग असतो. आपल्या कामासंदर्भात अटी ठरविण्याबाबत कामगाराच्या मताचा सहसा विचार केला जात नाही. थोडक्यात, जी व्यक्ती आपले श्रम किंवा कौशल्य दुसऱ्याला काही विशिष्ट आर्थिक मोबदल्यात विकत असते त्याला कामगार असे म्हणता येईल.

किंवा आपले श्रम किंवा आपले कौशल्य आपल्या उपजीविकेसाठी दुसऱ्याला विकणारा व्यक्ती म्हणजे कामगार होय.

### ४.३.२ **भारतातील कामगारांच्या समस्या** (Problems of Labours in India):

कामगारांचे उत्पादन व्यवस्थेमधील कनिष्ठ स्थान व भांडवलदार वर्गाकडून कामगार वर्गाची होणारी पिळवणूक यामुळे कामगारांचे संपूर्ण जीवन प्रभावित होत असते. भारतातील परिस्थितीचा विचार करता येथील प्रचंड लोकसंख्येत विविध क्षेत्रांमध्ये जी कामगार शक्ती विभागली गेली आहे, त्यामध्ये असंघटीत कामगारांचे प्रमाण जास्त आहे. International Monetary Fund (IMF) नुसार, भारतामध्ये केवळ १७% कामगार संघटित क्षेत्रात आहेत. तर ८३% कामगार असंघटित क्षेत्रात काम करतात, ज्यामध्ये लेखी करार, पगारी रजा आणि इतर फायदे या कामगारांना मिळत नाहीत. संघटीत क्षेत्रातील कामगारांपेक्षा असंघटीत क्षेत्रातील कामगारांना दैनंदिन जीवनामध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागत असते. या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेल्या आहेत.

**१. दारिद्र्य** (Poverty) :

भारतामध्ये गरिबी ही एक सामाजिक समस्या आहे. गरिबीची सर्वसाधारण अर्थ असा की, जे कुटुंब आपल्या उत्पन्नामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत गरजा पुर्ण करू शकत नाही. अशा कुटुंबास गरीब समजले जाते. या गरीब कुटुंबांमध्ये सर्वाधिक संख्या विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबांची आहे. मालकाचे उत्पन्न वाढले किंवा मालकाला अधिक नफा झाला तर, संबंधित कामगारांच्या मोबदल्यात किंवा पगारात वाढ होत नाही. महागाई वाढली तर महागाईच्या तुलनेत या कामगारांना महागाई भत्ता मिळत नाही. म्हणजेच देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती कशीही असली तरी या कामगारांना स्थिर आर्थिक मोबदल्यात दीर्घकाळ काम करावे लागते. यामुळे कामगारांचे आर्थिक जीवन मोठ्या प्रमाणावर प्रभावित होते व या कामगारांना दारिद्र्याच्या परिस्थितीला सामोरे जावे लागते.

**२. रोजगारामधील अनिश्चितता** (Unecertanty in employment):

भारतामधील एकूण श्रम शक्तिपैकी बहुतांश कामगारांना रोजगारामधील अनिश्चिततेच्या समस्येला सामोरे जावे लागते. या कामगारांचा रोजगार अनिश्चित स्वरूपाचा असतो. या कामगारांना मिळणाऱ्या रोजगारामध्ये नियमितता आढळून येत नाही. कारण, या कामगारांना योग्य सामाजिक सुरक्षा मिळत नाही. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी त्यांच्या कामाचे संरक्षण करण्याची व्यवस्था उपलब्ध नसते. भारतामधील एकूण श्रम शक्तिपैकी बहुतांश कामगार हंगामी व तात्पुरत्या स्वरूपाचे काम करून आपला उदरनिर्वाह चालवितात. त्याचबरोबर आर्थिक मंदी, नैसर्गिक आपत्ती, कारखाना पद्धतीमधील तोटा, मालकाची धोरणे इ. घटकांचा प्रभाव या कामगारांच्या कामाच्या नियमिततेवर होताना आढळून येतो. थोडक्यात, भारतामधील विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या रोजगार उपलब्धतेमध्ये अनिश्चितता आढळून येते. यामुळे कामगारांमध्ये आर्थिक अनिश्चितता मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

३. **स्थलांतर** (Migration):

स्थलांतर हा घटक देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकणारा महत्वाचा घटक आहे. स्थलांतर म्हणजे व्यक्तीचे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी घडून येणारे वास्तव्य होय. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये कामगार वर्गाचा सर्वात महत्वाचा वाटा असतो. असे असले तरी भारतामधील या कामगारांना स्थिर स्वरूपाचे जीवन प्राप्त होत नाही. Periodic Labour Force Survey (PLFS) नुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी स्थलांतरित कामगारांचे प्रमाण २८.९% इतके आहे. यापैकी सुमारे १०.८% लोक रोजगार मिळविण्यासाठी दररोज स्थलांतर करतात. स्थलांतरामुळे व्यक्तीचे जीवन विविधांगानी प्रभावित होत असते. नियमित स्थलांतरामुळे व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक जीवनावर नकारात्मक परिणाम होत असतो. भारतातील विविध राज्यांची भौगोलिक स्थिती, राजकीय स्थिती, असंतुलित आर्थिक विकास, रोजगाराची उपलब्धता इ. अशा कारणांमुळे भारतातील कामगारांना स्थलांतर करावे लागते.

४. **अशिक्षितपणा व निरक्षरता** (Illiteracy):

कामगार वर्गामध्ये शिक्षणाचा अभाव व निरक्षरता मोठ्या प्रमाणावर आढळून येते. कामगारांच्या रोजगाराचे अनियमित स्वरूप, स्थलांतर, आर्थिक स्थिती इ. अशा कारणांमुळे कामगारांचे शैक्षणिक जीवन प्रभावित होते. परिणामी, कुशल कामगारांच्या तुलनेत अकुशल कामगारांचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास येते. कामगारांमधील अशिक्षितपणा व निरक्षतेचा परिणाम केवळ कामगारांच्या जीवनावर होतो असे नाही. तर कामगारांचा अशिक्षितपणा व निरक्षता यामुळे या कामगारांच्या कुटुंबाचे शैक्षणिक जीवनदेखील प्रभावित होते. कामगारांचा अशिक्षितपणा व निरक्षता या कारणांमुळे कामगारांचे शोषण करण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण होते. त्याचबरोबर अशिक्षित कामगारांना चांगली कामे मिळण्याची शक्यता कमी होते, अशिक्षित कामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यास आणि त्यांच्या हक्कासाठी लढण्यास अडचणी येतात, अशिक्षित कामगार कल्याणकारी योजनांपासून अनभिज्ञ राहण्याची शक्यता वाढते, अशिक्षित कामगारांना संघटनात्मक दृष्टीने काम करण्यासाठी अडचणी येतात, अशा विविध समस्यांना अशिक्षितपणा व निरक्षर कामगारांना सामोरे जावे लागते. एकूणच कामगारांमधील अशिक्षितपणा व निरक्षरता यामुळे कामगारांच्या जीवनामध्ये विविध समस्या निर्माण होतात.

५. **संघटन** (Union) :

भारताने लोकशाही समाजव्यवस्था स्वीकारलेली आहे. लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये संघटनाला व संघटनात्मक निर्णयाला अत्यंत महत्वाचे स्थान असते. कारण, लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये संघटन एक दबाव गट म्हणून अत्यंत प्रभावीपणे कार्य करते. व्यक्तिगत व सामुहिक लाभासाठी त्याचबरोबर अन्यायकारी धोरणे यांच्याविरुद्ध लढण्यासाठी संघटनाच्या माध्यमातून प्रयत्न करणे अत्यावश्यक असते. संघटनाच्या माध्यमातून प्रयत्न केल्यामुळे संघटीत समूहाच्या मागण्या पूर्ण होण्याची शक्यता वाढते. तसेच सामाजिक सुरक्षेच्यादृष्टीने संघटीत व्यक्तीसामुहाचा प्रभाव अत्यंत परिणामकारक असतो. या दृष्टीकोनातून विचार करता, भारतातील बहुतांश कामगार संघटीत नसल्यामुळे या कामगारांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे निदर्शनास येते. यामुळे कामगारांमधील संघटन ही कामगारांची मोठी समस्या असल्याचे निदर्शनास येते.

६. **कामाच्या ठिकाणची खराब परिस्थिती** (Poor working conditions)**:**

भारतातील बहुतांश कामगार असंघटीत क्षेत्रामध्ये काम करीत असल्यामुळे कामाच्या ठिकाणची खराब परिस्थिती ही कामगारांची प्रमुख समस्या आहे. सर्वच क्षेत्रातील कामगारांना कायद्याने सुरक्षा प्रदान केली असली तरी, प्रत्यक्षात या कायद्यांची अंमलबजावणी होते का? याबाबत शासनाकडून नियमित मूल्यमापन होताना आढळून येत नाही. कामगारांना कामाच्या ठिकाणी कोणत्या मुलभूत सुविधा पुरवल्या जाव्यात? याबाबत शासकीय नियम स्पष्ट असले तरी, कामगार व मालक यांच्यामधील अनौपचारिक संबंधांमुळे कामाच्या ठिकाणी कामगारांना पुरविल्या जाणाऱ्या सुविधांबाबत मालकच निर्णय घेतात. बहुतांश कामाच्या ठिकाणी पुरेशी सामाजिक सुरक्षा, शारीरिक संरक्षणासाठी आवश्यक साधणे, आजारपण इ. यासारख्या कल्याणकारी योजनांचा व सुविधांचा अभाव असल्याचे मोठ्या प्रमाणात आढळून येते. अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी बहुतांश उद्योगांमध्ये मालक वर्गाकडून कामगारांना पुरविल्या जाणाऱ्या मुलभूत सुविधांवरील खर्च नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रामुख्याने या कारणामुळे कामगारांना कामाच्या ठिकाणच्या खराब परिस्थितीला सामोरे जावे लागते.

७. **जागरूकतेचा अभाव** (Lack of awareness)**:**

कामगारांची परिस्थिती हलाखीची असण्यामागे कामगार वर्गामधील विविध बाबींविषयी जागरूकतेचा अभाव हे एक प्रमुख कारण आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे कामगारांमध्ये अशिक्षितपणा व निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. ज्यावेळी व्यक्ती शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली असते त्यावेळी व्यक्ती आपले हक्क, अधिकार, शासकीय धोरणे इ. बाबत जागृत असण्याची शक्यता कमी होते. कामगारांमध्ये जागरूकतेचा अभाव विविध कारणांमुळे निर्माण होतो. यामध्ये प्रामुख्याने निरक्षरता, सामाजिक व आर्थिक अडचणी, कामगारांचे असंघटीत स्वरूप, शैक्षणिक उदासीनता या प्रमुख कारणांचा उल्लेख करावा लागेल. कामगार दैनंदिन जीवनातील जास्तीतजास्त वेळ आपल्या कुटुंबाच्या मुलभूत गरजा भागविण्यावर केंद्रित करतो, त्यामुळे इतर बाबींकडे कामगाराला लक्ष देता येत नाही. थोडक्यात, मुलभूत गरजा पूर्ण करणे कामगारांची प्राथमिकता असल्यामुळे कामगारांमध्ये विविध गोष्टींविषयी जागरुकता आढळून येत नाही.

८. **असुरक्षितता** (Insecurity)**:**

विकसित राष्ट्रांच्या तुलनेत विकसनशील व अविकसित राष्ट्रांमध्ये कामगार वर्गाची दयनीय परिस्थिती पहावयास मिळते. कारण, विकसनशील व अविकसित राष्ट्रांमध्ये कामगारांपेक्षा विकासाला अधिक प्राधान्य दिले जाते. भारत एक विकसनशील राष्ट्र असल्यामुळे भारतामध्ये औद्योगिक विकासातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे प्रमाण अधिक आहे. कामगार वर्गाच्या बहुतांश समस्या औद्योगिक क्षेत्र व शेती क्षेत्राशी निगडीत आहेत. भारतामध्ये अशी परिस्थती पहावयास मिळते की, कामगारांच्या हक्क व सुरक्षेसाठी विविध कायद्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतु यापैकी बरेच कायदे कामगारांना माहिती नाहीत. त्याचबरोबर भारतामध्ये असंघटीत कामगारांचे प्रमाण लक्षणीय असल्यामुळे हे कायदे कागदावरच राहण्यास पोषक वातावरण तयार झालेले निदर्शनास येते. या प्रमुख करणामुळे संघटीत कामगारांच्या तुलनेत असंघटीत कामगार कायद्याच्या दृष्टीने अधिक असुरक्षित दिसून येतात. भारतामध्ये अशी परिस्थिती निदर्शनास येते की, असंघटित कामगारांना

निवृत्तीवेतन, ग्रॅच्युइटी, कर्मचारी विमा, कामगारांना मिळणारी विविध प्रकारची भरपाई इ. सामाजिक सुरक्षा लाभांपासूनही दूर ठेवले जाते. या वास्तविकतेमुळे भारतातील कामगार सामाजिकदृष्ट्या असुरक्षित असल्याचे दिसून येतात व कामगारांच्या समस्यांमध्ये अधिक भर पडते.

**९. राजकीय जाणीव व दृष्टिकोनाचा अभाव** (Lack of political awareness and vision):

लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये राजकीय शक्तीला अनन्य साधारण असे महत्व असते. कारण, राजकीय शक्ती हे लोकशाही मार्गाने समाजामध्ये परिवर्तन व विकास घडवून आणण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. म्हणून एखाद्या समाज घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी त्या समाज घटकाप्रती राजकीय जाणीव व विकासात्मक दृष्टीकोन असणे अत्यंत अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने भारतातील कामगारांच्या स्थितीचा विचार करता असे म्हणावे लागेल की, भारतीय राजकारणामध्ये कामगार वर्गाच्या समस्या, प्रश्न व विकासवादी दृष्टिकोनाचा अभाव आहे. कारण, भारतामध्ये कामगार कल्याणासाठी अनेक कायदे, विविध योजना असल्या तरी हे कायदे प्रत्यक्षात काटेकोरपणे अमलात आणले जातात का? तसेच कामगारांना विविध सुविधा पुरविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने विविध कल्याणकारी योजना आखलेल्या आहेत, या योजनांची अंमलबजावणी पारदर्शकपणे होते का? या प्रश्नांची राजकीयदृष्ट्या गंभीरपणे दखल घेतली जात नाही. तसेच वर्षानुवर्षे कामगार वर्गाच्या ठराविक समस्या गृहीत धरल्या जातात. या दृष्टीकोनातून विचार करता, कामगार वर्गाच्या समकालीन समस्या जाणून घेवून कामगारांचा विकास साधण्याच्या दृष्टिकोनाचा अभाव भारतीय राजकारणामध्ये दिसून येतो.

**१०. कामगारांबाबत विश्वसनीय व संपूर्ण सांख्यिकीय माहितीचा अभाव** (Lack of reliable and complete statistical information about labours):

एखाद्या समाज घटकाला परिवर्तनाच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी, त्या समाज घटकाबाबत विविध प्रकारची अचूक व वर्गीकृत सांख्यिकीय माहिती शासकीय यंत्रणेजवळ उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे असते. या माहितीशिवाय संबंधित समाज घटकाच्या कल्याणासाठी विविध विकासात्मक तरतुदी आखणे शक्य होत नाही. अपुऱ्या माहितीवर आधारित विकास प्रक्रिया राबविल्यास अपेक्षित उद्दिष्टांची पूर्तता होत नाही. कामगार वर्गाच्या बाबतीत या अनुषंगाने विचार करता भारतातील कामगारांची निश्चित संख्या, कामगारांच्या कामाचे वर्गीकरण, कामगारांच्या समस्या इ. बाबत अचूक व विश्वसनीय माहिती शासनाकडे उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. या प्रकारची सर्व माहिती उपलब्ध असेल तरच विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी सर्वसमावेशक योजनांची निर्मिती करणे सहज शक्य होते. भारतातील कामगारांच्या सांख्यिकीय माहितीबाबत असे निर्दर्शनास येते की, भारतातील शासकीय यंत्रणेकडे कामगारांबाबत अचूक सांख्यिकीय माहिती ठराविक स्वरूपातच उपलब्ध आहे. या माहितीमध्ये वर्गीकरणाचा अभाव असल्याचे निर्दर्शनास दिसून येते. याचे प्रमुख कारण असे की, भारतातील कामगारांचे प्रामुख्याने असंघटीत कामगारांचे कामाचे स्वरूप अनिश्चित व हंगामी स्वरूपाचे आहे. यामुळे शासकीय यंत्रणा या कामगारांपर्यंत पोहचू शकत नाहीत. परिणामी, कामगारांबाबत अचूक, वर्गीकृत व व्यापक सांख्यिकीय माहिती शासनास उपलब्ध होत नाही.

**११. कनिष्ठ प्रतीचे राहणीमान** (Low standard of living)**:**

व्यक्ती व तिच्या कुटुंबाच्या राहणीमानाच्या दर्जावर विविध गोष्टींचा प्रभाव पडत असतो किंवा व्यक्ती व तिच्या कुटुंबाचा राहणीमानाचा दर्जा विविध घटकांवर अवलंबून असतो. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक उत्पन्न, शैक्षणिक स्थिती, उदरनिर्वाहासाठी निवडलेल्या कामाचे स्वरूप, स्थलांतर, सामाजिक सुरक्षा, संरक्षण कायदे व नियम इ. घटकांचा उल्लेख करावा लागेल. या अनुषंगाने भारतातील कामगार वर्गाचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, भारतातील कामगारांचे आर्थिक उत्पन्न त्यांच्या कुटुंबाच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी अपुरे आहे, कामगारांमध्ये अशिक्षितपणा व निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे, कामगारांच्या कामाचे स्वरूप अनिश्चित व हंगामी असल्यामुळे कामगारांमध्ये कामासाठी स्थलांतर करण्याचे प्रमाण जास्त आहे, त्याचबरोबर विविध कारणांमुळे सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने कामगारांना संरक्षण प्राप्त होत नाही. या परिस्थितीचा एकत्रित परिणाम कामगार वर्गाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीवर होतो. परिणामी, भारतातील बहुतांश कामगारांना कनिष्ठ प्रतीचे राहणीमान स्विकारून जीवन जगावे लागते. थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की, भारतातील बहुतांशी कामगार सामाजिकदृष्ट्या मागासलेले जीवन जगत आहेत.

**स्वयंअध्ययन प्रश्न– १**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कार्ल मार्क्सच्या मते, मानवी इतिहासामध्ये कोणकोणते दोन वर्ग आहेत?

२. प्रस्थापित व्यवस्थेला श्रम विकतो, बुद्धी विकतो तो कामगार असतो, अशी कामगाराची व्याख्या कोणी केली आहे?

३. International Monetary Fund (IMF) नुसार, भारतामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण किती आहे?

४. Periodic Labour Force Survey (PLFS) नुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी स्थलांतरित कामगारांचे प्रमाण किती आहे?

**४.३.३ महाराष्ट्रातील कामगार चळवळी** (Labour movement in Maharashtra)**:**

विविध घटकांमुळे सामाजिक चळवळ प्रभावित होत असते. भौगोलिक संसाधने, सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा परिणाम विविध प्रकारच्या चळवळींवर होत असतो. महाराष्ट्रातील किंवा कोणत्याही भौगोलिक क्षेत्रामधील कामगार चळवळी समजून घेताना कामगार चळवळींची पार्श्वभूमी जाणून घेणे अत्यावश्यक आहे. याशिवाय विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामधील कामगार चळवळींचे समाधानकारक आकलन होणे शक्य नाही. या अनुषंगाने कामगार चळवळींची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेली आहे.

**४.३.३.१ कामगार चळवळींची पार्श्वभूमी** (Background of labour movement)**:**

औद्योगिकीकरणाकडे एक परिवर्तनवादी प्रक्रिया म्हणून पहिले जाते. औद्योगिकीकरण म्हणजे शेती आणि हस्तकलांवर आधारित अर्थव्यवस्थेचे रूपांतर उद्योग, यांत्रिक उत्पादन आणि कारखाना प्रणालीवर आधारित अर्थव्यवस्थेत होणे होय. औद्योगिक क्रांती औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला चालना देणारी एक महत्त्वपूर्ण

प्रक्रिया आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटनमध्ये सुरु झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे कृषिप्रधान समाजाचे औद्योगिक समाजात रूपांतर होण्यात मदत झाली. औद्योगिक क्रांतीमुळे नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात मशीनरीचा वापर वाढला. ज्यामुळे उत्पादन प्रक्रियेत मोठा बदल घडून आला. औद्योगिकीकरण व औद्योगिक क्रांतीच्या प्रक्रियेचा परिणाम भारतावरसुद्धा झाला. १९ व्या शतकाच्या सुवातीला भारतामध्ये मोठमोठ्या कापड गिरण्या, लोखंड आणि पोलाद उद्योग, रासायनिक उद्योग, सिमेंट उद्योग, खाण उद्योग इ. असे अनेक नवीन उद्योग सुरू झाले. परिणामी, ग्रामीण भागातील शेतीमध्ये गुंतलेला मोठा श्रमिकांचा वर्ग नवीन रोजगार संधीच्या शोधात शहराकडे वळला. यातूनच देशात भांडवलदार व कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला. पुढे भांडवलदार वर्गाकडून कामगारांची पिळवणूक होवू लागल्याने कामगारांच्या समस्या वाढल्या. या प्रमुख कारणामुळे कामगार संघटीत झाला व भारतामध्ये ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात कामगार चळवळी घडून येवू लागल्या. त्याचबरोबर कामगारांच्या कल्याणासाठी विविध संघटना निर्माण झाल्या. वर्तमान काळात भारतामध्ये कामगारांसाठी राष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) १९२०, इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC) १९४७, हिंद मजदूर सभा (HMS) १९४८, भारतीय मजदूर संघ (BMS) १९५५, ऑल इंडिया युनायटेड ट्रेड युनियन सेंटर (AIUTUC) १९५८, सेंटर ऑफ इंडिया ट्रेड युनियन्स (CITU) १९७०, सेंट्रल ट्रेड युनियन ऑफ इंडिया (CTUI) १९७०, भारतीय किसान यूनियन (BKS) १९७९, ऑल इंडिया ट्रेड युनियन फेडरेशन (AITUF) १९९२ इ. प्रमुख कामगार संघटना कार्यरत आहेत.

**४.३.३.२ औद्योगिक विकास आणि कामगार संघटनांचा उदय** (Industrial development and the rise of trade unions):

१८५० नंतर मुंबईत अनेक उद्योग सुरू झाले. ज्यामध्ये कापूस गिरण्या, कोळसा आणि रेल्वे जंक्शन हे प्रमुख उद्योग होते. या क्षेत्रांमध्ये काम करू लागलेल्या कामगारांना चौदा ते पंधरा तास काम, कामाच्या ठिकाणची अस्वच्छ परिस्थिती, मुलभूत सोई-सुविधांचा अभाव, राहणीमानाची अत्यंत निकृष्ट परिस्थिती, अपघाताच्या परिस्थितीमध्ये  कोणत्याही प्रकारचा विमा किंवा मोबदला नसणे, पेन्शन नसणे, कामगारांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी कोणतीही कल्याणाची तरतूद नसणे इ. अशा विविध समस्यांना समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्याचबरोबर ब्रिटीशांच्या कापडाच्या तुलनेत भारतीय कापड चांगल्या प्रतीचे व कमी किमतीमध्ये उपलब्ध असल्याने व भारतामध्ये मुबलक प्रमाणत कामगारांची उपलब्धता असल्यामुळे ब्रिटीश शासनाचे लक्ष भारतातील कापड उद्योगाकडे वेधले गेले. कामगारांची निकृष्ठ परिस्थिती व कामगारांमध्ये वाढणारा असंतोष यावरही ब्रिटीश शासनाचे लक्ष होते. अशा परिस्थितीमध्ये मुंबईत ब्रिटिश सरकारने सुरुवातीला कामगार आणि कामगारांच्या समस्या कमी करण्यासाठी काही कायदे केले. यापैकी १८८१ चा कारखाना कायदा (The Indian Factories Act) सर्वात महत्त्वाचा होता, ज्याने बालकामगारांना सात तास आणि महिलांना अकरा तासांपर्यंत कामाचे तास मर्यादित केले. परंतु हा कायदा कामगारांचे प्रामुख्याने बालकामगारांचे शोषण रोखण्यात अपयशी ठरला. या कायद्याचा कामगारांच्या जीवनावर फारसा परिणाम झाला नाही. एकूणच भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक, शासनाची कामगारांप्रती अनास्था या प्रमुख कारणांमुळे तत्कालीन काळामध्ये मुंबईतील कामगारांनी विविध संघटना स्थापन केल्या आणि कामगारांच्या कल्याणासाठी लढण्यास सुरवात झाली.

**४.३.३.३ महाराष्ट्रात कामगार चळवळीचा उदय** (The emergence of the labor movement in Maharashtra):

स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याच्या आधीपासून ङ्गबॉम्बेफप्रांत हा औद्योगिकदृष्ट्या महत्वाचा भाग असलेला दिसून येतो. याच बॉम्बे (मुंबई) शहरामध्ये 'ताडदेव' या ठिकाणी ७ जुलै, १८५४ रोजी भारतातील पहिली वाफेवर चालणारी कापड गिरणी 'बॉम्बे स्पिनिंग अँड विव्हिंग मिल' (Bombay Spinning and Weaving Mill) या नावाने कावसजी नानाभाई दावर (Kavasji Nanabhai Davor) यांनी स्थापन केली. ज्यामुळे भारतातील कापड उद्योगात मोठे परिवर्तन व वाढ झाली. कापड उद्योगाबरोबर पोलाद, सिमेंट, रासायनिक उद्योगही मोठ्या प्रमाणात बॉम्बेमध्ये एकवटले. या विविध उद्योगांच्या माध्यमातून बॉम्बे शहरामध्ये रोजगाराच्या नवीन संधी मोठ्या प्रमाणत निर्माण झाल्या. रोजगाराच्या शोधात संपूर्ण भारतामधून कामगार किंवा श्रमिकवर्ग तत्कालीन बॉम्बेकडे आकर्षित होवू लागला. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता बॉम्बेमध्ये उद्योगधंद्यांच्या तुलनेत आवश्यक कामगार संख्येपेक्षा उपलब्ध कामगारांची संख्या वाढू लागली. यामुळे भांडवलदारांनी कमी आर्थिक मोबदल्यात कामगारांकडून काम करून घेण्यास सुरवात केली व मोठ्या प्रमाणावर कामगारांची आर्थिक पिळवणूक सुरु झाली. यातूनच कामगार संघटन व कामगार चळवळीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले. परिणामी, भारतातील पहिली कामगार चळवळ गिरणी कामगारांच्या माध्यमातून तत्कालीन बॉम्बे शहरात घडून आली. यातूनच पुढे भारतामध्ये विविध कामगार नेते व कामगार संघटना उदयास आल्या. कालांतराने १ मे, १९६० रोजी मराठी भाषेच्या आधारावर महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व आजही महाराष्ट्र राज्य भारतातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत व आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील कामगार चळवळींमध्ये नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नारायण मल्हार जोशी, बाळशास्त्री जांभेकर, श्रीपाद अमृत डांगे, शांताराम सावलाराम मिरजकर, शामराव परुळेकर, भालचंद्र त्र्यंबक रणदिवे, एन. डी. पाटील, दत्ता सामंत इ. प्रमुख कामगार नेत्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. कारण, या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार संघटीत झाला व कामगार चळवळींच्या माध्यमातून कामगारांना विविध प्रकारची सुरक्षितता प्राप्त होवू लागली. या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये घडून आलेल्या काही प्रमुख कामगार चळवळी व संघटनांची माहिती पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेली आहे.

१. **बॉम्बे मिल हॅण्ड्स असोसिएशन** (Bombay Mill Hands Association)

बॉम्बेमध्ये १८५४ साली पहिली कापड गिरणी स्थापन झाल्यापासून जवळपास ३६ वर्षांनी १८९० साली 'नारायण मेघाजी लोखंडे' यांनी 'बॉम्बे मिल हॅण्ड्स असोसिएशन' (Bombay Mill Hands Association) ची स्थापना केली. ही भारतातील पहिली कामगार संघटना होती आणि तिने कामगारांच्या हक्कांसाठी लढायला सुरुवात केली. पुरुष, महिला आणि बाल कामगारांसाठी कामाचे तास कमी करण्याची पहिली व प्रमुख मागणी केली या असोसिएशनने केली. नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतीबा फुले यांचे सहकारी होते. त्यांनी कामगारांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी महात्मा जोतीबा फुले यांच्यासोबत 'दीनबंधू' या साप्ताहिकामध्ये कामगारांची परिस्थिती व शोषणाविरुद्ध लिखाणास सुरवात केली. यामुळे नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कापड गिरणीमध्ये

भांडारपाल म्हणून केले असल्यामुळे त्यांनी कामगारांच्या समस्या जवळून पाहिल्या व अनुभवल्या होत्या. त्यामुळे गिरणी कामगारांच्या समस्या आणि हक्कांबद्दल आवाज उठवणे व कामगारांना संघटीत करणे हे त्यांच्या असोसिएशनचे मुख्य उदिष्ट होते. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नांमुळे मुंबईतील कामगारांमध्ये स्वहीताबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. या संघटनेच्या माध्यमातून कामगार गिरणी मालकांबरोबर आपल्या हितासाठी भांडू लागले. यामध्ये पर्यवेक्षकांवर हल्ले करणे, तुरळक दंगली आणि उत्स्फूर्त अल्पकालीन संप पुकारणे यांचा समावेश होता. याच काळात लोखंडे यांनी तात्काळ सरकारवर दबाव आणण्यासाठी ५,५०० कामगारांच्या मदतीने कारखाना आयोगाला एक पत्र सादर केले. या पत्रामध्ये मुंबईतील गिरणी मालकांच्या शोषणाविरुद्ध कामगारांनी संपाची घोषणा केली. नारायण लोखंडे यांनी २४ एप्रिल, १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्सवर जवळपास १०,००० कामगारांची बैठक बोलावली. या कामगार सभेने एकमताने एका ठरावाला मान्यता दिली. ज्यामध्ये कामगारांसाठी आठवड्यात सुट्टी, कामाचे मर्यादित तास, मध्यान्हाची विश्रांती व काम करताना झालेल्या दुखापतीसाठी किंवा अपघातासाठी भरपाई असे प्रमुख मुद्दे होते. या बैठकीत महिलांचीही संख्या लक्षणीय होती. १८९० दरम्यान मुंबईतील कामगार संघटनांचे सुमारे सव्वीस महत्त्वाचे संप झाले. यामध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांची भूमिका अत्यंत महत्वाची होती. वरील माहितीच्या आधारे आपणास असे म्हणता येईल की, भारतातील कामगार संघटना आणि कामगार चळवळीचा जन्म महाराष्ट्रात झाला आहे.

२. **बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियन** (Bombay Textile Labour Union)**:**

तत्कालीन कामगार चळवळींच्या माध्यमातून विविध कामगार नेते उदयास आले. यापैकी एक महत्वाचे नाव म्हणून उदारमतवादी 'नारायण मल्हार जोशी' यांचा उल्लेख करावा लागेल. एन. एम. जोशी यांनी बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियनची (The Bombay Textile Labour Union) स्थापना १९२६ साली केली. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियनचा विकास झाला. ही संघटना १९२३ मध्ये एक स्वायत्त संघटना बनली आणि नंतर १९२६ मध्ये नवीन ट्रेड युनियन कायद्यांतर्गत नोंदणीकृत झाली. पुढे चालून १९२८ मध्ये, बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियनवर कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव पडला व याचे रुपांतरण लाल बावटा या युनियनमध्ये झाले.

एन. एम. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली, त्याच बॉम्बे टेक्सटाइल लेबर युनियनने अनुक्रमे १९२४, १९२५ आणि १९२८ मध्ये तीन सर्वात मोठे संप केले. 'द बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' ने विविध कंपनीच्या १,५०,००० कर्मचाऱ्यांना मागील चार वर्षांचा बोनस देण्यास नकार दिल्याच्या निषेधार्थ जानेवारी ते मार्च १९२४ दरम्यान पहिला संप पुकारण्यात आला. त्यानंतर सप्टेंबर ते डिसेंबर १९२५ मध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा संप झाला. विविध कापड गिरणी मालकांकडून कापड उद्योगातील खोट्या संकटांची कारणे पुढे करून कामगारांच्या वेतनात तब्बल ११.५% कपात करण्यात आली. या वेतनकपातीच्या विरोधात हा संप पुकारण्यात आला होता. या संपामध्ये कामगारांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. तसेच संपाचे स्वरूप अत्यंत तीव्र होते. परिमाणी, गिरणी मालकांनी मुंबईतील ब्रिटिश अधिकाऱ्यांना ३.५% उत्पादन शुल्क रद्द करण्यास सांगितले व कामगारांचे पगार भागविल्यानंतर संप मागे घेण्यात आला. त्यानंतर कामगारांच्या वेतनात लक्षणीय वाढ करण्यासाठी तिसरा मोठा संप १९२८ मध्ये जाहीर करण्यात आला. १९३४ पासून, डाव्या-राष्ट्रवादी, समाजवादी आणि कम्युनिस्ट विचारसरणींनी कामगार दलावर नियंत्रण मिळवले.

## ३. अण्णा भाऊ साठे व कामगार चळवळ (Anna Bhau Sathe labour movment):

महाराष्ट्रातील कामगार चळवळीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यामध्ये अनेक समाजसुधारक, साहित्यिक, विचारवंत यांचे महत्वपूर्ण योगादन आहे. यापैकी एक महत्वाचे नाव म्हणून अण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख करावा लागेल. याचे कारण म्हणजे अण्णा भाऊ साठे यांनी मुंबईतील गिरणी कामगाराचे जीवन प्रत्यक्षात जगले होते. त्याचबरोबर १९३४ मध्ये मुंबईत लाल बावटा गिरणी कामगार युनियनच्या नेतृत्त्वाखाली जो ऐतिहासिक संप झाला, त्या संपात अण्णा भाऊ साठे कामगार म्हणून प्रत्यक्ष सहभागी होते. अण्णा भाऊ साठे यांनी आपली लेखणी, गाणी व पोवाड्यांच्या माध्यमातून कामगारांच्या अन्यायाला समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर विविध चळवळींमध्ये कामगारांना सहभागी होण्यास प्रवृत्त करण्याचे काम लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहिर कॉ. अमर शेख, कॉ. दत्तात्रय गव्हाणकर यांनी पोवाड्यांच्या माध्यमातून केले. १९३८ ते १९४३-४४ पर्यंत लोकशाहीर अण्णा भाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबईच्या गिरणगावात जे संप, लढे, संघर्ष सुरू होते या सर्वांना कामगारांचा पाठींबा मिळवा यासाठी कला पथकाचे अनेक कार्यक्रम करुन कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम केले. म्हणूनच अण्णा भाऊ साठे यांना कष्टकऱ्यांच्या चळवळीचा पाठीराखा म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे यासाठी अण्णा भाऊ साठे यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

## ४. रेल्वे कामगारांचा संप, १९७४ (Railway workers' strike) :

शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतर मुंबई बंद पडण्याची क्षमता जॉर्ज फर्नांडिस या कामगार नेत्यामध्ये होती. म्हणून जॉर्ज फर्नांडिस यांना ङ्गबंद सम्राटफ या नावानेसुद्धा ओळखले जाते. जॉर्ज फर्नांडीस हे भारतीय कामगार चळवळीतील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्व होते. त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी आणि न्यायसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. जॉर्ज फर्नांडिस रेल्वे कामगारांच्या हक्कांसाठी विविध आंदोलने आणि संप पुकारले. तसेच त्यांनी लहान सेवा उद्योगातील कामगारांच्या हक्कांसाठीही आवाज उठवला. त्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतात काम करण्याचा परवाना रद्द केला. जेणेकरून भारतीय कामगारांना न्याय मिळू शकेल. १९७४ साली जॉर्ज फर्नांडिस आणि तत्कालीन कामगार नेत्यांनी रेल्वे कामगारांचा मोठा संप घडवून आणला. लोकोमोटिव्ह कर्मचाऱ्यांसाठी आठ तास कामाचा दिवस, तिसऱ्या वेतन आयोगानुसार वेतनवाढ व बोनस या प्रमुख मागण्या या संपाच्या माध्यमातून करण्यात आल्या. ३ मे, १९७४ रोजी कामगारानी मुंबई बंदची घोषणा केली. दोन दिवस मुंबई बंद पडली. ५ मे पासून देशातील रेल्वे कामगार संपावर गेले. देशातील २० लाख कामगार एकाच दिवशी संपावर गेले. सरकारने १३ लाख कामगारांच्या सेवा खंडित केल्या. ५० हजारहून जास्त कामगार पकडले गेले. वीस दिवसानंतर काही प्रमुख मागण्या मान्य केल्यानंतर २६ मे रोजी जॉर्ज फर्नांडिस यांनी तिहार जेलमधून संप मागे घेतला आणि २९ मे रोजी कामगार कामावर गेले.

## ५. सोलापूर गिरणी कामगारांचा संप, १९३० (Solapur mill workers' strike):

उद्योगासाठी आवश्यक कच्चा माल उद्योगाजवळ उपलब्ध असणे कोणत्याही उद्योगासाठी अनुकूल असते. सोलापूर, विजापूर, उस्मानाबाद, लातूर, बीड आदी भागात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. स्थानिक कच्चा माल, स्वस्त मजूर त्याचबरोबर दळणवळणाची सोय या कारणांमुळे सोलापुरात कापड गिरण्या

भरभराटीला आल्या. त्या काळामध्ये मुंबईतील गिरणी कामगारांचा पगार व सोलापूर गिरणी कामगारांच्या पगारामध्ये मोठी तफावत होती. या प्रमुख कारणामुळे सोलापूर व परिसरातील गिरणी कामगारांनी १२ जानेवारी, १९३० रोजी संप पुकारला. सोलापूरच्या गिरणी कामगार चळवळीचे नेतृत्व विविध व्यक्ती आणि पक्षांनी केलेले निदर्शनास येते. ज्यामध्ये कम्युनिस्ट पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष यांचा प्रामुख्याने समावेश होता. या चळवळीत कामगारांच्या हक्कासाठी आणि न्यायसाठी अनेक संघर्ष झाले, ज्यात कुर्बान हुसेन (सोलापूर हुतात्मा) आणि इतर कामगारांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सोलापूरमध्ये 'मार्शल लॉ' ची अंमलबजावणी करण्यात आली आणि या काळात अनेक कामगारांना अटक करण्यात आली. या चळवळीमध्ये अटक करण्यात आलेल्या सोलापूरच्या चार हुतात्म्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली.

६. **मुंबई गिरणी कामगारांचा संप, १९८२** (Mumbai mill workers' strike)**:**

मुंबईतील गिरणी कामगारांचा सर्वात मोठा संप 'द ग्रेट बॉम्बे टेक्सटाईल स्ट्राइक' या नावाने ओळखला जातो. हा संप १८ जानेवारी, १९८२ रोजी मुंबईतील गिरणी कामगारांनी तत्कालीन कामगार संघटना नेते स्वर्गीय दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली पुकारलेला भारतातील सर्वात मोठा गिरणी कामगारांचा संप होता. मुंबईतील ६५ कापड गिरण्यांमध्ये काम करणारे सुमारे अडीच लाखापेक्षा जास्त कामगार या संपामध्ये सहभागी झाले होते. १९८२ च्या काळात मुंबईत औद्योगिकीकरणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत होतं होती. या करणामुळे कामगारांच्या विविध चाळी मुंबईमध्ये निर्माण झाल्या होत्या. या काळात कामगारांना गिरण्यांमध्ये मिळणारा पगार अत्यंत तुटपुंज्या स्वरूपाचा होता. कमावणारा एक आणि खाणारी तोंडं अनेक अशी कामगारांच्या कुटुंबाची परिस्थिती होती. त्यामुळे पगारवाढ हा या संपाचा पाया होता. त्याचबरोबर बदली कामगार व त्यांच्या समस्या तसेच कामाच्या अनुभवानुसार पगारवाढ अशा विविध मागण्या या संपाच्या माध्यमातून करण्यात आल्या होत्या. संप मिटविण्यासाठी दोन्ही बाजूंनी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. परंतु या संपाचा काहीही तोडगा निघाला नाही. अठरा महिन्यानंतर संप विखुरला गेला आणि लाखो कामगारांच्या नोकऱ्या गेल्या.

**४.३.३.४ महाराष्ट्रातील कामगार संघटना** (Labour Unions in Maharashtra)**:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रामध्ये विविध उद्योग मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. यातूनच कामगारांचा मोठा वर्ग महाराष्ट्रामध्ये निर्माण झाला. प्रत्येक उद्योगाचे स्वरूप व कामगारांच्या कामाचे स्वरूप वेगवेगळे असल्यामुळे कामगार वर्गामध्ये विविध समस्या निर्माण होऊ लागल्या. उद्योगधंद्यांच्या वैविध्यकरणा मुळे निर्माण झालेल्या कामगार समस्यांचे स्वरूप भिन्न असल्यामुळे कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध संघटना भारत व महाराष्ट्रामध्ये निर्माण झाल्या. महाराष्ट्रातील काही प्रमुख कामगार संघटनांची पुढील प्रमाणे मांडण्यात आलेली आहे.

१. **महाराष्ट्र जनरल कामगार संघ** (MGKU) **१९३४** (Maharashtra General Workers Union) **:**

महाराष्ट्र जनरल कामगार संघ (MGKU) ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची कामगार संघटना आहे. ही संघटना कामगारांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी काम करते. महाराष्ट्र जनरल कामगार संघ ही महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि सर्वात मोठी कामगार संघटना आहे. ही संघटना प्रामुख्याने कापड, वाहतूक आणि हॉटेलिंग इ. सारख्या विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रतिनिधित्व करते. या संघटनेचे मुख्य ध्येय कामगारांचे

जीवनमान सुधारणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे आहे. MGKU कामगारांच्या विविध हक्कांसाठी लढते. ज्यामध्ये वेतन, कामाचे तास, कामाची सुरक्षितता आणि इतर सुविधांचा समावेश आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न चत्र्ह्यण करते. यामुळे महाराष्ट्रातील कामगार चळवळीत महाराष्ट्र जनरल कामगार संघाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

२. **महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ (१९५३)** (Maharashtra General Welfare Board) **:**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिपत्याखाली असणारे व शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम करणारे शासकीय कामगार कल्याण मंडळ आहे. या मंडळाची स्थापना १ जुलै, १९५३ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ केवळ महाराष्ट्रातील कामगारांच्या कल्याणावर लक्ष केंद्रित करणारी संस्था आहे. या मंडळाला प्रत्येक सहा महिन्यात शासनामार्फत 'महाराष्ट्र लेबर वेल्फेअर फंड (MLWF)' मिळतो. याच निधीच्या माध्यमातून राज्यातील कामगारांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध कल्याणकारी योजना राज्य शासनामार्फत राबविल्या जातात. यामध्ये द फॅक्टरी क्ट १९४८ अंतर्गत येणारे सर्व कारखाने, महाराष्ट्र शॉप्स अँड इस्टॅब्लिशमेंट क्ट १९४८ अंतर्गत येणारी अशी दुकाने व आस्थापना ज्यामध्ये किमान ५ कामगार आहेत आणि द मोटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स ॲक्ट १९६१ अंतर्गत नोंद असलेल्या सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आलेला आहे. या मंडळामार्फत कामगारांना पुरविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये शैक्षणिक अर्थसहाय्य योजना, वैद्यकीय अर्थसहाय्य योजना व विविध कामगार पुरस्कार योजना प्रमुख आहेत.

३. **अखिल भारतीय कामगार एकता संघ १९९४** (All India Workers Ekata Sangh) **:**

अखिल भारतीय कामगार एकता संघ (AIKES) ही भारतातील एक मोठी आणि प्रभावशाली कामगार संघटनांपैकी एक आहे, जी विविध क्षेत्रातील कामगारांच्या हक्कांसाठी लढते. ही संघटना कामगारांना त्यांच्या हक्कांसाठी एकत्र आणून त्यांच्या समस्यांवर आवाज उठवण्यास मदत करते. सरकार आणि व्यवस्थापनासोबत कामगारांच्या समस्यांवर चर्चा करणे, कामगारांच्या हक्कांसाठी न्यायालयात लढणे आणि कामगारांना योग्य वेतन आणि कामाची सुरक्षित परिस्थिती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करते. अखिल भारतीय कामगार एकता संघ कापड, अभियांत्रिकी आणि रसायनांसह विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रतिनिधित्व करते. महाराष्ट्रामध्ये या संघटनेची मजबूत स्थिती आणि प्रभाव आहे. हा संघ प्रामुख्याने भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) शी संलग्न आहे. त्याचबरोबर या संघाला माकप (एम) ची शाखा देखील मानली जाते. महाराष्ट्राच्या कामगार चळवळीच्या इतिहासामध्ये या संघटनेने कामगार चळवळीचा प्रमुख स्त्रोत म्हणून काम केले आहे.

४. **भारतीय कामगार सेना** (BKS) **१९६८** (Bhartiya Kamgar Sena) **:**

भारतीय कामगार सेना ही स्वर्गीय बाळासाहेबजी ठाकरे यांनी स्थापन केलेल्या 'शिवसेना' या राजकीय पक्षाशी संलग्न आहे. ९ ऑगस्ट, १९६८ रोजी नरेपार्क गार्डनवर शिवसेनाप्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुढाकारातून व मार्गदर्शनाखाली कामगारांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रमुख उद्देशाने स्वतंत्र भारतातील पहिली मराठी कामगार संघटना 'भारतीय कामगार संघटना' या नावाने स्थापन करण्यात आली. शिवसेना या पक्षाची कामगार धोरणे प्रामुख्याने मराठी कामगार व देशभक्ती या तात्त्विक विचारसरणीवर आधारित

आहेत. भारतीय कामगार सेनेचे पहिले अध्यक्ष म्हणून स्वर्गीय श्री. दत्ताजी साळवी यांची निवड करण्यात आली होती. भारतीय कामगार सेना कापड, वाहतूक आणि बांधकाम यासह विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रतिनिधित्व करते. या संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कामगारांच्या विविध समस्यांवर मात करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

५. **महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना** (MNKS) २००६ (Maharashtra Navnirman Kamgar Sena) **:**

महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना ही संघटना मा. श्री. राजसाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' या राजकीय पक्षाची एक उपसंघटना आहे. या संघटनेची स्थापना २००६ मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये उदयास आलेल्या कामगार संघटनांपैकी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना ही एक समकालीन कामगार संघटना म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना ही मुंबई येथे स्थित एक संघटना आहे. कामगारांच्या समस्यांवर आवाज उठवणे आणि सरकारला योग्य कार्यवाही करण्यास भाग पाडणे, कामगारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कायदे आणि नियम बनवण्यास मदत करणे, त्याचबरोबर कामगारांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करणे या प्रमुख उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी ही संघटना कार्य करते. थोडक्यात, महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेना ही संघटना महाराष्ट्रातील कामगार आणि मजुरांच्या कल्याणासाठी काम करते.

**स्वयंअध्ययन प्रश्न– २**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतातील पहिली कापड गिरणी कोणी स्थापन केली?

२. भारतातील पहिली कापड गिरणी कोठे स्थापन करण्यात आली?

३. भारतातील कामगार चळवळीचे जनक कोण आहेत?

४. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कोणती संघटना स्थापन केली?

५. 'द ग्रेट बॉम्बे टेक्सटाईल स्ट्राइक' हा संप कधी घडून आला?

### ४.३.४ **कामगार चळवळींचा परिणाम** (Impact of labour movements) **:**

जगभरामध्ये व भारतामध्ये घडून आलेल्या कामगार चळवळींचा एक व्यापक सामाजिक घटना या दृष्टीकोनातून अध्ययन करणे गरजेचे आहे. कारण, कोणतीही सामाजिक घटना घडून येण्यासाठी विशिष्ट कारणे किंवा विशिष्ट सामाजिक परिस्थिती अस्तित्वात येणे गरजेचे असते. त्याचबरोबर एखादी सामाजिक घटना घडल्यानंतर त्या घटनेचा समाजावर काहीतरी परिणाम होत असतो व समाजजीवनामध्ये परिवर्तन घडून येत असते. या दृष्टीकोनातून भारतातील कामगार चळवळींचा विचार करता, भारतामध्ये कामगार चळवळी घडून येण्यासाठी औद्योगिकीकरणानंतर कामगारांचे विविध प्रकारे शोषण करण्याची यंत्रणा भांडवलशाही व्यवस्थेमध्ये निर्माण झाली. भांडवलशाही व्यवस्थेमधील कामगारांवरील अन्याय, कामगारांचे शोषण रोखण्यासाठी व कामगारांना हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी बहुतांश कामगार चळवळी उदयास आल्या. कामगारांवरील अन्यास, शोषण व कामगारांमधील वर्ग जाणीवेतून उदयास आलेल्या कामगार चळवळींचा व्यापक परिणाम समाजावर झाला.

भारतातील कामगार चळवळींचा परिणाम जाणून घेण्यासाठी कामगार चळवळींचा प्रारंभबिंदू म्हणून औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा उल्लेख करणे गरजेचे आहे. कारण, औद्योगिकीकरणामुळेच पारंपारिक श्रमविभाजनाची पद्धती बदलून भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग उदयास आले. भांडवलदार वर्गाकडून कामगारांवर होणारा अन्याय, पिळवणूक व कामगारांमध्ये निर्माण झालेली स्वहिताची जाणीव यातून उदयास आलेल्या कामगार चळवळींचा परिणाम पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात आलेला आहे.

१. **कामगारांचे वेतन आणि कामाचे तास** (Wages and working hours of labour):

औद्योगिकीकरणामुळे उदयास आलेली भांडवलशाही व्यवस्था व नवीन उद्योग व्यवस्था केवळ नफा मिळविण्याच्या तत्वावर आधारित होते. उत्पादन व्यवस्थेमधील खर्च नियंत्रित करून अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी भांडवलदार किंवा कारखान्यांचे मालक कामगारांकडून १४ ते १६ तास काम करून घेत व त्या मोबदल्यात कामगारांना तुटपुंज्या स्वरूपाचे वेतन अदा करत असत. या अन्यायकारक परिस्थितीमुळे कामगार आपल्या व आपल्या कुटुंबाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यात असमर्थ ठरत असे. कालांतराने कामगार चळवळीच्या माध्यमातून कामगारांना वर्तमान परिस्थितीनुसार निश्चित वेतन व कामाचे ठराविक तास (०८ तास) निश्चित करण्यास कामगार चळवळींला यश प्राप्त झाले.

२. **कामाच्या ठिकाणी सुरक्षितता** (Safety at work):

कामगार वर्गामध्ये निर्माण झालेल्या वर्ग जाणीवेतून कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनातील परिवर्तनासोबत कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीमध्येसुद्धा परिवर्तन घडून आले. पूर्वी कामगारांना अधिक जोखमीच्या ठिकाणी कोणत्याही सुरक्षा व्यवस्थेविना किंवा सुरक्षा उपकरणांशिवाय काम करावे लागत असे. या परिस्थितीमुळे बऱ्याचवेळा कामगारांच्या जीविताला धोका पोहचण्याची शक्यता निर्माण होत होती. कामगार चळवळींमुळे भांडवलदार किंवा कारखान्यांच्या मालकांना कामगारांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपकरणे पुरवणे भाग पडले. थोडक्यात, कामगार चळवळींमुळे कामगारांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्राप्त झाली.

३. **कामगारांचे संघटन व संघटना** (Union and organization of labours):

सुरवातीच्या काळात भांडवलदार वर्गाकडून होणारा अन्याय व पिळवणूक याविरुध्द कामगार कारखाना व स्थानिक पातळीवर एकत्र येऊ लागला. परंतु देशातील संपूर्ण कामगार वर्गाची अवस्था दयनीय व हलाखीची आहे, याची जाणीव झाल्यास कामगारांचे संघटन स्थानिक पातळीवरून राज्य व देशपातळीवर घडून येऊ लागले. त्याचबरोबर कामगारांचे संघटन मजबूत करून कामगारांच्या मागण्यांवर विचार करण्यास भाग पाडण्यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये कामगारांच्या विविध संघटना निर्माण होऊ लागल्या. यामध्ये बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन (BMA), ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC), इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (INTUC), भारतीय मजदूर संघ (BMS), हिंद मजदूर सभा (HMS), सेंटर ऑफ इंडिया ट्रेड युनियन्स (CITU) इ. प्रमुख देशपातळीवर काम करणाऱ्या कामगार संघटनाचा उल्लेख करावा लागेल. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या माहितीनुसार, भारतामध्ये २०१२ पर्यंत १६,१५४ कामगार संघटना कार्यरत होत्या. थोडक्यात, कामगार वर्गाचे हक्क व अधिकार जपण्यासाठी तसेच कामगारांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्यायास विरोध करण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून कामगार मोठ्या प्रमाणात संघटीत झाला.

**४. कामगार अधिकारांमध्ये स्पष्टता** (Clarity of labour rights):

औद्योगिकीकरणाच्या सुरवातीच्या टप्प्यामध्ये अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी भांडवलदार वर्गाकडून कामगारांवर विविध प्रकारचा अन्याय केला जात होता. यामध्ये वाढीव स्वरूपाचे अतिरिक्त काम करून घेणे, कामाचा आर्थिक मोबदला कमी देणे, रोजगारामध्ये अन्यायकारक कपात करणे, कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सुविधा पुरविणे इ. अन्यायकारक वागणुकीचा समावेश होता. कामगारांची कामाची गरज व कामगारांमध्ये संघटनाचा अभाव असल्याचा अधिकाधिक फायदा भांडवलदारांनी उचलला. मोठ्या प्रमाणात कामगारांची उपलब्धता, कामगारांचे अपुरे संघटन, कामगारांचे अज्ञान इ. कारणांमुळे भांडवलदारांनी कारखान्यातील कामाचे सर्व नियम स्वतः तयार करून कामगारांना अमानवीय परिस्थितीमध्ये जीवन जगण्यास भाग पाडले. औद्योगिकीकरणाच्या सुरवातीच्या काळात कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या विविध अधिकारांबाबत स्पष्टता दिसून येत नाही. जोपर्यंत कामगार मोठ्या प्रमाणावर संघटीत झाला नाही, तोपर्यंत कारखान्यातील कोणत्याही बाबतीत कामगारांचे मत गृहीत धरले जात नसत. नंतरच्या काळात विविध कामगार चळवळींच्या माध्यमातून कामगारांनी भांडवलदारांसोबत सामुहिक सौदेबाजी करून कामगारांचे विविध अधिकार व हक्क मान्य करण्यास भांडवलदारांना भाग पाडले. थोडक्यात, कामगार चळवळींच्या माध्यमातून कामगारांमध्ये स्वहीताबाबत जागरुकता निर्माण झाली व उत्पादन प्रक्रियेमधील कामगारांचे विविध हक्क व अधिकार याबबत स्पष्टता निर्माण झाली.

**५. राजकीय बदल** (Political changes):

औद्योगिकीकरणाच्या व्यापक प्रक्रियेचा एक भाग म्हणून औद्योगिक क्रांतीकडे पहिले जाते. औद्योगिक क्रांती ही जगाच्या इतिहासातील अशी घटना आहे, ज्या घटनेचा प्रभाव संपूर्ण मानव जातीवर पडलेला आहे. औद्योगिक क्रांतीमुळे मानवी जीवनाची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय अशी अनेक क्षेत्रे प्रभावित झाली आहेत. औद्योगिक क्रांतीमुळे मानवाच्या विचारांमध्ये मोठ्या प्रमाणात बौद्धिक परिवर्तन घडून आले. त्याचबरोबर औद्योगिक क्रांतीने जगाच्या राजकीय विचारप्रणालीमध्ये व राजकारणामध्ये मुलभूत परिवर्तन घडवून आणले आहे. औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली व कामगारांचा मोठा वर्ग शेतीव्यवसायातून औद्योगिक क्षेत्राकडे वळला. कामगारांच्या हितासाठी जसजसा कामगार संघटीत होऊ लागला तसतसा राजकीय दृष्टीकोनातून कामगारांचा एक दबावगट निर्माण झाला. यातूनच भारतामध्ये ट्रेड युनियन कायदा (Trade Union Act, 1926), वेतन देयक कायदा (Payment of Wages Act, 1936), औद्योगिक विवाद कायदा (Industrial Disputes Act, 1947), किमान वेतन कायदा (Minimum Wages Act, 1948), कारखाना कायदा (Factories Act, 1948), मातृत्व लाभ कायदा (Maternity Benefit Act, 1961), समान वेतन कायदा (Equal Remuneration Act, 1976) अशा प्रकारचे कामगारांचे हित जपणारे कायदे अस्तित्वात आले. परिणामी, कामगारांच्या विविध चळवळींमुळे राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये कामगारांच्या हिताला महत्व प्राप्त झाले.

६.  **सामाजिक परिवर्तन** (Social change)**:**

औद्योगिकीकरणाच्या व्यापक प्रक्रियेमुळे सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत झाली. कामगार वर्गाचा उदय व कामगारांचे संघटन औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचे फलित मानले तर आपणास असे म्हणता येईल की, कामगारांच्या विविध चळवळींमुळे समाजाच्या विचारसरणीमध्ये, संरचनेमध्ये, सामाजिक संबंधामध्ये, सामाजिक व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडून आले. कामगार चळवळींच्या माध्यमातून कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी समाजवाद आणि कम्युनिझम यांसारख्या विचारसरणी पुढे आल्या. या विचारसरणी केवळ कामगारांपुरत्या मर्यादित नाहीत तर, समाजातील दुर्लक्षित घटकांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या आहेत. थोडक्यात, कामगार चळवळींमुळे केवळ कामगार वर्गालाच नाही तर समाजातील गरीब आणि शोषितांना न्याय मिळण्यास मदत झाली आहे. याआधारे आपणास असे म्हणता येईल की, अप्रत्यक्षरीत्या सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी कामगार चळवळी कारणीभूत ठरल्या.

७.  **आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगारांचे हितसंरक्षण** (Protection of labours interest at the International level)**:**

ज्या प्रकारची सामाजिक व्यवस्था अस्तित्वात असते, त्याच प्रकारचे सामाजिक व आर्थिक जीवन तेथील समाजाला जगावे लागत असते. या अनुषंगाने विचार करता, जगातील वेगवेगळ्या देशांमधील कामगारांची स्थिती व कामगारांच्या समस्यांचे स्वरूप कमी अधिक प्रमाणात वेगवेगळे तरी कामगार वर्गाचे हित साधणे हेच कामगार चळवळींचे मुख्य उदिष्ट असते. वेगवेगळ्या देशांमधील सामाजिक परिस्थितीचा व कामगारांच्या परिस्थितीचा एकूण विचार करून संपूर्ण जगभरातील कामगारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगारांसाठी काम करणारी “International Labour Organization’ (आंतरराष्ट्रीय कामगार संघटना) १९१९ साली स्थापित करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगारांसाठी संघटना निर्माण करण्यामध्ये जगभरातील कामगार चळवळींची प्रमुख भूमिका असल्याचे दिसून येते.

## ४.४ सारांश:

‘भारतातील सामाजिक चळवळी’ या पेपरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतातील विविध सामाजिक चळवळींची माहिती देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या पेपरमध्ये एकूण चार युनिटचा समावेश करण्यात आलेला आहे. पेपरमधील चौथे व शेवटचे युनिट ‘कामगार चळवळी’ असे असून या युनिटच्या माध्यमातून कामगार ही संकल्पना स्पष्ट होते. प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतातील कामगारांच्या समस्यांचे स्वरूप जाणून घेण्यास मदत मिळते. भारतातील कामगारांना दारिद्र्य, रोजगारामधील अनिश्चितता, स्थलांतर, अशिक्षितपणा व निरक्षरता, संघटन, कामाची खराब परिस्थिती, जागरूकतेचा अभाव, असुरक्षितता, राजकीय जाणीव व दृष्टिकोनाचा अभाव, कामगारांबाबत विश्वसनीय व संपूर्ण सांख्यिकीय माहितीचा अभाव, कनिष्ठ प्रतीचे राहणीमान इ. प्रमुख समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे स्पष्ट होते. औद्योगिकीकरण या प्रमुख कारणामुळे देशात भांडवलदार व कामगार असे दोन प्रमुख वर्ग निर्माण झाले. भांडवलदारी व्यवस्था केवळ नफा मिळविण्याच्या तत्वावर

आधारित असल्यामुळे भांडवलदार वर्गाकडून कामगारांची पिळवणूक होवू लागल्याने कामगारांच्या समस्या वाढल्या. या प्रमुख कारणामुळे कामगार संघटीत झाला व भारतामध्ये ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात कामगार चळवळी घडून येवू लागल्या व कामगारांच्या कल्याणासाठी विविध संघटना निर्माण झाल्या. कामगार चळवळींमुळे संपूर्ण कामगार वर्गाचे जीवन प्रभावित झाल्याचे निदर्शनास येते. कामगार चळवळीमुळे कामगारांच्या जीवनात सकारात्मक स्वरूपाचे बदल झाले आहेत. कामगारांमध्ये संघटन निर्माण करण्यासाठी, कामगारांना चांगले जीवनमान प्राप्त करण्यासाठी, कामगारांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी, आणि सामाजिक व कायदेशीरदृष्ट्या न्याय मिळवून देण्यासाठी कामगार चळवळींनी अत्यंत महत्वाची भूमिका पार पडली आहे. थोडक्यात, चळवळी व कामगार संघटना यांच्या माध्यमातून कामगारांमध्ये निर्माण होणारी जाणीव यामुळे कामगारांच्या जीवनाच्या विविध पैलूंमध्ये सकारात्मक परिणाम घडून आल्याचे स्पष्ट होते.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

स्वयंअध्ययन प्रश्न– १

१. कार्ल मार्क्सच्या मते, मानवी इतिहासामध्ये भांडवलदार व कामगार वर्ग हे दोन प्रमुख वर्ग आहेत.

२. प्रस्थापित व्यवस्थेला श्रम विकतो, बुद्धी विकतो तो कामगार असतो, अशी कामगाराची व्याख्या उत्तम कांबळे यांनी केली आहे.

३. International Monetary Fund (IMF) नुसार, भारतामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण ८७% इतके आहे.

४. Periodic Labour Force Survey (PLFS) नुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी स्थलांतरित कामगारांचे प्रमाण २८.९% इतके आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न– २**

१. भारतातील पहिली कापड गिरणी कावसजी नानाभाई दावर यांनी स्थापन केली.

२. भारतातील पहिली कापड गिरणी बॉम्बे (मुंबई) शहरामध्ये 'ताडदेव' या ठिकाणी स्थापन करण्यात आली.

३. भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मेघाजी लोखंडे यांना ओळखले जाते.

४. नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल हॅण्ड्स असोसिएशन' (Bombay Mill Hands Association) ची स्थापन केली.

५. 'द ग्रेट बॉम्बे टेक्सटाईल स्ट्राइक' हा संप १८ जानेवारी, १९८२ रोजी पुकारण्यात आला.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भारतातील कामगारांच्या समस्या सविस्तर विषद करा.

२. महाराष्ट्रातील प्रमुख कामगार चळवळींची सविस्तर मांडणी करा.

३. कामगार चळवळींचे परिणाम सविस्तर विषद करा.

**ब) टिपा लिहा**

१. कामगार संकल्पना

२. कामगार चळवळींची पार्श्वभूमी

३. महाराष्ट्रात कामगार चळवळीचा उदय

४. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. राव एम. एस. (२०००), भारतातील सामाजिक चळवळी, मनोहर पब्लिकेशन, नागपूर.

२. साळुंखे सर्जेराव, (२००८), समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

३. Shah, Ghanashyam, (2023) Social Movements in India: A Review of the Literature, Second Edition, Rawat Publication, Jaipur.


❑❑❑